# शुभांगी पासेबंद



# दीपज्योती नमोस्तुते

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# दीपज्योती नमोस्तुते

## शुभांगी पासेबंद

ई साहित्य प्रतिष्ठान

# दीपज्योती नमोस्तुते (स्तंभ संग्रह)

लेखिका : शुभांगी पासेबंद

9869004712

scpaseband@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820

प्रकाशन : ३ मार्च २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

दीपज्योती नमोस्तुते

मनोगत

माझे हे एकोणावीसावे पुस्तक, हा स्तंभांचे नैवेद्य, वाचकांसमोर नम्रतापूर्वक ठेवत आहे. स्तंभसंग्रह बनवणे, स्तंभ लिहिणे हा माझा आवडता छंद आहे. स्तंभ हा खूप छान लेखन प्रकार आहे. विविध विषयांचे हे स्तंभ सुसूत्रित करा आणि वेगवेगळी पुस्तके बनवा, असा सल्ला मला एका संपादक साहेबांनी दिला होता. मात्र असे विविधतापूर्ण विषयांचे, जसे सुचले तसे, असे स्तंभांचे गुच्छ, झेले, रंगीबेरंगी अशी शब्दमण्यांची माळ, मी वाचकांसमोर ठेवते आहे.

लिहिता लिहिता जाईन मी
शब्दरूपाने मागे राहीन मी

शुभांगी पासेबंद,
९८६९००४७१२
scpaseband@gmail. com




**मा. राज्यपालांच्या हस्ते**
**पुस्तक प्रकाशन प्रसंगी**

# अनुक्रम

दीपज्योती नमोस्तुते

माघाची थंडी

सहजच

मधुरदंश

मरणात खरोखर जगावे

पुस्तके सांगतात गोष्टी

कोटी कोटी रूपे तुझी

आय हेट टिअर्स

खेळण्याचे दुकान

मलमली प्रेम

वाट पाहणे

शेवग्याच्या शेंगा

दोना पावला

जस्सी जैसी कोई नहीं

उडाला थवा पाखरांचा

माहेरची ओवी

आम्ही दोघी मैत्रिणी जोडीच्या

आडवी लक्ष्मी

स्त्री जन्मा हि तुझी कहाणी

देवा पाव रे

सुखाची घागर

रद्दी दिली का

राजा राणीचे गाणे

नापास लेख

गुरुदेव दत्त

खरी लग्नाची गोष्ट

निरोप घेतो आम्हा आज्ञा असावी

चैत्र रे चैत्र

मनाची मशागत

## ई साहित्य प्रतिष्ठानसह शुभांगी पासेबंद यांचे प्रकाशित साहित्य

कस्तुरी पक्षी- इ बुक- कादंबरी- इ साहित्य -2016 विनामूल्य

राहू दे घरटे- इ कादंबरी-2016 विनामूल्यwww.esahity.com


मी तुझेच गीत गात आहे- इ साहित्य - कादंबरी-2016 विनामूल्य

कृष्णकुसुमांजली-२०१६-स्तंभ संग्रह इ साहित्य- विनामूल्य

आम्रकुसुमांजली -२०१६- स्तंभ संग्रह- इ साहित्य- विनामूल्य


रानफुलांचे थवे स्तंभ संग्रह -ई-साहित्य-२०१७ एप्रिल

दीपज्योति नमोस्तुते-स्तंभसंग्रह-ईबुक-२०१८ हे पुस्तक






















# १. दीपज्योती नमोस्तुते

अंधाराचे भय सजीवांना म्हणजे मनुष्याला व प्राण्यांनाही वाटते. ऋतू चक्रानुसार, नेहमी दर वर्षाच्या, अश्विन महिन्यापासून, दिवस अधिक लहान झाल्याने, लवकर सूर्यास्त होऊन, रात्र अंधारी होऊ लागते. त्यामुळे अश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षात येणाऱ्या, कोजागिरी पौर्णिमेला आपण रात्री जागवतो. य़ा अंधारी महिन्यातील व कार्तिक मासातील रात्री, दीपदानाची सुरवात करतो, म्हणजे रोज दिवा लावण्याचा नेम करतो. दक्षिणायनात शरद ऋतूतील, अंधारावर प्रकाशाची मात साजरी करणारी दिवाळी, मानवाचा लाडका सण सुद्धा या अश्विन महिन्यातच येतो. अंधारावर, रस्त्यांवर, मंदिरांमध्ये, दीपमाळांत, गोपुरांवर, घराबाहेरील वाटेत, पाऊलवाटांवर, हमरस्त्यांवर प्रकाशाचा ठसा उमटवण्याचा प्रयत्न केला जातो. कृष्ण विवरावर प्रकाशाचा ठसा, उमटवण्याचा प्रयत्न केला जातो. अंधाराचा संबंध मृत्यूशी असतो, तर दीपाचा जीवनाशी असतो.

रात्री अंगणात, आकाशदीप लावून दूरवर प्रकाशाचा संदेश दिला जातो. दूरवरून येणाऱ्या यात्रेकरूंच्या नजरेला, येथे वस्ती आहे, असा संदेश हा दिवा देत असतो. शत्रूला, जंगली जनावरांना, सापांना दूर राखण्यासाठी, हा दीप उपयोगी पडतो. कीटक, जंगली जनावरे, सरपटणारे प्राणी यांची चाहूल, मानवाला जाणवावी व या प्राण्यांपासून रक्षण करण्याचे कामी, हा आकाशदीप किंवा अंगण दिवा, पणती, छोटा दिवा उपयोगी पडतो.

या दिव्याची रांग, दीपांची आवली म्हणजे ती दिवाळी होय. तेजाचे पूजन. केवळ कुलाचार परंपरा म्हणून आपण या दिवाळीच्या सणाकडे न बघता, अंधारावरील प्रकाशाची मात असा अर्थ या सणात आहे.

"दीपज्योती नमोस्तुते"

अशा प्रकारे रोज संध्याकाळी दीप प्रज्वलन करायची पद्धती हिंदू धर्मात आहे. या शुभ पद्धतीचा अधिक ठळक भाग, असा सण म्हणजे दिवाळी होय.

शुभ कार्याच्या वेळी सुद्धा, त्या पूजनाची सुरवात आपण दीप प्रज्वलनाने करतो. अंधारात ज्या गोष्टी आपल्या जवळ असतात, त्या आपल्याला दिसत नाही. त्यामुळे आपण भयभीत होतो. मात्र प्रकाश पडला, ऊजेड दिसला, कि सर्व परिस्थितीचे ज्ञान होते व माणूस त्या फिकट अंधुक ज्योतीमध्येही वाट शोधू लागतो. त्याला आशा वाटते. दिवा हा परिसर जसा उजळवतो, तशी मनाची मरगळ दूर करून, मनाची आशा उजळवतो, आशा प्रदान करतो. उदा. सूर्य व चंद्राला आपण मोठे दीप मानतो. 1833 मध्ये गॅस बत्तीचे दिवे आले. 1844 ला केरोसीनचे दिवे व 1911 मध्ये विजेचे दिवे आले. थंडीच्या मोसमातील, उत्सवी अश्विन महिना हा धार्मिक, सांस्कृतिक व भौतिक संदेश देतो.

"तमसो मा ज्योतिर्गमय" असे म्हणत, दिव्यांचा लखलखाट करीत येणारी दिवाळी हि त्या ऋतूला सुसंगत असेच विधी सुचवते. पूर्वजांनी पारंपरिक पद्धतीने रचलेल्या, या दीप पूजनाचे महत्व, हे त्या अंधाऱ्या रात्रीत जास्त लक्षात येते. खूप दुःखात छोटीशी आशाही सुखावते. पूर्वीच्या काळी, वीज, विजेवर चालणारी, सेलने प्रकाश देणारी उपकरणे, विजेरी असे प्रकार नव्हते. त्या काळी दिव्यांचे महत्व

अंधाऱ्या रात्री अधिक वाटत असे. विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी, गृहिणींना स्वयंपाकासाठी, व गृहस्थांना देव पूजन व दैनंदिन कार्यासाठी दीपाची सोबत, आवश्यकच असे. त्या दीप महोत्सवाचे स्मरण म्हणून, आपण आजही हि दिवाळी साजरी करतो.

दिवाळीत, मातीच्या पणतीत वात पेटवून, दिवा लावून आपण त्या पणत्या, घडवणाऱ्या कुंभाराला सुद्धा पोट भरायला मदत करतो. नवा पाट खरेदी करून, त्या सुताराला आर्थिक चालनवाढीत हातभार लावतो. सर्व बलुतेदार व सर्व स्तरावरील समाजघटकांना दिवाळीत, सण उत्सवात सामावून घेण्यासाठी, पूर्वजांनी विचारपूर्वक रचलेले हे कुलाचार आहेत. दिवाळी हा समूहाचा सामाजिक सण आहे. दिवा लावण्याचा दुसरा अर्थ, नाते संबंध जोडणे हा सुद्धा होतो. असे आपली संस्कृती सांगते. जीवनाचे मयूरपंख त्यानेच बहरतात

ज्योत से ज्योत जलाते चलो
प्रेम कि गंगा बहाते चलो
राहमें आये जो दीन दुखी
सबको गलेसे लगाते चलो

मानव जसा, शेतात उभ्या असलेल्या बुजगावण्याकडे, पाहतो, तसे धार्मिक विधींकडे न पाहता त्यांचा अर्थ आपण जाणून घेऊ या. या दिवाळीच्या दीपांच्या महत्वामुळेच आपण म्हणूया

दीपज्योती नमोस्तुते
तेजाला मी पूजिते.

# २. माघाची थंडी

माघी गणपती उत्सवातून घरी परतताना, मातीचा ओला वास जाणवू लागला. जी गवताची पाती सकाळी सकाळी ओल्या दवात न्हाऊन सजली होती, ती संध्याकाळी सुद्धा टवटवीत होती. एरवी पांढरे मळकट वाटणारे, बगळे पांढरेशुभ्र वाटत होते. धुक्याचा फिकटसा, अर्धपारदर्शी पडदा असताना, तो कापत सकाळी कामावर जावे लागते आणि भर संध्याकाळी, सहा वाजताच ऊन नकळतच घराच्या छतांवर, झाडांच्या शेंड्यांवर रेंगाळते, तेव्हा अगदी खुशाल समजावे थंडी आली. आपल्या बरोबर शेकोटीचा आनंद घेऊन, धुक्याची शाल पांघरून, फळाफुलांची टोपली भरून घेऊन आली. रंगीबेरंगी आकाशाची दुलई, खांद्यावर घेऊन आली. खाऊंची लयलूट सोबत घेऊन आली. थंडी आवडणाऱ्या मुंबईकरांना तसे स्वेटर व शालीचे वावडेच असते. उत्तर भारतीय प्रदेशात स्वेटरची व शालींची जशी खास रेलचेल असते, तशी मुंबईत कधीच नसते. डेहराडून, आग्रा, दिल्ली इथे जशा स्त्रिया, अगदी सिनेमा बघता बघता स्वेटर विणतात व भराभर स्वेटर विणून आपल्या लाडक्या व्यक्तीच्या शरीरावर चढवतात, तसे मुंबईत शक्यच नसते. अगदी पूर्ण जीवनकाळात एक स्वेटर बनवला तरी चालतो. अशीही तो स्वेटर कपाटाचीच धन होणार असतो. गरम कपड्यांसाठी जरी नाही, तरी थंडीच्या खास विशिष्ट धुंदीसाठी तरी थंडी सर्वांनाच खूप आवडते. शिवाय दुर्मिळ गोष्टींचे आकर्षण मानवाला असतेच.

शरीराला उब आवश्यक असताना थंडीचे व थंड हवेच्या स्थळांचे हळवेसे एवढे आकर्षण माणसाला का असते, ते समजत नाही. गरम प्रदेशातल्या आपल्या देशवासियांना थंड हवेचे प्रदेश आवडतात. तर परदेशी नागरिक, गरम हवा व भरपूर सूर्यप्रकाशासाठी आपल्या भारत देशात येतात. तरीही थंडी मात्र सर्वानाच हवीहवीशी असते. सिनेमातील थंडीबद्दल काय बोलायचे? फक्त बघत राहायचे. जो हिरो त्यात फुंकर मारतो, ती मारून श्वास सोडला कि दिसणारा पांढरा धूर बघून आपणच खुश होतो. बर्फाच्छादित शिखरे पाहून व लांब लांब, जनावरांचे, फरचे केसाळ कोट घालून, बर्फासाठी चालण्यासाठीची ऊपकरणे, वापरले जाणारे बूट घालणारे ते हिरो आणि हिरॉईन पाहून बालपणापासून ते आजपर्यंत प्रत्येक थंडीतील, दवाने भिजलेल्या आठवणी नजरेसमोरून फिरतात. कानाला मफलर बांधून किंवा माकडटोपी घालून प्रत्येकजण सारखेच दिसते, पण त्या आवाजावरून ओळखलेल्या व्यक्ती व ती थंडीची वेळ आठ्वतेच! थंडीला एक वास असतो. गवतीचहाचा, शेकोटीचा, उदा. धुपाचा आणि ताज्या भाकरीचा सुद्धा!

थंडी, हा ऋतू प्रेमीजनांचा असतो, महाशिवरात्र, शंकर पूजेचा असतो. कोवळया आठवणींचा थंडीचा ऋतु स्मरण रंजकच असतो.

पावसाळा हा तसा मेघदूत मुळे प्रेमासाठी प्रसिद्ध असलेला ऋतू असला, तरीही थंडीवर जेवढी गाणी लिहीली गेली, तेवढी पावसावर सुद्धा लिहिली गेली नाहीत. थंडीत बहुतेकदा विरह व्याकुळता असते. निसर्ग रम्यतेचा साक्षात्कार असतो. सणासुदीचे व सुगीचे कुतूहलाचे वातावरण असते. थंडीत जागरण करायच्या रात्री व सहलीचे दिवस असतात. फारशी दगदग, तडतड न करता, सकाळी उशिरा पर्यंत बिछान्यात लोळायचे फुरसतच दिवस, असेच थंडीचे वर्णन

करता येईल. बदल हा निसर्गाचा नियमच असतो. निसर्ग कूस पालटतो. ऋतू बदलत राहतात. किंबहुना काळ पुढे जातो हेच हे ऋतू सांगतात. थंडीचे पाऊल, कालच, मला त्या डोंगर आडच्या झाडाखाली, ओल्या दवावर, दिसले. कोवळे ऊन पुढच्या ऋतूचे संदेश देऊ लागले. चला थंडीचे स्वागत करू या

जाडो कि नर्म धूप और

पूर्वाईया चले,

थंडी सफेद चादरों से लेटे बर्फपर

बैठे राहे तसवुरे जाना किये हुए

दिल धुंडता है फिर वही

फुरसत के रात दिन

लो, जाडे का मौसम आ गया !

माघाची थंडी माघाची.

# ३. सहजच

आजोबा सहजच एकदा ‘आपण वृद्धाश्रम काढू या’, असे म्हणाले. भावी वृद्धाश्रमात, आपल्या ऊत्तरायणातील घरासाठी या घरात बदल करुन कशी रचना हवी, काय हवे, याची पूर्ण कल्पना त्यांच्या डोक्यात पक्की रुजली होती. हॉल च्या पुढच्या दाराला सताड उघडून त्या हॉलचेच स्टेज करून लहान मुलांचे कार्यक्रम तिथे व्हावे हे त्यांनी ठरवले होते. काळया कातळाचे तुळशी वृंदावन त्यांनी आणले. गच्चीला एक चार फुटी भिंत, पॅरापिट वॉल करून, फक्त एक आराम खुर्ची गच्चीत ठेवून ते सूर्योदय बघत. काहीही करण्याचे कारण ते देत. "सहजच"

पूर्व दिशेला उगवतो तो राव

त्याचे सूर्यदेव नाव !

संध्याकाळी पश्चिमेला व रात्री चांदण्या बघत ते आजोबा तिथेच बसत असत. अगदी शेवटचे काही दिवस, त्यांना आजारपणामुळे, घरातच पडून राहावे लागले, मात्र त्या वेळीही, नक्कीच ते मनानी कुठे कुठे फिरून येत असतील. बुद्धीचा खुराक म्हणजे वाचन व मनाचा खुराक म्हणजे गप्पा असे ते म्हणत असत. दोन्ही टाईमपास त्यांना खूप आवडत होते. निसर्गरुपे त्यांना फार आवडत असत. सर्व काही अकारण सहजच करायचे असे ते म्हणत. वृद्धापकाळाने झोप येत नाही म्हणून पहाटे, खुडबुड करून इतरांची झोप मोड करणारे वृद्ध आपण पाहतो. ते वृध्द, स्वतःवर चिडून मला म्हाताऱ्याला झोप येत नाही म्हणून उठतात. म्हणून करवदतात. पण दादा

खूप सकारात्मक होते. अगदी ते बोलू शकत नव्हते, तेव्हाही त्यांचा अस्तित्वाने ती खोली गजबजलेलीच वाटे.

दादांना वेगवेगळी वचने तोंडपाठ येत असत. ते खड्या आवाजात ओव्या, भजन म्हणत

कोणाचे हे घर, हा देह कोणाचा

आत्माराम त्याचा तोच जाणो

पक्षी अजगर न करिती संचित

तयासी अनंत प्रीतिपाळी

पाऊस पडण्या बद्दलही वचने बोलताना त्यांचे डोळे चमकून उठत असत.

पडल्या तर मघा

नाहीतर ढगांकडे बघा,

आजोबा हे वृद्धाश्रमाचे संस्थापक, वृद्धाश्रमातील हे माझे मित्र बनले. ते म्हणत,

पडतील स्वाती तर पिकतील माणिक मोती

मोकळी स्वाती तर कापूस मिळेना वाती.

पत्नीच्या मृत्यू नंतर ते सांगत.

मी येतो सांभाळा,

मुन्नूच्या आई तुम्ही पुढे पळाला.

अंधाऱ्या वाड्यातील संपली यात्रा

भरल्या घराचा उडाला पत्रा.

"अमरपट्टा घेऊन कोणीही आलेले नसते. प्रत्येकजणालाच कधीतरी जायचेच असते. मीही कधीतरी जाणार" दादा म्हणत असत.

अनाथ कौन है यहा.

त्रिलोकनाथ साथ है!

कसे असावे संसारी

ऊठून जाता येईल झटकरी

असे असावे संसारी

आज कऴले की दादा वृध्दाश्रमातून देवाश्रमात गेले आहेत.

सहजच !

दादांच्या खोलित आता धुके, धुके

आजोबांवाचून हे घर मुके, मुके. असे आजोबा प्रत्येक घरी होते. आज घरे मुकी झाली आहेत.

# ४. मधुर दंश

एखादा दंश मधुर असतो. वेदना असते, पण हवीशी असते. जगरहाटीच्या, रुजलेल्या, मळलेल्या वाटेवरून चालताना, माणसाला एखादा मधुर दंश सतावू लागतो. काहीतरी वेगळे करावे, असे वाटते. पण नक्की काय करावे हे कळत नाही. त्या वेगळे काही तरी करण्यासाठी स्फूर्ती हवे, प्रेरणा हवी. वहिवाट वेगळी असते, तिच्यावर यश मिळाले तर पाठीवर थाप देणारी स्तुतीही हवी. तर रस्ता चुकल्यावर आत्मपरीक्षण करून सुधारणा करीत असताना, गुरुमाया करणारे, आशिर्वाद देणारे, हातही हवे, असे वाटते. पण वेगळे स्वप्न नजरेसमोर दिसू लागते.

हे नवे स्वप्न मधुर असते. दंश सुद्धा करते. ज्या गृहीतकाने, ज्या हेतूने एखादी नवी गोष्ट सुरु केली ते गणित चुकले, की नवीन विचाराने त्या प्रश्नाचे उत्तर कलाकार शोधतो. कलाकाराने कलेची आराधना करतांना, त्रयस्थपणे प्रश्नाचा खल करावा. मधुर स्वप्नाचा दंश सोसावा. प्रत्येकच गोष्ट पैसा हवा म्हणून करू नये. तर काहीतरी समाज कल्याणाचाही हेतू असावा. प्रायव्हसी हवी म्हणून आपण समाजातील काही गोष्टी लपवतो. उदा. स्त्री भ्रूणहत्या. हुंड्यासाठी होणारा छळ, व्यभिचार, बलात्कार, ईत्यादि

पण राईट टू लिव्ह, इज मोअर इम्पॉर्टन्ट, दॅन राईट तो प्रायव्हसी

दंशाने घायाळ व्यक्तिने, काथ्याकूट करून आजवर जे चुकले, त्याचे अनॅलिसिस करण्यात, अधिक वेळ न घालवता, उपाय शोधावा. नवीन वाटेवर एखाद्या क्षणी एकदम टेन्स वाटते, एक नात्यांचा मधुरदंश, घायाळ करू लागतो व आपण नव्या वाटेवर वाटचाल करण्याची धडपड करतो. मला रोज वर्तमानपत्रातील बातम्या वाचून वाटले मानसिक आरोग्याबद्दल काम करावे. माझ्या बघण्यात अनेक वेगळी माणसे आली जी ऐशआराम सोडून सामाजिक बांधिलकी जपू लागली. उदा. मूकबधिरांची शाळा चालवणे. वृद्धाश्रमात सेवा करणे. आजारी व्यक्तींना नाश्ता देणे.

श्रीमंती येताच, फक्त सुटीच्या दिवशी मॉल मध्ये जाणे, पिझ्ज़ा खाणे. सिनेमा थ्रीडी बघणे, पर्यटन करणे म्हणजे इलायट रीच होणे नव्हे. आज सुसंकृत होणे अधिक आवश्यक, मोठ्या गरजेचे आहे. हे ज्यावेळी माणसाला कळते. तेव्हा त्याला आपल्या सुखवस्तू जीवनाची, निरर्थकता, हेतू हीनता चावू लागते. थोडी स्थिर स्थावर नजरेसमोर दिसत असतानाच, समाजभान जागृत होते. जागृतीनंतर जरी ठरवले तरी या नव्या वाटेवर चालणे सोपे नसते, काटेच काटे असतात. पण समाजसेवा करण्याचा आनंद असतो. तोच मधुर दंश असतो.

जगण्याची गम्मत येते मनः पूर्वक.

ओंजळभर स्नेहही करतो जीवनाचे सार्थक

केली जशी जमली तशी हि कटकट

संस्काराचा जन्म वसा पाडला पार थेट.

तुम्हीच ठरवा वाकुडा कि नेट.

असे मनात म्हणत, व्यक्ती माणुसकी या धर्माचा विचार करू लागतो. नोकरी धंदा सोडून काही करायचे, म्हटले कि घराचे म्हणतात, "सुख चावतेय तुला, वेडेपणा करू नकोस. कुणालाही आजतागायत समाज बदलणे जमलेले नाही. " मग आपण पाय मागे घेतो. टीव्ही बघत वेळ घालवतो. तरीही एका अपंगाच्या संस्थेसाठी कार्य करायचे मी ठरवले. एका परिचिता बरोबर मी त्या शाळेत गेले. त्या विद्यार्थ्यांशी बोलले. सर्वजण खूपच सकारात्मक विचारसरणीचे होते, पण काही जण समाजाचे अनुभव घेवून निराश होत होते.

पैसा नसेल तर माणूस दुःखी होतो. पण पैसे असणे हि सुखाची खात्री नसते. मानवाने समाजसेवेची झालर म्हणूनच लावून घ्यावी. वरकरणी आनंदी वाटणाऱ्या व्यक्तींच्या मनात सुद्धा, खूप वेदना दडलेल्या असतात. निराशा दाटलेली असते. खिन्न मनस्कतेचा आजार आनंदी दिसणाऱ्या अशा तिला असू शकतो. दिसते तसे नसतेच. खूप आकर्षक बोराच्या आत, घाण अळी असते. एखाद्या बोराच्या आतली कीड ओळखू देखील येत नसते. त्यामुळे मनाच्या तटबंदीवर, अधिक काम केले जायला हवे. निराशा(डिप्रेशन) दूर करण्यासाठी प्रयत्न करावा. ‘एलिस इन द वंडर लॅंड’ मध्ये जसा एलिस ला एक ससा दिसतो. तशी मला जळी स्थळी ती संस्था दिसू लागली.

"उद्यमं साहसं धैर्य बुद्धी"

शक्ती, पराक्रम षड्गुण इति

यत्र वर्तते तत्र देवो सहायता"

अशा प्रकारे वेगळया विचारांनी भरलेल्या व्यक्ती कडे बघून, काहीतरी करावे हि तीव्र इच्छा झाली.

आमच्या पिढीपेक्षाहि, या पुढच्या पिढीतील लोक अधिक हुशार बुद्धिमान आहेत. नंतर एका अंध मुलींच्या शाळेत भेट द्यायची संधी मिळाली. त्या भेटी दरम्यान एक लहान मुलगी पुढे आली व म्हणाली

"मॅडम मांजरीने मागितला, माझ्या कडे मोत्याचा मणिहार"

पिनाकीयो सारखा बाहुला तिच्या हातात होता. तो तिने बनवला होता. तिच्या डोळयाचे ऑपरेशन केले तर ती 40% तरी बघू शकणार होती, त्या दृष्टीने त्या संस्थेचे प्रयत्न चालू होते. मी तिला मदत करून पहिले, चित्रपट मोबाईल, गेम टीव्ही अशांवर बेगडी वर्ख लावलेल्या सुखांनी आनंद मिळतो. पण तो तत्कालीनच असतो. अंतर्मनातून येणार आनंद, माणुसकीचा धर्म पाळून मिळतो. यश येतेच असेही नाही. शिवाय श्रेय मिळते असेही नाही. पण आनंद मात्र मिळतो. कर्तव्य पार पडल्याचा भाव येतो. चंगळवादाचा व्हायरस पसरत असताना, आपण निदान परिसर स्वच्छतेचा वसा जरूर घेऊ शकतो. 'आपण एकटे काय करणार?' असे म्हणू नका. सुरवात तर करा.

समाजातील काही रूढ कल्पना बदलणे, अवघड आहे पण अशक्य नाही. उदा. मुलगी एक देना बँक आहे व मुलगा हि लेना बँक आहे. उदा. मुलगा प्रत्येकालाच

हवा असतो. आजारी रुग्णाची सेवा करायला नकोसे वाटते, नावड निर्माण होते. स्वच्छता करणे आवश्यक असते, पण ते दुसऱ्याने करावेसे वाटते. थोडासा चिडका माणूस, वेडाच ठरवला जातो, पण त्याचे मनात काहीतरी ऊकळत असते. भोवतालच्या अनेक घोटाळयांची व विचित्र व्यवहारांची मन खचते. परदेशी जावेसे वाटते. परंतु "कुंभारासारखा गुरु नाही जगामध्ये" म्हणतात, तसे मातीतूनच, आपल्याला परिणाम साधत, काम करावे लागते. ते करूया. उदा. गरीब मुलांना मोफत शिकवणे, शाळांमध्ये मूल्यशिक्षण, समुपदेशन देणे, हि कामे या वेळी कराविशी वाटतात, ती करावी. घर- संसार बघत बघत, माणूस वयस्कर होतो. प्रगल्भता येते, तो पर्यंत शरीर साथ देत नाही. त्यामुळे कुठे समाजसेवेच्या कॅम्पला जायला सुद्धा उमेद, शक्ती उरत नाही.

ज्याचे ऐहिक ना धड

तो परक्ष कुठेल कड?

ज्याचे सुकृत नाही तो परमार्थाकडे वळूच शकत नाही. समाजकार्य करू शकत नाही.

बैसोनि करा एकचित्त. विचार करा, परमार्थाचा"

यात देवाचा जप करणे अपेक्षित नसून, अभावाचे जीवन जगणार्यांना, मदतीचा हात देणे, हा अर्थ अध्याहृत आहे. मनात विचारांच्या प्रस्थापित वास्तू मध्ये "दत्त पूजेचे स्वर गुंजू दे" वास्तू बदलायची, फोडायची गरज नाही. मनातील दगड फोडा. जो विषय नको म्हणून त्रास होतो, त्या कठीण प्रश्ना पासून पळून

जावून चालत नसते. प्रश्नाशी दोन हात करावे लागतात. ते करा. आपल्या परमेश्वराशी, आपला सूर लागू दे. म्हणजे आजूबाजूला त्या भक्तिरूपाची हिरवी गर्दी होईल. दैवी निसर्गाचा, आनंदरूपी नैवेद्य समोर येईल. मनात, कृष्णाच्या बासुरीचा स्वर, हिरवा अंकुर होऊन उगवेल. मानवतेचे मर्यादित अवकाश म्हणजे बेलपान होय. तीन पाने म्हणजे, बालपण तरुणपण व वार्धक्य. असा तीन अवस्थांमधून जगणे, म्हणजे जीवन होय. मन चंचल होते. अध्यात्म सोपे नसते. पण समाजसेवेची थोडीशी आवड लावून घ्यावी. फार काही करणे झाले नाही तर निदान वाईटाची साथ न देणे, परिसर स्वच्छ ठेवणे व झाडे लावणे, झाडे जगवणे, हे छोटेसेच काम करावे. ज्याचा उपयोग पर्यावरण संरक्षणासाठी होईल, हे नवे विचार रुजवणे सोप्पे नसते. पण सुरुवात स्वतः पासून करायला हवी. जागरूक सजग नागरिक बनलात कि नवा प्रकाश दिसेल.

तू माझ्या एकांताचा प्रकाश

तू माझ्या आयुष्याची पहाट,

मानवात आहे. परमेश्वराचा अंश,

वर्ख लावलेल्या बाहुल्या देती मधुर दंश !

परिस्थिती बदलणे शक्य नाही, तर मनस्थिती बदला.

## ५. मरणात खरोखर जगावे.

नवजन्माची सुरुवात करु या, या शीर्षकाचा, लोकसत्तात एक लेख वाचला

‘स्मशान नव्हे. रसरसते चैतन्य स्थळ’ हा लेख वेगळा वाटला. साधारणतः स्मशान म्हणजे अशुभ, तिथे भुतेखेते असतात. असा गैरसमज प्रचलित असतो. तो गैरसमज व अंधश्रद्धा दूर करण्याच्या दृष्टीने, स्मशान सुशोभित करणे व तेथे सभा, किरकोळ सहली व सांस्कृतिक कार्यक्रम चर्चा ठेवणे उपयुक्त ठरेल. खूप वर्षांपूर्वी "मरावे कोल्हापुरी" हा लेख वाचला होता. कोल्हापूरचे स्मशान सुशोभित असल्यामुळे, असा लेख लिहीण्यात आला होता. या छान अशा स्मशानांमुळे, स्मशान वैराग्यहि तिथे येत नसे.

पोरबंदर येथील एका स्मशानाला सर्वोत्तम स्मशान असे बक्षिस मिळाले आहे.

मुंबईतील स्मशान सुशोभित केल्यास, तेथे वेगवेगळी झाडे लावल्यास, त्या त्या विभागातील स्मशान एक हिरवे, सांस्कृतिक केंद्र बनू शकते. व्याख्यानमालांना, सभांना, एक उघडे व्यासपीठ मिळू शकते. गुजराथच्या पोरबंदर येथील ज्या एका स्मशानाचा उल्लेख, जगातील सर्वोकृष्ट स्मशान असा केला आहे, तिथे लोक डबे घेवून सहलीला येतात. त्या हुषार लोकांनी, खरोखरच, जगण्या एवढा मृत्यूही सुशोभित केला आहे. मृत्यू म्हणजे काय?

झाडाशी निजतो आपण  
झाडात पुन्हा उगवाया.

तो लेख खूपच छान होता.

# ६ आईच्या हाका

मला आज आईच्या हाका ऐकू येताहेत
मी माझी आईच आहे जणू
आताशा या वाढत्या वयाबरोबर
मी खूपशी आईसारखी दिसायला लागलेय
जीव हरवून बसलेली असह्य नजर
ओढग्रस्तीला लागलेले अवघे शरीर - सारं तिच्या सारखेच!
आणि सवयही लागलीय तिची तशीच
"ओ" न येणाऱ्या हाका मारत बसायची
आई तुझ्या अनावर आर्त हाकेला
उत्तर द्यायचे आम्ही टाळत होतो
तेव्हा असच थारोळं साठायचं का ग ?
तुझ्या विझलेल्या अपमानित डोळ्यात
खर सांगू का ते सारं आता आठवून
पाझरणारे हे डोळे पुसायला
हवाय आई तुझा पदर!
देशील आई देशील?
तुला जगवण्यासाठी मी काहीही करू शकत नाही
हे लक्षात आल्यावर मनात विचार आला
तुझी तू जगत होतीस तेव्हा तरी

तू जगावंस असं तुझ्या साठी, माझं काही चाललं होत का?

मी तुझ्या साठी काय केले?काहीही नाही. हूंदके देवून आता ऊपयोग नाही.

आई साठी करण्यासारखे खूप काही असते. पण तिला गृहीत धरून आपण काहीच करत नाही. आणि तिच्या श्राद्धाला मात्र डोळे टिपून, ताटभर जेवण वाढून, कावळा शिवायची वाट पाहत बसतो. तरीही आई मुलाला आशीर्वाद देते.

आईचे प्रेम असे असते. आई चे लाड असे असतात.

कदाचित लोक, म्हणून तर अपराधी भावाने घराचे नाव ‘मातृकृपा’ठेवतात. रिक्षावर सुद्धा "आई तुझा आशीर्वाद" लिहिलेले असते. शाळेतल्या पहिल्या इयत्तेत नेहमी "आई " या शब्दा बद्दल व शिर्षकावर निबंध लिहायला सांगतात.

सर्व देवतांना मातृ समान मानले जाते. "माँ तुझे सलाम" म्हणून जन्मभूमिचा, मातृत्वाचा सन्मान केला जातो. आईच्या मृत्यू नंतर सुद्धा आईच्या नावाने संस्था काढल्या जातात. आई सर्वोकृष्ट संबोधन असते.

चाईल्ड इज फादर ऑफ मॅन. मदर ईज वर्ल्ड

आईच्या हाका कानी पडत आहेत,

पण आता आई नाही

## ७ कुणाची तरी सोबत

एकटेपण फारसे कुणाला आवडत नाही. कुणाची तरी सोबत हि किती सुखद गोष्ट असते. जर ती सोबतची व्यक्ती समविचारी असेल तर मग तर मजाच असते! या क्रुर जगात, भाबड्या त्या बावऱ्याला तशीच सहचारी किंवा मित्र मिळाला तर? त्या भाबड्या डोळयातून ठिबकत असलेले निखळ बावरेपण, बघून कुचकी व्यक्ती सुद्धा स्तब्ध होईल. आपल्या स्वतःचा त्या निखळ आरस्पानी विश्वात आपल्याच तालावर तो बावरा नाचतो. त्याची पावले थिरकतात. तो सुद्धा त्या त्याच्या आवडत्या गाण्यावर नाचतो!

या भाबडया व्यक्तीचे मौन आणि त्याची मदहोशी सुद्धा देवघरातील समईतील दिव्याच्या वाती समान संथ मंद आहे. ही मदहोशी, वलयांकित पंचतारांकित नाही. या बावऱ्याला या सर्व शहाण्या व चतुर लोकांमध्ये एक सोबत हवी असते. भाबड्या धुंसर मदन भैरवीत, रंगत रंगाप्रमाणे, एक गीत उमलण्याची आस आहे. हात हाती हवा आहे. भाबडी व्यक्ती बोलत नाही, दाखवत नाही. तिलाही ती अनामिक ओढ आहे. हृदयाचे ठोके जलद करणाऱ्या, त्या भावनां मुळे बावरा सुद्हा रात्रभर कूस पालटवत, अस्वस्थपणे जागतो आहे. कुणाच्या तरी नजरेच्या बाणाने, नवख्याची शिकार केली जात आहे. या बंद कळी सारख्या अबोल बावळटपणा कडे झुकणाऱ्या व्यक्तीच्या, चेहऱ्यावरुन नकळत, हळुवारपणे तो घुंगट सरकतो आहे. हळूहळू पडदा दूर होत आहे. त्या बावऱ्या मनाचे स्वप्न उमलते आहे.

गरुड पक्षी एकटा उडतो, थव्याने छोटे पक्षी उडतात अशा वाक्यांनी जरी मनाची समजूत घातली, तरी एकटेपण जाणवते.

जगण्याकरिता कुणाची तरी सोबत हवी आहे.

# ८. पुस्तके सांगतात गोष्टी

पुस्तके हि प्रत्येक वाचकाचे, कधीही दगा न देणारे मित्रसमूह असतात.

मी एका सेलिब्रिटीची मुलाखत घेताना तिला प्रश्न विचारला गेला, "तुम्हाला पुस्तके कशी आवडतात?" तुम्ही फक्त फोटोत दिसण्या साठी पुस्तक उचलता?”

तिने उत्तर दिले, "मला नवी कोरी व्यवस्थित रचून ठेवलेली पुस्तके आवडतात. नव्या कोऱ्या पुस्तकांचा वास मला खूप आवडतो. ”

मला तिच्या त्या मुलाखती नंतर, एका साहित्यिकांकडे जाण्याचा योग्य आला. ते म्हणाले, "अरे वा! तुमच्या हातात असलेले पुस्तक, बरेच हाताळले गेलेले दिसतंय. बऱ्याच जणांनी हे पुस्तक वाचलेले दिसत आहे. माझे पुस्तक इतके लोक-वाचक वाचतात याचा मला खूप आनंद झाला आहे. ”

प्रकाशना नंतर त्या लेखकांबरोबर आम्ही जेवण करायला गेलो. तेव्हा ते म्हणाले, "होता तेवढा पैसे या पुस्तकात घातला, मला माझे पुस्तक हातोहात विकले गेलेले बघायला आवडेल. "

मला त्या लेखक-प्रकाशकाने विचारले, "तुझे पुस्तक छापले जावे असे तुला वाटते? तुला कशी पुस्तके आवडतात?” मी मुग्धसे हसून विषय टाळला. कार्यक्रमानंतर परत चालत घरी येतानाही, माझ्या तना मनात तोच विषय घोळत होता.

तुला कशा प्रकारची पुस्तके आवडतात? इतिहासाची, वर्णनात्मक, कथा, कादंबऱ्या, कविता? फौंटनला वळसा घालून जाताना, रस्त्यावर फुटपाथवर विकली

जाणारी अनेक पुस्तके होती. मी काही काढली, चाळली, वाचली, व लोकल पकडण्यासाठी धावत धावत एक अगदी जुने पिवळया पानांचे जीर्ण झालेले पुस्तक विकत घेतले. व्हीटी स्टेशनवर आले. लोकल गाडी उभीच होती. लवकरच चालू होत होती. हॅन्डल हाताने पकडून, पटकन चढले. दारापाशीच उभी राहून ते पुस्तक चालायला सुरुवात केली. मला अलिबाबाची गुहा सापडली होती.

पुस्तकाचे मूल्य त्याच्या नवेपणावर थोडीच अवलंबून असते? नेव्हर जज द बुक बाय इट्स पर्चेस व्हॅल्यू, ऑर कव्हरपेज, जज इट बाय कॅन्टेन्टस.

"ग्रंथ हेच गुरु"पुस्तके हाच मित्र, पुस्तके सोबती असतात. कधी चीड देतात, उपरोधिक बोलतात, कधी धारदार टीका करतात, कधी दुखऱ्या हळव्या कोपऱ्याची गजल बनतात, बाबा साहेब आंबेडकर यांचा कुठलाही पुतळा, पुस्तकांशिवाय नसतो. देवी देवतांच्या फोटोमध्ये सुद्धा भूर्ज पत्रावर, पानांवर लिहिलेली पोथी असते. गणपतीच्या फोटोतसुद्धा पोथी पुस्तक असतेच. अभ्यासकांची, शाळांची, विचारवंतांचे घरी स्वतंत्र अशी वाचनालये, सुसज्ज अशी ग्रंथगृहे, अशा अभ्यासिका असतात. नियमानुसार त्या वेळी जे पुस्तक हवे ते संदर्भ म्हणून वाचता येते.

सुरचित असा शब्दांचा मोठा डबा, कल्पनांचे मोठे रांजण म्हणजे पुस्तके होय.

आवडलेले पुस्तक जर वाचले तर ते मला आनंद कसा घ्यावा हे. सुख कसे लाभते, मी धैर्य कसे ठेवावे, कसे जगावे हे नकळत सांगून जाते. काही पुस्तके घेऊन जा, मात्र नंतर एकदा वाचून झाल्यावर कधीही ती वाचू शकता. ती मवाळ असतात. तशी टणक सुद्धा. सृजनाच्या काळाच्या लढाईत टिकणारा पुरावा म्हणजे पुस्तकच असतात.

मी घरी पोचले. रात्री झोपेत सुद्धा मला ती फुटपाथवरची पुस्तके दिसत होती. एक काळ त्या पुस्तकांनी गाजवला असेल. त्या पुस्तकात, त्या लेखकाची स्वप्ने असतील. कधीतर खरेदी करणाऱ्याची हौस असेल. भांवना असेल. "पुस्तके जपून हाताळावीत" असे सांगत त्या खरीददाराने, त्याने/ तिने ती पुस्तके जपली असतील. कुणाला वाचायला दिले तरी, ते पुस्तक परत मागून आणले असेल. कुणी फक्त मालकी हक्क गाजवण्याचे अहंकारासाठी पुस्तके खरेदी केली असतील. आणि घरी गेल्यावर त्यांना घरातल्या रद्दीत किवां अडगळीत टाकले असेल. काही दिवस प्रेम करून मग ती पुस्तके सेकंड हॅन्ड म्हणून विकली असतील. त्या पुस्तकांना देखील नवीन खरेदी केलेल्या पुस्तकांची असूया वाटली असेल.

कारण त्यां पुस्तकांना खरेदी करणारा नव्या पुस्तकात रमल्याने, त्याने जुन्या पुस्तकांना माळ्यावर टाकले ना! पुस्तकांना सुद्धा भावना असतील का? जीर्ण पुस्तके सुद्धा बुक वाइंडिंग केल्यावर ताजीतवानि होतात. तरीही जरा मरण कुणाला चुकले आहे? काही काळाने त्या पुस्तकाची खऴ कुजून दोरा तुटून, त्यातील पाने वेगळी होतात. एक दिवस पानांची सुद्धा खपली पडते. तुकडे होतात व पुस्तकांचे आयुष्य संपते. मानवाचे जीवनसुद्धा, एका पुस्तका सारखेच असते ना? आशय असेल, तर त्या पुस्तकाला काही काळ काही अर्थ राहतो. त्यांच्यात गर्भितार्थ असेल, तर पुस्तक नजरे आड झाल्यावर सुद्धा ते पुस्तक मनात रेंगाळते, ते विचार मागे राहतात. न आवडणारे वृद्ध माणसांना काही जण वृद्धाश्रमात टाकतात. तशी काही पुस्तक नजरेआड पडतात. त्याचे त्याचे नशीब! पण म्हणून पुस्तकांचे महत्व कमी होत नाहीत. पुस्तके हि मित्र असतात.

प्रकाशित पुस्तक हा कालातीत ठेवा असतो.

पुस्तके सांगतात गोष्टी, वाहून गेलेल्या दिवसांची युगायुगाची.

विश्वाची माणसांची. आजची, कालची, उद्याची, एका एका क्षणाची.

झाड, हिरव्या पानांनी सळसळावे अशा सुखाची

निष्पर्ण फांद्यांवरच्या एकाकीपणासारख्या दुःखाची

वाऱ्यावर झुलणाऱ्या फुलांची, नाती मेलेल्या मुलांची

जिंकलेल्या रणांची, हरलेल्या मनांची, प्रेमाची द्वेषाची ||1||

अहो वाचायला लागा म्हणजे

पोहोचायला लागाल. हव्या त्या ठिकाणी.

पुस्तके काही सांगू इच्छितात,

तुमच्या सावलीत रांगू इच्छितात.

ती वाचा हो एकदम मन लावून ऐका,

पुस्तके सांगू इच्छितात, पुस्तके सांगतात गोष्टी

वाचत राहा, वाचते व्हा.

जो वाचेल त्यालाच सुचेल, जो वाचेल, तोच जगी वाचेल.

## ९. कोटी कोटी रूपे बहीणींची

एका स्त्री चे दुसऱ्या स्त्रीशी असलेले नाते सुसंवादी असेल, तर जीवनात, किती प्रकारे आनंद मिळू शकतो. याचे उदाहरण म्हणजे माझी बहीण होय. 1984 साली आई वडिलांचा अपघाती मृत्यू नंतर या अफाट जगात, आम्ही दोघी बहिणी एकाकीच होतो. बहिणीचे लग्न झाले होते व तिला लहान मुलं होती. ज्या ज्या वेळी आवश्यकता वाटेल, त्या वेळी माझी बहीण, माझ्या मदतीला धावून येई. माझ्या मेहुण्यांनी तर मला स्वतःच्या मुली प्रमाणेच वागवले, माझी मोठी बहीण माझी आई झाली.

1987 साली माझ्या लग्नात माझ्या मोठ्या बहिणीने पुढाकार घेतला. माझ्या बाळंतपणाचे वेळी, मुलाच्या आजारपणात, पाळणाघर बदलत असताना, तिचे घर व तिची मूले शेजाऱ्यांवर सोपवून माझी अडलेली वेळ, नड काढून नेण्यात, बहीण मदतनीस ठरली. अगदी माझ्या मुलगा सुद्धा बालपण पासून "माय मरो मावशी जगो" म्हणावे इतक्या प्रकारे तिला लळा लावून आहे.

फक्त कर्तव्य पार पडणे, एवढाच पैलू आम्हा दोघी बहिणींच्या नात्यात नाही. तर आम्ही अगदी जिवलग मैत्रिणी प्रमाणे खेळीमेळीने वागतो. अवघड, गहन विषयांवर चर्चा करतो. एकमेकींच्या कादंबऱ्या कवितांमध्ये बदल सुचवतो. वेळोवेळी संपादनाला मदत आणि लिखाणावर टीका करतो. तिच्या नात्यामुळे माझे आयुष्य खूप समृद्ध झाले आहे. माझे मन जाणून माझ्या प्रत्येक प्रसंगी माझ्या

पाठीशी उभी राहणारी, माझी बहीण माझ्या जीवनातील सर्व नातेसंबधाच्या मुकुटां मधील हिरा आहे.

एक अंगाई गीत जे ती गाई ते अजून आठवते

मी वासंती आऴविते अंगाई

छकुल्यानो तुमची ताई

कोटी कोटी रूपे बहीणींची

सखी सवंगडी बनन्याची,

बहीन हीच सही सखी मनाची

# १०. आय हेट टिअर्स

अश्रू हे मोती असतात. रडणे हा मानवाला मिळालेला एक खास अधिकार आहे.

अश्रू हे, मन जीवंत असण्याचे लक्षण आहे.

जेव्हा केव्हा बाळ जन्माला येते, तेव्हा ते रडले पाहिजे म्हणतात. म्हणजेच नव्या जन्माची, जीवनाची सुरुवात अश्रुंनी होते. नवीन मार्गावर किंवा नवीन विश्वात जाताना, कदाचित नवीन खजिन्याच्या शोधात भटकंती करताना, असे अश्रू निघत असावे, निघतात.

आई सांगे "उगीच टिपे गाळू नकोस"

“ज्यांच्या साठी तू रडतेस त्यांची एव्हढी लायकीच नसते कि तू त्यांच्या साठी रडावे. “असा सल्ला माझे वडील नेहमी द्यायचे.

“रडताना कधी खाली बघून रडू नये. वर बघावे. " मुलगा सांगतो. त्याचे कारण सांगताना तो असे म्हणतो, की वर स्वर्गात बसलेल्या देवाकडे नजर टाकावी, तो देव, त्या अश्रूंची नोंद घेतो. चित्रगुप्ताच्या वहीत, आपण अश्रू गाळले याची व ज्याने आपल्यावर अश्रू गाळण्याची वेळ आणली, याची नोंद करतो. देवाकडे सगळा हिशोब असतो, देव न्याय करतो.

कधी खेळणी तुटली, हरवली, कि मूल रडते. काहीतरी हवे म्हणून हट्ट करून कांगावा करते. म्हणजे अश्रूंची किंमत व कार्यकारण भाव, मानवाला

बालपणापासूनच माहित होतो. रडणे हे हत्यार कसे वापरायचे हे माणूस, फार लहान वयात शिकतो. स्त्रियांचे हत्यार म्हणजे रडणे. असे पुरुष बायकांना चिडवतात. रडण्याच्या कुंपणातून पुरुष बाहेर जाऊ शकत नाही व बायकांच्या रडण्याला तो शरण जातो असे म्हणतात. अर्थात हे सर्व सज्जन, सभ्य, सामान्य व्यक्ती बद्दल असते. काही व्यक्तींना "मी इतक्या जणांना रडवले, " हे सांगताना विकृत आनंद वाटतो. हीच माणसे मात्र स्वतःवर वाईट वेळ आली कि आपण किती जणांना रडवले हा हिशोब विसरतात. नारिंगीमठ नावाचे गुरु म्हणतात

'मृत्यूचे राज्य दिसायला लागले कि अश्रू आपोआप गळतात. ' दुसरी व्यक्ती रडत असताना दुर्लक्ष करून खुश राहणारे असतात. मुद्दाम तिला दुखावण्यासाठी, अजून रडवण्या साठी "काय झाले?" विचारणारेही असतात. तिच्या जागी आपल्यावर रडायची वेळ आली असती, पण आपण तोंडात साखर ठेवली, खोटं बोलून, चापलुसी करून, नीतिमूल्यांशी तडजोड करून खुश राहिलो. याचा आनंद आतल्या आत मानणारे, त्या अश्रुंना हसतात. वेदना असह्य होऊन रडणाऱ्याकडे, हि माणसे सोयीस्कर दुर्लक्ष करतात. कधी अश्रुंचे शब्द होतात, कधी मोती होतात. तर कधी फुले होतात. "अश्रूंची झाली फुले" नाटका प्रमाणे अश्रू हि दुर्लक्ष करण्याजोगी गोष्ट निश्चित नसते. आईच्या अश्रूंचा सूड घेणाऱ्या मुलासाठी, आईचे अश्रू हे अणू बॉम्ब सुद्धा बनू शकतात. "मेरी माँ कि आसू ओंका बदला चुकाना है. " असे म्हणत शत्रूशी लढणारे नायक चित्रपटात दिसतात.

तो चित्रपट असल्यामुळे त्या अश्रूंचा बदल घेण्यात ते यशस्वी सुद्धा होतात. रडत रडत देवळात गाऱ्हाणे घालणाऱ्या नायिकेची किंवा लहान मुलाची समजूत

घालायला, त्याचे दुःख दूर करायला, चित्रपटात, प्रत्यक्ष देवसुद्धा येतो. किंवा घंटीला देवळाच्या दरवाजा जवळील वेलीवर असलेला नाग, साप, गरुड, किंवा तत्सम प्राणी, खलनायकाचा खातमा करतो. ह्या चित्रपटांचा वास्तवाशी, काहीही संबंध नसतो. रडणाऱ्या व्यक्तीची दया येण्या एवढी कणव हल्ली कुणालाच नसते.

हळव्या रडणाऱ्या व्यक्तीला, अव्यावहारिक, इमोशनल फुल म्हटले जाते. इमोशनल अत्याचार व रडण्यास प्रवृत्त करणे, हा दखलपात्र गुन्हा होऊ शकत नाही. तसे प्रत्यक्षात आयुष्यात, वास्तवात अश्रुना काहीच मोल नसते. दरवर्षी होणारी गुन्ह्याची वाढती प्रकरणे, स्त्रियांवरील अत्याचार, न्यायालयातील खटले, कज्जे, पोलीस स्टेशन वरील खऱ्या खोट्या तक्रारी, कुटुंब न्यायालया बाहेर रडत बसलेली मुले व कुटुंबीय बघता, ‘अश्रुंचे मोती होतात’हि पंक्ती कालबाह्य झालेली असावी. इतर सर्व "डे" प्रमाणे उदा. मदर्स डे, फादर्स डे " क्राइंग डे " रडण्याचा दिवस ठेवावा.

रडणे हे आरोग्यासाठी चांगले असते. डोळे स्वच्छ होतात. हृदय हलके होते. काही संस्था मध्ये नोकरी करणार्यांना व चांगले काम करणार्यांना इतका त्रास दिला जातो, कि त्यांचे घोषवाक्य "कभी खुद्द पे कभी हालात पे रोना आया. असे ठेवावे लागते.

ज्या वाटेवरून मी जात राहिले, त्या जागेवर माझे अश्रू पडले. तिथे तिथे मी त्याच वाटेवरून परत येताना थबकले. माझ्या त्या अश्रूंची कोणतीही निशाणी तिथे नव्हती. जग त्याच्या त्या स्वतःच्या गतीने, स्वार्थाने, दुर्लक्षाने, अलिप्ततेने पुढे पुढे चालत होते.

कौन रोता है किसी और के खातीर ए दोस्त, सबको अपणीही किसी बात पे रोना आया.

"आसू भरी है ये जीवन कि राहे

कोई उनसे कह दे हमे भूल जाये.

हे म्हणण्याचा काळ सुद्धा आता गेला. हल्ली कुणाला ‘उनसे कह दे भूल जाये ‘ सांगायची गरज नसते. ते ईतर लोक, आपल्याला विसरून, पुढे स्वार्थामागे धावत गेलेले असतात. मागे राहिलेल्या माझ्या सारख्यांनाच वाटते,

आसुभरी है ये जीवनकी राहे

असे आहेत हे रस्ते.

आज मी बघितले. जिथे माझे अश्रू पडले तिथे सुगंधी फुले उमलली आहेत. मी मात्र पुढे निघून आले आहे. माझ्या अश्रुंचे शब्द झाले आहेत. त्यांना मोल आहे कि नाही, मला समजत नाही. किंवा ते अश्रू मातीमोल झाले म्हणून मी रडते आहे.

अमरप्रेम चित्रपटात राजेशखन्ना "आय हेट टिअर्स पुष्पा" असे वारंवार म्हणतो. मात्र सर्वात शेवटी तो म्हणतो, "रोने में इतनी ख़ुशी है?" तो बहने दो इन आसूओंको" अश्रू हे आनंद व दुःख दोन्हीही प्रसंग साजरे करतात.

आय हेट टिअर्स असे अहंकाराने म्हणू नये.

## ११ अश्रूंची झाली फुले

आपला दुबळेपणा दिसू नये म्हणून पुरुष रडत नाहीत. रडणे हा बायकांचा गुणधर्म मानला जातो.

“मैं खुश हू मेरे आसूओंपे न जाना" असे म्हणून, दुःख लपवणारी एखादी व्यक्ती असते तर कधी "ये आसू मेरे दिल कि जुबां है" असे हि म्हटले जाते. “तेरे आखों से आसू पी जाऊं, ऐसी मेरी तकदीर कहा. " असे म्हणणारा प्रेमिक असतो. "अश्रूंची झाली फुले" हि कवी कल्पना असते. "रोना कभी नही रोना चाहे टूट जाये कोई खिलोना.” अशी समजूत काढतात, प्रत्यक्ष शंकर भगवान, जटाधारी शिव शंभो, यांनी जेव्हा विष प्राशन केले, तेव्हा त्यांच्याही डोळयात अश्रू आले. शंकर देवांचे अश्रू रुद्राक्ष म्हणून जमिनीवर पडल्याची कथा आहे.

अश्को मे जो पाया है गीतो मे दिया है

फिर भी सुना है कि जमानेको गिला है

असे एक प्रसिद्ध गाणे आहे. रडणारी व्यक्ती रड म्हंणून रडते किंवा "रडू नको" म्हणून रडणे थांबवते का? यावर संशोधन झाले असता, रडण्यावर बाह्य उपाय चालत नसून, डोळयातून अश्रू वाहने हि प्रतिक्षिप्त क्रिया असावी, असा निष्कर्ष निघाला.

"तुम मिल जाते तो हो जाती पूरी अपनी रामकहानी

हर घर ताजमहल बन जाता, गंगाजल आखोंका पानी.

हे अश्रुंचे पावित्र्य आहे. एका रानफुलाला सीतेची आसवे असे नाव आहे. हे फुल अश्रूं सारखे दिसते व पठारावर मुबलक असते. "खून के आसू रुलाऊंगा" म्हणजे खूप रडवणे. असा वाक्प्रचार आहे. त्यामुळे काही फुले लालसर सुद्धा आहेत. शेतकरी पावसावर अवलंबून राहून नेहमीच अश्रू गाळतो. शेतक्ऱ्यांचे अश्रू अतिशय खेदजनक वाटतात.

जीव आहे खजील झाला,

डोळे झरती आभाळाला. क्षमा याचितो आई.

दीनवाणी विनवणी माझी. भिडू देत काळजाला.

आता अंत नको ग पाहू बाई

देवा रे बोलावी पर्जन्याला"

शेतक्ऱ्याने आत्महत्या करताना

"मेरी याद मे तुम ना आसू बहाना, न जी को जलाना, मुझे भूल जाना. अशी विनंती केली असेल का?

जरी व्यक्ती दुखावली गेली, ती आठवण वाईट असली, तरी जिथे अश्रू पडतात, ती जागा आपल्याला नेहमीच आठवते.

अश्रू हे नेहमीच गंगाजलाहून अधिक पवित्र असतात.

# १२ खेळण्याचे दुकान

खेळण्यांशी खेऴण्यामध्ये खूप आनंद असतो. रंगीबेरंगी स्वप्नील, अशा त्या खेळण्यांमध्ये, लहान मुलांबरोबर आपणसुद्धा रमतो. पण खेळणे विकणाऱ्याला किंवा खेळण्याचे दुकान चालवणाऱ्याला या खेळण्यांची किंमत, रुपये अमुक अमुक एवढीच असते. खूप हौशीने खेळण्याशी, स्वतः खेळत ती खेऴणी विकणारा, लहान मुलांना हसवणारा, खेळण्याच्या दुकानातील दुकानदार मी अजून तरी बघितला नाही. लहान मुलांना खेळ आणि स्वप्ने पुरवणाऱ्या या दुकानात नक्की काय काय असते ते बघूया.

1. गाड्याच गाड्या- जीप, बस, आगगाडी, पोकलेन, लहान मारुती कार, मोठ्या भरी गाड्या अशी खेळणी मिळतात. लाकडा पासून धातुपर्यंत, सर्व प्रकारच्या गाड्यांशी मुले खेळतात.

2. डॉक्टर सेट- प्यार का दर्द है मिठा मिठा प्यारा प्यारा !मग या दर्द साठी डॉक्टर हवाच ना? "डॉक्टर सेट" हा लहान मुलांच्या खास खेळण्यातील विशेष लोकप्रिय प्रकार आहे. थर्मामीटर, ऍप्रन, हातमोजे, स्थेथ्यस्कॉप औषधाच्या बाटल्या ई. सामान या सेट मध्ये असते. अगदी सामान्य घरातील मुले हि डॉक्टर बनायचे स्वप्न त्यामुळे बघतात.

3. आगीचा बंब- चंदन बनुनी अग्नी भोगावा, म्हणणारे संत अग्नीचा सन्मान, सामना, कसा करतात? तेच जाणे या बंबाला आवाज, सायरन, शिडी, लालदिवा असतो.

'हि पोळी साजूक तुपातली, तिला म्हावऱ्याचा लागलाय नाद!'असे वाटावे, तसे, तसे अगदी साधे मूल सुद्धा आगीचा बंब किंवा रुग्णवाहिका आणून खेळते, बंदूकी आणून युद्ध खेळू शकते.

4. मासेमारी सेट- प्लास्टिकचा गळ, रबरी मासे, मासे ठेवायला केनची टोपली, मॅग्नेट वर पकडले जाणारे मासे, मुले मस्त खेळतात.

5. भातुकली-

हे हृदय कसे आईचे मी उगाच सांगत नाही.

जे आनंदेही रडते, दुःखात कसे ते होई.

ही कुटुंब माया भातुकली शिकवते. भावंडे, बाळ घेऊन खेळणारी ताई, स्वयंपाक करणारी आई असते, भातुकली सेट मध्ये गॅस, शेगडी, फिल्टर, मिक्सर भांड्यांची मांडणी, विळी, सूरी, कढई, चमचे, ताट वाट्या, असतात. शेंगदाण्याचे लाडू चारमुऱ्याचा भात, मुले खातात.

या खेळण्यातून कौटुंबिक वागणुकीचे पायंडे पडतात.

6. ठकी ते बार्बी - लाकडी बाहुलीपासून भारी बार्बी पर्यंतच्या बाहुल्या बाजारात विकत मिळतात. सोनेरी केस असलेली व आडवी करताच डोळे मिटणारी, रडणारी, तोंडात चोखणी देताच रडणे बंद करणारी अशी बाहुली मिळते.

बालकांना या बाहुल्यांचे केस विंचरणे त्यांना कपडे शिवणे, त्याचे हात पाय हलवणे, त्यांच्याशी बोलणे आवडते. यातून मुलांचा भावनिक विकास होत असतो. त्या बाहुल्यांचे साहित्य मोबाईल, पर्स, बूट विकत घेता येते.

7. जियाजो- बाहुल्यांचा प्रकार आहे, त्यात प्लास्टिक किंवा रबराची छोटी खेळणी असतात. ज्यात मुले रमतात.

8. शाळा शाळा- फळा, स्टॅन्ड, खडू, पुस्तके, यामध्ये मुले खेळतात. छडी घेऊन शिक्षक होणे, शिकवणे, हा बालकांचा दुपारचा आवडता टाइम पास होऊ शकतो.

9. प्लॅस्टिकची खेळणी जत्रेतील खेळणी- हनुमानाची गदा, तलवारी, धनुष्य आणि बाण, मातीचे पक्षी, मातीचेच प्राणी, किंवा, कचकड्याच्या बाहुल्या, रंगीत फळे हि खेळणी, लाकडी खेळणि देखील लोकप्रिय असतात.

10. व्हिडीओ गेम- टेक्निकी शोधानंतर संगणकावर मोबाईलवर लहान मुले व्हिडीओ गेम्स खेळू शकतात.

11. मैदानी खेळ खेळायला, मुलांना प्रवृत्त करायला हवे, बॅटबॉल, फूट बॉल, रबरी बॉल, टप्पे टप्पे, मोठे रबरी बॉल, विटी दांडू, गलोरी, या मध्ये स्नायूंचा विकास होत असतो.

12. मेकॅनो - प्लास्टिकचे तुकडे जोडून एखादी इमारत एखादे चित्र, बनवणे ह्या खेळण्याने मुलांची कल्पना शक्ती विकसित होते. लहान तुकड्यां पासून मोठ्या तुकड्यानी सुंदर इमारत, बाग, प्राणी, घरे, पूल, जहाज, गाड्या बनवण्यात मूल रमते. एकटी मुले, एकटी असतानाही मेकॅनो मध्ये रमतात. विज्ञान व रचना शास्त्र शिकतात.

१३. आकाशातील तारे- अंधारात चमकणारे आकाशात चमकणारे असे छताचा चिकटवता येणारी प्लास्टिकची ताऱ्यांची प्रतिकृती विकत मिळते.

लहान मूल चिमण्याऴ्या कडे बघून जसे रमते, तसेच ते या आकाशाच्या ताऱ्यांना बघून खुश होते. जरा मोठे झाल्यावर, ग्रह तारे ओळखायला शिकते.

१४. खाद्यपदार्थ - हॉट डॉग, बर्गर, फळे, पेयांच्या बाटल्या, दुधाची बाटली, अशी छोटी खाद्यपदार्थाची खेळणी मिळतात. मात्र लहान मुलं ती तोंडात घालणार नाहीत याची खबरदारी घ्यायला हवी.

१५. वेगवेगऴी कॉमिक चित्रे, कार्टूनस, रबरी, फुगे रुपी मिऴतात.

सूचना-

१. लहान मुलांना आपला खेळ खेळून झाल्यावर आवरून ठेवायची सवय लावावी. एखाद्या ड्रम मध्ये अथवा, पुठ्ठयाच्या खोक्यात खेळणी ठेवून, ती खेळून झाल्यावर परत जागी ठेवण्याची सवय त्यांना लावावी.

२. इतर मुलांमध्ये मिसळायला, खेळायला, गप्पा मारायला, मुलांना जरूर पाठवावे.

३. बालकांचा काही वेळ मैदानी खेळांसाठी राखून ठेवावा.

४. चित्रकलेला प्रोत्साहन द्यावे.

५. एखादे झाड लावून ते वाढवणे, पाणी घालणे, त्याची निगा राखणे, शिकवावी.

६. एखादा पाळीव प्राणी, (शक्य असल्यास) पाळावा,

७. फरचे प्राणी- मऊ कापसाच्या एखाद्या टेडी बेअरचा उपयोग पाळीव प्राण्या ऐवजी करून मुलांना भावनिक वाढ होण्यास मदत करता येते. प्राण्यांशी कसे वागावे ते कळते.

८. मुलांना राक्षस, बागुलबुवा, अंधार यांची भीती घालू नये.

९. काही काळाने मुले, जुन्या खेळण्यांकडून नव्या खेळण्याकडे वळतात. हे स्वीकारावे. कपाटात, शोकेस मध्ये रचण्यासाठी खेळणी नसतात. बालकांना खेळू द्या. तसे संपूर्ण जगच एक आकर्षक खेळण्याचे दुकान आहे. प्रत्येक व्यक्तीची आवड

वेगळी, खेळणी वेगळी असतात. त्या त्या खेळण्या मध्ये रमण्याचा काळ वेगळा असतो. खेळणी हि वेळ घालवण्याची सोय असते. खेळण्यात काही काळ रमलो तरीही, अभ्यास महत्वाचा असतो. ध्येय महत्वाचे असते.

तेवढी च, अर्थात खेऴणीही महत्वाची असतात.

## १३. मलमली प्रेम

सामान्यत:शारिरिक तारुण्य म्हणजे वय वर्षे २० ते ४५ हा काळ होय.

कवी सुरेश भटांची कविता आहे.

मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे,

मोकळ्या केसात माझ्या तू जीवाला गुंतवावे.

या कवितेप्रमाणे तरुणाईचे, विवाहाचे, सहजीवनाचे, सुरुवातीचे दिवस सुखात जातात. त्या दिवसांना नाद असतो. म्हणूनच त्यांना मधू चंद्राचे दिवस म्हणतात. एक विनोद आहे. नवविवाहितांचे लग्ना नंतर, पहिल्या वर्षी नवरा ओरडतो, रागावतो, बायको ऐकून घेते. दुसऱ्या वर्षी बायको ओरडते, नवरा ऐकून घेतो, तिसऱ्या वर्षी तोच तो पणा येतो. तारुण्याची मलमल जाडी भराडी होते. दोघेही ओरडतात. रागावतात, आणि शेजारीपाजारी भांडण ऐकतात.

विनोदाचा भाग सोडला तरीही मलमल, मोकळे केस, गजरे, फुलांच्या पाकळया, केशरी दूध, मेंदीने रंगलेले हात हे तिसऱ्या वर्षी पर्यंत सांसारिक तडजोडीवर येतात.

रे तुझ्या बाहुत माझ्या रूपगंधा जाग यावी.

मी तुला जागे करावे, तू मला बिलगून जावे.

असा आर्जव, असा शृंगार कल्पनेतच उरते का? कि प्रत्यक्षाहुन कल्पना उत्कट असे हे शृंगारिक वर्णन व चित्रपटातील चित्रीकरण असते. पत्नी वृद्ध झाली तरीही पती-पत्नीचे प्रेम टिकून राहावे.

ओ मेरी जोहराजबी, तुझे मालूम नहीं,

तू अभी तक है हसी और मै जवान

तुझं पे कुर्बान मेरी जान मेरी जान

अशी निष्ठा असली तर, पती पत्नी व ती असे त्रिकोणी त्रांगडे होत नाही. दूरदर्शन वरील अनेक मालिका तशाच गॉसिप असतात.

तापल्या माझ्या तनूची तार झंकारून यावी

रेशमी संगीत स्पर्शाने तू पुन्हा पेटवावे

थोडक्यात पती आणि पत्नी यांचे मधील नाते कालांतराने थोडे विझले, तरी ते दोघांनी फुलून येणे जमले नाही तरी, एकत्र यावे, जुळून घ्यावे, अशी अपेक्षा असते. कधी कधी मात्र हे जीवनाचे गणित बिघडते. त्यामुळे नित्य नैमित्तिक, सुद्धा गणित बिघडते. व संसार भरकटतात. भांडणे, वादावादी, तडजोडी, साधारणतः प्रत्येक संसारात असतात त्या क्षम्य असतात, मात्र, पती बाहेर सुख शोधायला जातो, हे क्षम्य होणे शक्य नाही. पाय घसरणे, पाऊल वाकडे पडणे, दुसरे घर करणे, अशी वाक्ये वापरून नवऱ्याच्या, त्या दुसऱ्या नात्याचा उल्लेख केला जातो. त्या अनैतिक संबंधानंतर, कालवल्या गेलेल्या वीषानंतर मग त्या संसाराचा रंगचं उडून जातो. बाहेरच्या स्त्रीचे विनाकारण अथवा सकारण वाटणारे आकर्षण हे विष असते. मात्र

पुरुष किंवा काही केसेस मध्ये एखादी स्त्री, त्या अनैतिक नात्यांत वाहून घराबाहेर जाते. या त्रिकोणात, एखाद्या कोनाचा किंवा मुलांचा बळी जातो. घरची गृहिणी, गाडग्या मडक्यातील नेटीचा संसार करते, त्या संसारात झगझगीत काहीच नसते. बाहेरवालीचे सारे क्षणिक आणि झगझगीत असते. एकनाथ महाराज भारुडात "काम " गुणाला विंचू म्हणतात. तर कधी म्हणतात

भूत जबर मोठे ग बाई !

संसारात या बाहेरख्याली अशा काम क्रोधाला दूर ठेवायला हवे. अर्थात हे सोप्पे नसते. मोहाला आवरता येत नाही. सोन्याचे हरीण नसते, हे कळूनही सीतामाता हरिणाकडे आकर्षित झाली व रामायण झाले. पूर्वीच्या कुटुंबांत साधारणपणे सर्वच संयमित असावे तेवढेच होते. सुयोग्य बंधन होते.

माझिया पायावरी आकाशगंगा लोळते.

झोकेही जाता माझ्या, विश्व होई घाबरे

झिंगलो मी पुण्यही, पायात माझ्या झिंगते

पूर्वीच्या काळी सर्वच संयमित होते ते आजही तसेच राहावे असे वाटते. द्वयार्थी संवाद, लिव्ह इन रिलेशन, लहान वयापासून वाढणारा स्वैराचार, पोर्नचा अतिरेक थांबायला हवा. कायम संस्कारांचे मोल कळायला हवे. आजची सामाजिक परिस्थिती पाहून मला वाटते, "संयम हा स्त्री व पुरुष दोघांनी ठेवायला हवा. " योग्य वेळी विवाह हा होणारच असतो, मग विवाहबाह्य प्रकरणे, विनयभंग, या

गोष्टी वाचून बघूनही हात पाय गळतात. कोवळया कळयांना सांभाळणे पूर्ण समाजाचीच जबाबदारी आहे.

शृंगार हा नवरसांमधील एक रस आहे म्हणजे त्याचे जीवनातील प्रमाण, १०० टक्के जीवनात १२% हवे. बाकी शौर्य, हास्य, वीर, करुण, इ. रस सुद्धा जीवनात यावे. शृंगाराचा अतिरेक होऊ नये.

तारुण्यातच अनेक स्वतंत्र सेनानी लढले, आपल्या देशाच्या सीमेवरील जवान तरुण वयातच देशासाठी सीमा रक्षण करीत आहेत. तारुण्य म्हणजे उपभोग नव्हे तर जबाबदारीचा काळ असतो. शिवाय प्रत्येक गोष्टीचा अतिरेक वाईटच असतो. स्त्री सुखाची लालसा अनेक गुन्ह्यांना कारणीभूत ठरते. वाढती लोकसंख्या बेकारी वाढवते. शिवाय रिकामी माणसे वेगळयाच वाममार्गाला वळायची शक्यता असते. जरी तारुण्य मलमली असले तरी, तो बसंती चोला आहे. देशभक्ती साठी वापरावा असा. पूर्वी पती पत्नी दूरदेशी गेल्यावर, त्यांची परत येण्याची वाट बघणारे झुरणारे कुटुंबीय असत. त्यात प्रेम होते. आज प्रेम व वासना याचीच गफलत झाली आहे. हाव वाढून वाढून आजार वाढले आणि असुरक्षितता वाढली आहे. "वाट बघणे" हि शृंगारातील आवश्यक बाब असते.

गंगेच्या तटावर ये तुझी घेऊन घागर

हुंदका दाबून माझा, वाट पाहीन मी तोवर

एक शिणलेल्या प्रवासी, मागतो आहे दिलासा

भिजवून लाटात इथल्या प्राण माझा हि जरासा
चार थेंबांनी विझेन सात जन्मांची पिपासा
मालकंसाच्या स्वरांनी मिटावे दोघातील अंतर

उतारवयात, पुन्हा तरुण व्हायला कोणालाही खूप आवडेल. फिरणे, पर्यटन, लिहिणे, गड चढणे, डोंगरावर जाणे, पुस्तके लिहणे, हे करण्यासाठी मला तारुण्य हवे आहे. तारुण्याचा तरुणपणाचा असा संयुक्तिक विधायक अर्थ मला अपेक्षित आहे.

शृंगाराची नदी दोन किनाऱ्याच्या आतूनच वाहावी. अन्यथा वेगळीच दुर्घटना घडून निर्भया सारखे काहीतरी घडते.

पण लक्षात कोण घेतो? पण लक्षात घ्यायलाच हवे. तारुण्य, देशसेवा, समाजसेवा, शिक्षण संशोधन या मुळेही सफल होऊ शकते. तारुण्याला निदान या सद्गुणांची झालर तरी हवी. आजचे काळात तेच अवघड झाले आहे

# १४. वाट पाहणे

संपूर्ण जीवनात आपण नेहमीच कोणत्या ना कोणत्या घटनेची, व्यक्तीची, वेळेची वाट बघतो.

१. वाट पहाते मी ग येणार साजण माझा, असे नववधू म्हणते

२. जिथे सागरा धरणी मिळते तिथे तुझी मी वाट पहाते. असे प्रेयसी म्हणते. पण हे पुढे बघा

३. कोई नही है फिर भी है मुझको, न जाने किसका इंतजार ?

म्हणजे "कोणी नाही" तरीही नसलेल्या, त्या कुणा व्यक्तीची, वाट मानव बघत राहतो. "इंतजार " शब्द खूपच हिंदी शायरीतला वाटतो. पण शेवटी प्रत्येकच जण, वाट बघणारा, वाट बघतच असतो. रोजच्या दिनचर्येचा कंटाळा आला, कि सुट्टीची, रविवारची वाट बघतो. खरे पाहता या दिवशी विश्रांती ऐवजी अधिक काम व कामाचा बॅकलॉग क्लिअर करणे, हे मोठे काम येते. रविवारी सुट्टीच्या दिवशी, या आवडत्या दिवशी कामाने दमून वाटते. "जेली फिश, ऑक्टोपस सारखे मला खूप पाय असते, खूप हात असते., तर अधिक काम करता आले असते. असे म्हणत राबायचे व पुढच्या सुटीची वाट बघत, पुन्हा धावायचे. जीवनाचा अविभाज्य भाग असतो तो म्हणजे वाट बघणे., उद्याचा दिवस आजपेक्षा अधिक चांगला, येईल, या गोष्टीची वाट बघणे म्हणजे इंतजार करणे.

१. इंतजार कि घडिया बंडी लंबी

२. इंतजार का लूफ्त इंतजार करने वाली हि जाने.

३. उम्रे दराजसे मांग के लाये थे चार दिन, दो आरजू मे कट गये, दो इंतजार मे

४. हम इंतजार करेंगे कयामत तक, खुदा करे के कयामत हो और तू आये.

५. इंतेहा हो गयी इंतजार कि

६. इंतजार इंतजार इंतजार! किसी साथी को, किसी प्रेमी का किसी के आने का इंतजार

एकटी व्यक्ती आयुष्यात कुणीतरी यावे म्हणून वाट बघते. जर आवडते माणूस गावी गेले कि ते माणूस परत यावे म्हणून मग इंतजार केला जातो. बळीराजा कडून पावसाची आतुरपणे वाट बघितली जाते.

तर कधी लॉटरी लागावी, गरिबी दूर व्हावी, संकट जावे, म्हणून माणूस वाट बघतो. वाट बघणे सुद्धा किती प्रकारचे असते.

दवाखान्यात नंबर यावा म्हणून वाट बघणे, नंबर यावा म्हणून संयमाने वाट बघणे. (पेशंट) बाळंतपणाचे नऊ महिने नव्या जिवाच्या येण्याची वाट पाहणे. कंटाळवाणे दिवस लवकर जावे, म्हणून सुद्धा वाट बघितली जाते. किती सहजपणे आपण पेपर वाला/ कामवाली येण्याची वाट पाहतो. रोजची कामे असे म्हणतो. पण ती हि वाट बघण्याचीच क्रिया असते. मात्र फारशी वेदना नसलेली, नित्य नैमित्तिक

वाट बघण्याची रीत असते. मात्र रात्री वाट बघताना, आकाशातले तारे मोजावे, दिवसा वाट बघताना रस्त्यावरून जाणाऱ्या गाड्या मोजाव्या. व्रत पूजा करताना देव पावावा, म्हणून जपसंख्या मोजावी वार, शनिवार मोजावे, व्रत सफल होण्याची वाट बघत, इंतजार करावा लागतो. व्रत म्हणजे वाट बघणे असते. (काळ जाण्याची मुदत असते) भूक लागली कि हॉटेल मधून ऑर्डर दिलेले जेवण येण्याची वाट बघणे. कुकर उघडण्याची, थोडा वेळ वाट पाहणे. तहान लागली कि पाणी मिळण्याची वाट बघणे. आवडते फळ उदा. आंबा मिळण्यासाठी, तो ऋतू (मौसम ) येण्याची वाट बघणे. दिवसभर काम केल्यावर, रात्री येणाऱ्या विश्रांतीची वाट बघितली जाते.

बालपणी सायकल खरेदीची, पुढे घर खरेदीची, गाडी खरेदीची, सुद्धा वाट बघितली जाते. झाड बागेत लावले, तर ते जगून मोठे टिकावू होण्यासाठी व पुढे फळ फुल येण्याची वाट बघीतली जाते. खास लेख लिहिल्यावर पुस्तक तयार झाल्यावर, ते पुस्तक प्रकाशित होण्याची वाट बघितली जाते. नवे कपडे घेण्याची वाट बघणे, एक तारखेला पगार मिळण्याची वाट बघणे. दिवाळी दसरा, राखी, ईद या सणांची आनंदोत्सवा साठी वाट बघितली जाते.

बक्षिसाची, काम पूर्ण होण्याची, पाहुणे येणार असतील तर पटपट घर आवरले जाण्याची, वाट बघितली जाते. देवळाच्या रांगेत, लवकर देवदर्शनाला नंबर लागायची वाट बघितली जाते. पंढरपूरच्या विठोबाच्या वारीत, देव दर्शनाची, धावा करायची वाट बघावी लागते.

मालिकांमध्ये, आत्मे किती वर्षे, किती जन्मे, त्या भूतबंगल्यात फिरताना कथेत दाखवतात. आत्म्याला सुद्धा मुक्तीची वाट पाहावी लागते. एखाद्या कार्यक्रमाला जायची इच्छा असूनही, अहंकार आडवा येत असेल, तर आपण आमंत्रणाची वाट बघत असतो. या उलट इच्छा नसताना, जर एखाद्या कार्यक्रमाला जावे लागले, तर तो कार्यक्रम संपायची, मन वाट बघते.

बाहेरगावी बरेच दिवस राहिलो, तर त्या आपल्या मूळ घराची ओढ लागून घरी परत येण्याची वाट मन बघते. एखाद्या यशाचे स्वप्न पाहणे म्हणजे सुद्धा, त्या यशाची वाट बघणे असते. वाट बघितल्यावर यश मिळाले कि कृतकृत्य धन्य वाटते. अनपेक्षित यश सुखद असले, तरीही वाट बघणे या प्रकारातला आनंद त्यात नसतो. क्लिकेगा तो लिखेगा, अशी गत फोटोची होते. विरहिणी, अभिसारिका विलंबभृर्तका किंवा अशा तत्सम नायिका, या प्रतिथयश नायिका बनतात. कारण त्या वाट बघत असतात. वाट बघण्याच्या इंतजारच्या सोनेरी मुकुटाने, त्याची लोकप्रियता वाढते. फोटोने मन भरत नाही. अशात अशक्याच्या इंतजारचा, हा मुकुट सोनेरी असला तरीही प्रसंगी, काटेरीसुद्धा ठरू शकतो. या वाट बघण्यात खंत असते. "सखी वो मुझसे कहकर जाते" /कधी जाणार कधी येणार हे सांगून जावे, म्हणजे वाट बघणे जीवघेणे होणार नाही, एवढीच माफक अपेक्षा या विरहिणींची असते. पुरुष या बाबत नशिबी म्हणायचं! स्त्रीच्या नशिबी असलेले वाट बघणे, पुरुषांच्या नशिबी बहुतांशी तुलनेने काही प्रमाणात कमीच येते. पुरुष सहसा हळवा नसतो, आतुरपणाने तो इंतजार करत नाही, भोगत नाही. पण थोडा फार ईंतेजार त्यांचेही नशीबी येतो.

ये इंतजार भी इक इम्तिहान होता है, इंते हा हो गयी इंतजार कि

आयी ना कुछ खबर मेरे प्यार कि

पूर्ण आयुष्यभर, आपण काहीतरी घेण्याची, काहीतरी घडण्याची वाट बघत असतो.

# १५. शेवग्याच्या शेंगा

'शेवग्याच्या शेंगा' नावाची एक प्रसिद्ध कथा होती, (आता नाटक आले आहे) भावाभावाच्या भांडणा मुळे भाचरांमध्ये दुरावा येतो. व शेवग्याचे झाड ज्याच्या हद्दीत येते तो भाऊ, दुसऱ्याच्या मुलांना, पुतण्यांना शेवग्याच्या शेंगाना हात लावू देत नाही. दुरावा वाढत जातो. आणि गोष्टीच्या शेवटी गृहिणी, काठीने झाडाच्या शेंगा तोडते व भाचरांना "या रे मुलांनो, गोळा करा" असे ते आमंत्रण देते. असा कथेचा शेवट होतो.

दुसऱ्या कथेत, एका सधन कुटुंबाला गरिबी येते. अंगणात एकच शेवग्याचे झाड असते. त्या झाडाच्या शेवग्याच्या शेंगा, विकून कुटुंब उदरनिर्वाह करते. मात्र एक दिवस पाहूणा येतो त्याला जाणवते ह्या झाडा मुळेच पोट भरते, म्हणून कुटुंबातील माणसं आळशी झाली आहेत. तो जाताना गुपचूप ते झाड तोडून जातो. सर्वजण त्याला शिव्या शाप देतात, कोसतात. पण पुढे पोटासाठी उद्योग करू लागतात. आणि मग कुटुंबाची भरभराट होते.

शेवग्याची शेंग, हि कोकण किनारपट्टीवरील लोकांची लाडकी भाजी आहे. कुणी अचानक पाहुणे आले, तरी हि मीठ टाकून शेंगा उकडून देता येतात. या शेंगांचे बोटा एवढे लांब तुकडे करुन, अर्ध्या वरच्या साली काढून भाजी करतात. कांदा, लाल मसाला, टोमॅटो, व वाटण घालून थबथबीत रस्सा बनवतात. किंवा फक्त आले,

नारळ, कोथिंबीर टोमॅटो व मीठ तिखट घालून फारसे पातळ नसलेली शेंगांची पळीवाढी भाजी करता येते.

शेवग्याची झाडे, फुले, ग्रामीण भागात सर्वत्र ऊगवतात, शेवग्याच्या शेंगा मुबलक मिळतात. तेव्हा नुसत्याच मीठ टाकून, उकडलेल्या बोटभर लांबीचे तुकडे केलेल्या शेंगा, मुले आनंदाने चघळतात. सामिष जेवणाऱ्यांच्या, बोंबील रश्याला, मागे सारेल, असा हा शेवग्याच्या शेंगाचा रस्सा, तांदुळाच्या भाकरी बरोबर किंवा चपाती बरोबर खाता येतो. भात व रस्सा सुद्धा चांगला लागतो. सध्या तांदुळाचा भात सुद्धा चालतो. पोट भरणाऱ्या, शेवग्या मध्ये अ जीवनसत्व असते व तंतुमय रेषातत्व भरपूर असते. शेवगा पचायला हलका असतो व बाधत नाही. बाळंतिणीला शेवग्याच्या पाल्याची भाजी देतात. भरपूर कांदा लसूण परतून वर शेवग्याचा पाला परतून ही भाजी तयार होते. ताटात वाढताना वर, बरोबरीने ओला नारळ खवून घालावा.

खाऊ या का, शेवग्याचे शेंगेची आमटी आणि भात?

# १६. दोना पावला

गास्पार डायस नावाचे कोळयाची आठवण सांगणारे, दोना पावला हे गोव्यातील, एका समुद्र किनाऱ्यावरचे गावाचे नाव आहे. दोना पावला म्हंटले कि वाटते दोन पावलाचे अंतर, अगदी छोटे असेल व मंझिल अगदी समोर आली आहे. कधी कधी मात्र हे दोन माणसां मधील अंतर दोन पावले असले,, तरी ते पार करणे अवघड होते. दोना पावला, हि गोव्याच्या पणजी मधील समुद्र किनाऱ्या वरची, दोन मूर्तींची जोडी, कदाचित पर्यटकांना हेच सांगते.

तसे पहिले तर, माणसा माणसांतील नातेसंबंध कधीही पूर्व सूचनेने, सांगता येत नाहीत. असे अनप्रेडिक्टटेबल असतात. 'दोना पावला', दि मोनेझोरा हि पोर्तुगीज व्हाइसरॉयची मुलगी. हि भोळी तरुणी, गोरी, साहेबीण, प्रेमात पडली ती पण एका गोव्याच्या स्थानिक अशा कोळयाच्या मुलाचे!, हे प्रेम अर्थातच समाजाला मंजूर नव्हते. व्हाइसरॉयने, दोना पावलाला आपल्या प्रियकराला, भेटायची मनाई केली. "प्रेमावीण जिणे व्यर्थ जगणे" असे वाटून, दोना या समुद्राच्या टोकावर उभ्या अशा दांडीवर येवून, प्रियकराची वाट बघत असे, प्रेमाला असलेल्या घरचे विरोधाला कंटाळून एकदा, ती या जागी आली व समोरच्या अरेबियन समुद्रात जिथे मांडवी, झुआरी या दोन नद्या समुद्राला मिळतात, तिथे तिने स्वतःचा देह समुद्रात, ऊंचावरुन खाली झोकून दिला. पूर्वीच्या गास्पर डायसच्या जागेला आता मिरामर असे म्हंटले जाते. खरेतर मुलीच्या हितासाठीच व्हाइसरॉयने हे सर्व केले होते. पण निसर्गाचे दान उलटे पडले. शेवटी व्हाइसरॉय एकाकी झाला.

स्वर गेले विरूनी, उरल्या मागे त्या आठवणी.

घरच्यांच्या हट्टी व हेकेखोरपणाने बळी गेलेल्या, अनाम प्रेमिकांची स्मृती म्हणून, या दोना पावला किनाऱ्यावर दोना व तिच्या प्रियकराच्या पांढऱ्या रंगाच्या ओबड धोबड दगडी मूर्ती आहेत. असे म्हटले जाते कि, अजूनही रात्री, कधी चंद्र प्रकाशात, पांढऱ्या मोत्याची माळ घातलेली, पांढरा झगा पायघोळ घातलेली स्त्री, समुद्राच्या लाटांतून वर येताना दिसते. अनेक प्रेमभंग झालेले लोक, प्रेमभंगाच्या दुःखाची उदात्तता जाणून घेण्यासाठी, या खास स्थानाला मुद्दाम भेट देतात. येथून पूर्वी काहीजण स्वःताला समुद्रात झोकून देत, आता प्रमाण कमी झाले आहे. काहीजण पुन्हा नवे आयुष्य सुरु करतात. १६४४ मध्ये दोना पावला वडिलांबरोबर गोव्याला आली. २१ डिसेंबर १६८२ ला तिचा मृत्यू झाला. बेचाळीस वर्षाच्या तिच्या गोव्यातील राहण्याने, तिला प्रेम मिळाले, पण तिचे जीवन हरवले. मरणानंतरही तिचे नाव मात्र, "दोना पावला बीच " च्या रूपाने अमर झाले. दोन, जीवांची दोन पाखरे, अनेक पावले, प्रेमाची वाट चालतात, जीवनात रंग भरतात, म्हणून तर "प्रेमा तुझा रंग कसा" हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

म्हणूनच तर "काय देवु मी तुला?प्रेमा" हा प्रश्न अनुत्तरित राहतो. प्रेम असूनही अहंकारामुऴे माणसा माणसां मधील, दोन पावलांचे अंतर कधीच संपत नाही. ते अनाकलनीय गुंतागुंतीचे नात्यांमुळेच, दोना पावलाच्या स्मारकाचे महत्व त्यामुळेच उरते.

# १७. सुंदरा मनामध्ये भरते

जस्सी जैसी कोई नहीं, नावाची एकमेव मालिका आहे ज्यात नायिका कुरुप दाखवली आहे

‘जस्सी जैसी कोई नहीं’ अशा दूरदर्शन मालिका, मराठीतही येणार आहे व नवीन विषय आहे, कारण गुणांचा सन्मान, हा मराठी माणसाचा सन्मान आहे. आज समाजात जे चालू आहे ते सर्वत्र शरीराचे प्रदर्शन आहे. सौंदर्य स्पर्धा, सुंदर तरुणींचे झूम, ग्रूम, आयटम गर्ल असे शब्द, चकमकीत, नवे नवे गॉसिप, भडक कपडे, वरून खालून तोकडेच तोकडे, त्यातून अंगप्रदर्शन खूप असते. हल्लि हेच जणू दूरदर्शन! दूरदर्शनचे दिवस आहेत हे ! अंतदर्शन (मनाचे दर्शन) होणार कुठून? सर्वत्र इतके मोह पसरले आहेत. चिल्लरपार्टी, रेव्ह पार्टी, त्यात सद्‌गुण बघायला कुणालाच वेळ नहीं.

जगात सर्वच ठिकाणी, घरी दारी, सौंदर्याला झुकते माप दिले जाते. सुंदरा मनामध्ये भरली की, तिला काकणभर गुण, जास्तच दिले जातात. काळी, साधी, गबाळी बायको असलेल्या, पुरुषांची दया केली जाते. जरी ती सुगृहिणी असली तरीही! घरी किंवा नोकरीच्या ठिकाणीही, सुंदर स्त्रिया कामचोरी करत असल्या तरी, वेऴ निभावून जाते. सुंदर बायकांच्या भोवती गोंडा घोळायला, बरेच जण तत्पर असतात. अगदी त्यां सुंदरींचे कसचेही कुठचेही काम पण वाटून घेतात. "तू काम करू नकोस तुला झेपत नाही तर" म्हणत सुंदरींचे प्रती असलेली त्यांची

गुणग्राहकता व्यक्त होत असते. ‘कौन बनेगा करोडपती’ वर आपण बघितले कि रूपाने सामान्य मुलीचा, आत्मविश्वास कमी होत जातो. लोकांचे प्रतिक्रियांना कुरुप माणूस घाबरतो, तो यामुळेच पण अशावेळी केवळ गुणांच्या जोरावर पुढे येणारी जस्सी स्पृहणीय वाटते.

"येस आय एम अग्ली" ह्या इंग्रजी मालिके वरून हि मालिका हुबेबुब उचलण्यात आली आहे. भारतीय वातावरणा नुसार, व दूरदर्शनच्या बदलत्या टी आर पी नुसार, ह्या मालिकेत थोडे फार बदल करण्यात आले होते. सामान्य व्यक्तीचे जीवन त्यांचे प्रश्न, जीवनशैली मांडून, प्रातिनिधिक रूपात प्रेक्षकांसमोर मांडणे, हि यशाची गोम (मेख ) निर्मात्यांना बरोबर समजली आहे. अर्थात समाजाचा जर सामान्य रूपाच्या मुलींकडे बघण्याचा दृष्टिकोन, त्यामुळे बदलणार असेल तर ते ठिकच आहे. शिक्षण, गुण यापेक्षाही या जगात "रूप" गोरा रंग, हि चलनी नाणी चालतात, शाळा कॉलेज मध्ये सामान्य रुपरंग असलेल्या मुलींची अवहेलना केली जाते. घरी आईला मदत करुन, साध्या कपड्यामध्ये रंगरंगोटी न करता शाऴेत येणाऱ्या मुलीला, काकूबाई, बावळट, १९४७ चे मॉडेल, वाईफ मटेरिय़ल, काकूबाई असे म्हटले जाते. पण तिचे गुण, तिचे मन, कुणीही पाहत नाही. घरची प्रतिकूल परिस्थिती, मेहनतीचे फळ, अभ्यासातील प्रगती, काहीही लक्षात घेतले जात नाही. केवळ वरवरच्या रूपावर, चमक धमक वर न भाळता, गुण पहा, हा संदेश हि मालिका देत असे. तरीही जस्सीच्या मनातील घालमेल व निराशा तिचे खच्चीकरण यात दिसत असे, जे खरे असू शकते. चित्रपट सृष्टीचे, दूरदर्शन मालिकांच्या आकर्षणाने शेवटी, आत्महत्या, नैराश्याचा मार्ग स्वीकारण्यापेक्षा, तरुण तरुणींनी

जस्सीचे अनुकरण, करुन मेहनत करावी. कष्टाचे फळ जरूर मिळते. सामान्य माणसाचे, सामान्य जीवनही खूप सुखकारक असू शकते.

मेहनतीचा संदेश देणारी हि मालिका सध्या पर्यंतचे मालिकांमध्ये तरी छान होति. "जस्सी जैसी कोई नहीं" ह्या नंतर मात्र त्या मालिकेपर्यंत पोहोचेल अशी एकही मालिका तयार झाली नहीं.

मधुर भांडारकर नावाचे दिग्दर्शक म्हणाले, कि, “मराठीत हिरॉइन, नावाचा चित्रपट करायला तशी मान्यवर अभिनेत्री नाही. ” हिरॉइन चित्रपट आता मराठीत करायची गरज काय? मराठी संस्कृतीला अनुसरून त्यांनी असा संस्कृतीला साजेसा चित्रपट निर्मात्यांनी करावा.

जस्सी जैसी कोई नहीं, वरून ते सहजच खुमासदार चित्रपट करू शकतात, जे चालू शकतात. पण कोण काय करणार, सौंदर्याचे आकर्षण मानवी मनात असते.

त्यामुळे सुंदरा मनामध्ये भरते.

## १८. उडाला थवा पाखरांचा

कुटुंब म्हणजे एका घरट्यातील अथवा एका वृक्षांवरची पाखरे! पाखरांचे थवे जणू! कोणतेही कुटुंब, हे आई -वडील-आजी आजोबा, -मुले यांनी बनते. चार भिंतींनी घर बनत नाही. त्यातील कुटुंबीयांनी घर बनते. आईवडिलांचे प्रेम, प्रोत्साहन, भांडण तंटे, ध्येय, आहार विहार, विचार हे सर्वच आणि या पलीकडे बरेच काही, घर कुटुंब यामध्ये सामावलेले असते.

घर असावे घरा सारखे, नकोत नुसत्या भिंती

या घरातून पिलू उडावे, घेऊनि पंखांत शक्ती

ते पिलू पुढे मोठे होते, स्वतःचे घरटे, जगात बांधते, जे त्याचे घर असते.

अशा शब्दात घराचे वर्णन केले जाते. या कुटुंबातील आई वडील, हाच त्या कुटुंबाला एकत्र ठेवणारे दुवा असतो.

बाप्पाजी माझे देव, मायबाई काशी

नंदी बैसला, पायाशी भाऊराया.

आई वडील म्हणजे मायबाप हो! मम्मी डॅड, बॉब, पप्पा, पप्पी मम्मी, आई, माई अशा संबोधनाने बाहेरचे कपडे बदलतात पण, सजीवांची पुनर्निर्मितीची, मूलभूत प्रेरणा, दया माया बदलत नाही. आई वडिलांचे प्रेम कमी जास्त होते, पण

संपत नाही. फार पूर्वी, ज्यावेळी जात्यावर पीठ दळले जायचे त्या आठव्या शतकातील एका ओवीत आई वडिलांचे प्रेमाचे वर्णन केले आहे ते असे.

माझे ग मायबाप सये, तुळशीचे रोप

त्यांच्या ग सावलीला, लागून गेली झोप

किती ओव्या गाऊ, माऊलीच्या मायेला

कोण प्रदक्षिणा घाली, आकाशचये सीमेला.

पुढे विसावे शतकात चित्र बदलते. बहीण सासुरवाडीला नांदतेय, पण भावाला बहिणीबद्दल आस्था नाही

सासूचा सासुरवास भाऊ ऐकतो गल्लीतून

म्हणे जाय बहिणाबाई मरून,

ऐकून आईचे आलं हृदय भरून

बहिणीच्या माहेरी, आई प्रेमळ असते. सासरी मात्र वातावरण निराळेच असते. किंवा आई सासू झाल्यावर नाती व वागणुकी बदलत असाव्यात. सासू कडूनही आई एवढ्या मायेची अपेक्षा करणे फोल असते. बहीण मनाला समजावते-

येड्या माझ्या जीव, तुला उलीस कळेना

मायबाप सारखे तीर्थ कुठे गावेना

जग जाते यात्रेला, आपण जाऊ माहेराला

बाबाजी मायबाय, दोन्ही क्षेत्र पाहायला

आई म्हणत असते.

सुनेला सासुरवास करू ग कशासाठी

उसामध्ये मेथी लावली नफ्यासाठी

काही घरी सासूचे विचार वेगळे असू शकतात. एकूणच बघता, स्त्रीचा जन्म परावलंबीच असतो. कधी नवरा चांगला मिळत नाही, तर कधी नवरा चांगला असूनही, सासू सासूर वास करुन सुख लागू देत नाही. सासरी मुलीला होणारा सासुरवास, सर्वांना माहित असतो. मात्र शेपूट घालून बसणे, जबाबदारी टाळणे, हा सर्वात सोप्पा मार्ग, तिच्या माहेर घरच्यांना वाटतो. मुलीला हुंड्यासाठी त्रास होतो, हे जाणवले तरीही, माहेरच्यांचीच तिला काही द्यावे, अशी इच्छा नसते. मुलीला घराबाहेर लग्न करुन पाठवणे, एवढीच माहेरचे, त्यांची जबाबदारी ते समजतात. त्यांचे कर्तव्य तिथेच संपते.

नेहमीच नाही, पण कधी असेही घडते.

करकरीत वास्तवाला, जरी किनार जडते.

माती पदरी भरताना रत्न हातात येते

एखाद्याच कन्येला सासर चांगले मिऴते

अशी परमेश्वर कृपेची खाण सापडते.

एखादीला असे चांगले संसार मिळते.

सामान्यतः आई मुलीवर मुलावर अधिक प्रेम करते. मुलाचा अभिमान असतोच पण.

जोंधळया परिस वाढविते तुरी'

ल्येका परीस मला ल्येक प्यारी,

जगरितीने तरी पाठवली सासरी|

आई बहिणीच्या सासूला सांगते माझ्या लाडक्या लेकीला तुम्ही सासुरवास करू नका. नाहीतरी सांगण्यापलिकडे, हात जोडणे, त्यापलीकडे ती काय करू शकते.

हात जोडुनी विनंती विहीणबाई तू ग गंगा

बाळ नेणतिला माझ्या जेवू घालुनी काम सांग

सासुरवाशीण लेकीचा जीव माहेरी गुंतत राहतो, ती आठवणीत माहेरचे सुख आठवते,

जीवाला वाटते पाखरांच्या पायी जावं

वाड्यावरी उतरावं माहेरच्या

माझ्या ग माहेरी पारिजातक उभा दारी

सुवास ओसरीवरी घरी दारी,

सासुरवाशिणीला माहेरची सकाळ, संध्याकाळ, व आळसावलेली दुपार सुद्धा आठवते.

सखे ग सांजवेळी गुराढोरांची लागण

त्यांच्या पायां लक्ष्मी आली कावड लोडून

पहाटेच्या पारी गाई म्हशींची मारामारी

सावळा बंधू माझा भरतो दुधाच्या घागरी.

माहेरच्या सोन्याच्या राशी, तिला आठवतात. ती लंकेची पार्वती असली तरी, हे माहेर तिला फुटका मणी देखील देत नाही. बहुतांशी घरी, मुलींचे प्रश्न दुर्लक्षित असतात. माहेरी परत आलेल्या कन्याला “ सासरी मेली का नाहीस?” विचारतात. अपमान, नकोसेपण उघडपणे उघड कोणी सांगत नाही. एवढेच ! मुलगा मुलगी बरोबरीच्याच असतात, असा वरवरचा देखावा केला, तरीही मुलीला कमी लेखण्याची पद्धत समाजात अजूनही आहे. आई अथवा वडिलांचे मरणानंतर हे कुटुंब तुटते, कुटुंब वृक्ष लहान होतात

जगातील, गावातील जाणते लोक म्हणतात,

**उडाला थवा पाखरांचा**

# १९ माहेरची ओवी

अनेक शब्दातून जे व्यक्त करता येत नाही, ते दोन ओळींच्या ओव्यांतून व्यक्त होते. मी अनेक परिच्छेदांमधून जे सांगू इच्छिते ते या आठव्या शतकातील ओव्यांतून व्यक्त होते, त्याकडे मी लक्ष वेधून ते अधोरेखित करू इच्छिते. मनातील भाव शब्दात अ‍ोवते ती हि ओवी होय. पाखरांच्या थव्या बद्दल झकास वर्णन अ‍ोवी करते.

अंबाडीची भाजी नित तोडावी ओटीत

मायबापाची संपत जतन करावी मनात

शीतल सावलीला पाखरे झाले गोळा

विसाव्याचा पानमळा आईबाप १

माझे ग माहेर, निरशा दुधाची घागर

माय माझी पीठीसाखर, बाप्पाजी खडीसाखर

शंभर माझे गोते, झाडीचा झाडपाला

मायबाई माझी शेवंतीची मळा २

मैनाचं हे सासर सासर

जस इखाच कडू जहर जहर

मैना धुणं भांडी करी नदीवर नदीवर!३

माहेर काही कायम राहण्याची, हक्काची जागा नाही, असे बहिणीला ऐकवले जाते. मुलीच्या कल्पना व स्वप्नरंजनातच माहेर चांगले असते. (बहुदा )

माहेरची वाट दिसे, सोन्यासारखी

कधी जाईन मी बाई वाऱ्यासारखी

वाटच्या वाटसरा, काय पाहशी शेताला

भाऊरायाच्या रे माझ्या, ढवळे नंदी औताला

प्रत्यक्षात बहीण माहेरवासाला आल्यावर भाऊ व वाहिनी तिचे स्वागत करीतच नाही. जसे

ताई आली माहेरी करिते न्याहारी

खायला तिला शिळी भाजी भाकरी

संसारी कितीक असती नातीगोती

बहीणभाऊ त्यातील माणिकमोती

सीता वनवासी, दगडाची केली उशी

बोरी या बाभळी, गोष्टी सांगी तिच्यापाशी

वनवासी सीतेला जनकाने आश्रय का दिला नाही? देवांचे रामायणातच असे होते, असे नाही, प्रत्यक्षातही वास्तवात, स्त्री उपेक्षितच ठरते. हेच सत्य आजही आढळते.

लक्ष्मी आई आली, मोत्यापोवळ्यांनी ओटी भरा.

झाल्या तिन्ही सांजा, दिव्याची ग वात करा.

तिला सासरी पाठवा, हाकलवा

अशी लक्ष्मीची पूजा आपण करतो. देवीला मातेचे रूप मानतो. मात्र कन्येला उपेक्षेची बक्षिसी देतो.

सर्व दुःख बहिणीच्याच नशिबी का यावीत?

तिचे नशीब काय कामाचे,

नाव घ्यायचे रामाचे!

मंथरा या दासीने, कैकयीच्या मनात, कली घुसवला.

हट्ट कैकयीने केला, राम वनात धाडीला,

असे नशीब कन्येचे बनते. प्रत्येक झाडाचे प्रत्येक पक्ष्याचे, प्रत्येक माणसाचे नशीब वेगळे असते. भाऊ म्हणू शकतो.

ताई, तुळशी ग बाई नको हिंडू रानीवनी.

ऐसपैस वाडा माझा जागा देतो वृंदावनी.

पण तो भाऊ कधीही तसे म्हणत नाही. त्याला त्याच्या अधिकारात वाटेकरीण नको असते. बालपणी प्रेमाने वावरलेले बहीणभाऊ भूतकाळात जमा होतात. जोपर्यंत हक्काचा प्रश्न नसतो तोपर्यंत,

ताईला आला घाम, भाऊ पुसे घाई घाई

कोणाची झाली द्रुष्ट, ताई अजून जेवली नाही

असे म्हणणारा भाऊ, बहिणीला, सारखी कशाला माहेरी येतेस? पुन्हा येऊ नको असे सांगतो,

बापाच्या माघारी, भाऊ नव्हे बहिणीचा

आईच्या माघारी बाप नव्हे लेकराचा

तोडीला पानमळा, थवा उडाला पाखरांचा

बहीण गेली दुरी, भावजय म्हणे बरे झाले

घराचे पूर्ण राज्य, माझ्या लेकाला मिळावं

थवा उडाला पाखरांचा, झाड रिकामे झाले.

## २०. आम्ही दोघी मैत्रिणी जोडीच्या

fate gives relatives,

choice gives friends

त्यामुळे मित्र मैत्रिणी, या आपल्याला अभिमान वाटाव्या, अशाच जाणवतात. घरच्या व्यक्तीपेक्षा, त्या जवळच्या असतातच असे नाही, पण वाटतात.

आम्ही दोघी मैत्रिणी जोडीच्या, जोडीच्या

हातात पाटल्या तोडीच्या, तोडीच्या

गडनी गुज बोल, तुझ्या गुजाचे मला याड

गेली चांदणी सोप्या आड,

बालपणीपासूनच मैत्रिणीची ओढ असतेच. शाळकरी मैत्रिणीची विशेष!

फुगड्या खेळताना

एका हाताची फुगडी

मामा घेतो लुगडी

अशी वेगळी वेगळी गाणी फेरे, भातुकली, सर्व ठिकाणी मैत्रिणी, शेपूट म्हणून सोबत असतात.

अस्सं माहेर सुरेख बाई खेळाया मिळते.

अस्से सासर द्वाड बाई कामला पुरते.

हे पुढे त्यामुळेच म्हटले जाते.

मात्र सर्वच दुःखे सांगता येतातच असे नाही. घरच्या गोष्टी नेहमी सर्वत्र बोलता येतातच असे नाही. त्या फक्त मैत्रिणी जवळच व्यक्त करता येतात. काही खास वेदना, फक्त मैत्रिणीजवळ व्यक्त होतात. बेस्ट फ्रेंड जवळ.

फाटला पारकर घ्यावा, निऱ्यात झाकोनिया.

सांगावे दु:ख सखीला, आब घराचा राखुनीया

पुढे लग्न होऊन सासरी गेल्यावर ह्या सखीच्या आठवणीने झुरायला होते.

माहेरची वाट, मायेची ग मोट

मैत्रिणीला द्यायची प्रेमाची भेट,

मैत्रिणी बरोबर बालपणीचे हसणे,

तेच हसणे उरते पुढे दुर्गुण ठरणे

हसू नको नारी हशाचा भ्रम मोठा

अस्तुरीचा जन्म खोटा

हसलीस तर नावाला लागेल बट्टा

मैना माझी नाजूक पाणी सोसेना हिला

सख्यानो हळू हळू चाला

बालपणी मैत्रिणी बरोबर हसत खेळात दिवस काढले, तरी कन्येला वयाने, मोठी होताच हसणे वर्ज्य असते.

सखीबरोबरचे खेळ किती प्रकारचे असतात. सैराटलेले नसतात, याड लावणारे नसतात, काहीतरी शिकवणारे असतात.

आंबा पिकतो रस गळतो

कोकणाचा राजा बाई झिम्मा खेळतो

झिम्मा खेळू ग ये झिम्मा नाचू ये

लाडक्या सखे ये झिम्मा खेळू ये

किंवा

एक लिंब झेलू बाई दोन लिंब झेलू

किंवा

नदी किनारी किती बुलबुल असतील

एकतरी दोन तरी तीन तरी असतील

शाळेतल्या मैत्रिणींना लंगोटीयार म्हणतात. एकत्र चिंचा कैऱ्या खाणाऱ्या मैत्रिणी कास असतात

पंचमीला जमल्या ग गडनी

एक गडनी बोले राजस बाळी

मैत्रिणीची मैत्री व ते प्रेम मोळी

शेवंती मोगऱ्याचा ताटवा, हिरवी गार हरळी

केळीचे हिरवे बन, चिंचेची सावली

साजूक तुपाचा शिरा, सपिठाची करंजी

खडीसाखरेचा खडा, शेवयाची दुरडी

दूधभाकरीचा काला, सोन्याची कळशी

थंडगार पानमळा, झोपाळा चंदनी

मैत्री वाचून व मैत्रिणीं वाचून जीवन व्यर्थ असते. कधी मैत्रिणी फसवतात,

लोग काटो से बचकर चलते है

हमने तो फुलों से जख्म खाये है |

त्यामुळे पुढे मैत्रीची इच्छा संपते. सखे बाई या टीव्हीने गप्पा यानिर्मल कार्यक्रमा मधला रस संपवलाय. तरीही जुन्या त्या जखमा आहेतच.

हरवलेल्या जंगलामध्ये न दिसणाऱ्या झोपडीचे

दार उघडून बाहेर येणाऱ्या कंदीला सारखे

काहीतरी आहे, कोणीतरी आहे कळवण्यासाठी

कंदिला सारखी असतात ते वेचे, मैत्रीचे

एक पणती एक ज्योती प्रकाशाचे रूप असते.

अंधाराला आव्हान द्यायला तेवढं देखील खूप असते.

मी व्यक्त आज होते, सखे तुझ्याचसाठी

अव्यक्त जे उरात उरले, तेही तुझ्याचसाठी.

मैत्रिणी ग, जीव झुरतो तुझ्याचसाठी.

# २१. आडवी लक्ष्मी

सोनेरी सूर्य पूर्वेला उगवत असेल

मात्र तेव्हा मी जगात नसेल,

या जगात पांगळी लक्ष्मी ठीक आहे.

पण आडवी लक्ष्मी कोण सांभाळणार?

माझ्या बरेच दिवस झाले, संताप संताप होत असे. रागावर ताबा कसा ठेवावा, वगैरे लेख वाचताना बरे वाटते. प्रत्यक्ष जेव्हा आपण अंमल करायला जातो, तेव्हा त्यांचा फोलपणा कळतो. असेच संतापाचे ते क्षण टाळायला मी घराबाहेर पडले. सोसायटीच्या दारातच पाय घसरून पडले. उठताच येईना. तेवढे निमित्त झालं. आणि बिछान्यातच पडणे नशिबी आले. पाठीला मार लागला होता आणि जे काही झाले ते म्हणजे, ती तोड मोड दुरुस्त होणार नव्हती. आयुष्यात जशा बऱ्याच गोष्टी असतात, ज्या कधी दुरुस्त करता येत नाहीत. तशीच हि सुद्धा होती. मी मनाने खचू लागले. आजारी होते, तरी खुरडत खुरडत घरातली कामे करत होते. तोपर्यंत ठीक होते. अगदी बिछान्यात पडल्यावर, बाईच्या जातीला कोण विचारते. रद्दी डफ्फर पुरुष, बिछान्याला खिळला तरी त्याची बायको, त्याची सेवा करते. "कुंकवाचा धनी" म्हणून टिपे गाळते. बायको बिछान्यात पडली, तीही या आजच्या

बिथरलेल्या काळात, तर बायकोची सेवा करणारा एखादाच असतो. जर असेल तर, त्याला माझे, खूप खूप नमस्कार.

बेडरिडन आजारी माणसाचे करायला घरची माणसे तयार झाली, तर अहो भाग्य म्हणायचे. नाहीतर "मोले घातले रडाया" अशी पैसे देऊन सेवा करणारीच, शोधावी लागतात. उभे राहून थकलेलं, झाड पडले होते पण त्याचे भोग बाकी होते. पूर्वी हे थकलेले झाड, कुऱ्हाडीने हि तुटले नसते. पण त्याच्या मुळा भोवतीची माती सैल झाली. मुळापाशीच ते दुखावल्यावर, ते पडणार हे निश्चित झाले. कितीतरी जखमा खिळे ठोकळयाच्या खुणा अंगावर घेऊन ते झाड जगले, पण त्याचे दिवस भरले. कोणीतरी चमत्कार घडला तरच ते वाचवू शकते. भीष्माचार्यांना जसे उत्तरायण वा दक्षिणायनात मृत्यू निवडीचे स्वात्रंत्र्य होते. तसे मृत्यू कधी हवा, हे ठरवायचे स्वातंत्र्य मला नव्हते. होते, फक्त शरपंजरी पडून राहण्याचे दुःख. सदैव कोणाची तरी सोबत हवी असलेली मी, एकटी बिछान्यात पडणे हे वाईट होते. नवऱ्याला त्याचे विश्व होते. त्याच्या मित्र मैत्रिणीं मध्ये, त्याला माझी गरज नव्हती. गरज मलाच होती.

एकाकीपणाने मी हतबल झाले. एखादी लेखनिक मिळाली असती, तर मी अजूनही वाचन लेखनात रमू शकत होते. पण हा एकांत नकोसा वाटे. सरसर सरारा, झरझर झरारा धावून काम करणाऱ्या नृत्य करणाऱ्या, माझ्यावर हि वेळ आली. माझे नृत्य संपले हे मला कळत होते. व जीवनही संपणार हे दिसत होते.

संतुलन पत्रातील लॉस हा सुद्धा ऍसेट असतो. आताचा हा लॉस लॉसचा होता. हरवलेल्या गोष्टी, मी कलेत मांडून त्या लॉस ऍसेट, एनकॅश करू शकत नव्हते. एकटेपणा त्या सोबत खूप वंचना आणतो. मी खूप कष्ट केले. माझ्याकडे वीस वीस माणसे येत, राहात, खात पीत! मात्र आता माझे करायचे वेळी, सर्वानी पाठ फिरवली. मी या लोकांसाठी कष्ट केले. त्यांनी माझ्या ताटात खवट तूप वाढले. देवळातले दगडी देव माझ्यासाठी काय करणार? मी उद्या नाहीशी होणार, माझ्याकडून फायदा नाही, म्हणून मला अडगळीत टाकले गेले. घराची दशा बघवत नव्हती. गृहलक्ष्मी आडवी लक्ष्मी, आजारी झाली कि तिचे कोणीही नसते. ती उभी असते. तेव्हा ती सर्वांची असते. सुकलेल्या वठलेल्या या झाडाला पाणी घालायला या माणसांमधले कोणीही फिरकत नाही. मी काही अमर नव्हते. कधीतरी जायचेच होते. पण देवाने काही सेवा जेष्ठता यादी पाळावी. कुटुंबात ९० वर्षाचे वृद्ध हि होते, जे मरण मागत होते, ज्यांचे नातेवाईक त्यांचेसाठी मरण मागत होते. मी मात्र पन्नाशीतच जाणार होते.

लिखाण म्हणजे मॉडेलिंग क्ले नव्हता. पुन्हा मोडून रिमॉडेल करून पुन्हा लिहायला. त्यामुळे अनेक हस्तलिखिते घरात पडलेली होती. माझ्यादेखतच ती रद्दीत दिली गेली. जुन्या वस्तू पार कचराकुंडीत टाकल्या गेल्या. माझ्या साड्या, माझ्या देखतच इतर कुणी वाटून घेतल्या. औषधोपचारांची काळजीही न घेता, दुर्लक्ष करुन माझी एक्सिट जवळच येणार हे त्यांना माहित होते. मरण माहित असूनही आम्ही, सर्वांवर शेवटच्या क्षण पर्यंत उपचार केले. पण, सुने कडून पुत्र

प्राप्ती झाली, आतातर तिची गरज संपली. तिचे हात राबत नाहीत, तिला फेकून द्या, हि वृत्ती बऱ्याच घरी असते.

मी पांगळी लक्ष्मी या घरची

केली मी बोली नाही परत जायची.

असे म्हणून पांगळी होऊन, राबत राहिले. आज मला आयुष्याचे पुनरावलोकन करताना रडू येते. मी बाळंतपणात सुद्धा, कधी झोपले नाही आणि आता हि सक्तीची विश्रांती, मला कशी झेपणार? घरी नवऱ्याने कधीच, काहीही काम केले नाही, त्यामुळे त्याला घरात काहीच सापडत नसे. आज मला मनाला शांती हवी पण मी भ्यालेली आहे. आज वाटते चित्र काढावे. रंग आकारात, दुःख मांडता येईल. शब्दांनी भावना पुचाट होतात. शिवाय शब्दांना रंग नसतात. पण कदाचित नीट-नेटके शब्द, भावना व्यक्त करायला मदत सुद्धा करतील. नवऱ्याला म्हटले, लेखनिक शोध. पण तो लेखणिक शोधणार बघणार नाही, याची मला खात्री आहे. एक मैत्रीण भेटायला आली. तिला मी पुन्हा ये म्हटलं. पणती येईलच याची खात्री नाही, शिवाय, तेव्हा मी असेन किंवा नसेल तर, असाही संशय मनात आला. आणि तोंडाची चवच गेली.

एकेक पान लागले गळायला

का मज येते रडायला

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे

अकस्मात तोही पुढे जात आहे

सदैव माझे-तुझे, माझी माणसे तुझे लोक, सेवा कर, हे कर ते कर, घर आवर, काम कर, असा खेकसणारा नवरा, कदाचित मनातून, माझ्या वर जाण्याची व त्याच्या सुटकेची वाटच बघत असेल. त्याने दुसरी मैत्रीण हि शोधली असेल. माझ्या पृथ्वीच्या पाळणाघरातून, बाहेर जायचा अवकाश, की ती नवी बाई कदाचित इथे येईल. जगात अडलेल्या मुली अनेक तडजोडी करुन जगतात. अशी बायकांची रिप्लेसमेंट जगात चालूच राहते. कोणीतरी आपल्या पाठीत खंजीर खुपसला, अशी भावना आली कि म्हणे पाठीच्या कण्याचे आजार होतात. कारण जीवनाचा कणा ढासळला जातो. इतर कुणाच्या बेवफाईने आपण खचतो.

काहीवेळा वृद्धांना, निरागस नातवंडांमुळे, जगावेसे वाटते. पण अजून नातवंडे येण्याचे वय झाले नाही. या वयात, अशा सक्तीच्या विश्रांतीत, आढ्याकडे बघत निजायचे. पाठ दुखली कि कुशीवर वळायचे आणि वेदनेने विव्हळायचे. दर्दनाशक, वेदनाहारके खायची व असे नकोसेपण इतरांच्या नजरेत बघायचे.

मला भूतकाळ आठवतो. आलेले खोटे आरोपही आठवतात. कधीतरी आनंदाचे क्षण आले कि सासू काहीतरी कुचके बोलून, तो आनंद नष्ट करीत असे. वाळूवरची पावले असावी, पुसली जावी तसे सुख नष्ट होई. कोंबड्या सारखा पक्षी मीच सूर्यनारायणाला बोलावतो असे समजतो. माझे सासूचा अहंकार तसाच होता. लग्न करुन आल्यावर "असा नवरा नको ग बाई, जो टोचुनि मारतो" असे म्हणता येत नाही.

छोट्या भरती नंतर छोटी ओहोटी,

मोठ्या भरती नंतर मोठी ओहोटी.

पाठोपाठ दोघी येति. हीच जगरहाटी.

अशा रीतीने सुखदुःखाची आवर्तने जीवनभर सोसली, आकाशातील पक्ष्यांपैकी एखादा पक्षीच एखाद्या झाडावर बसतो. तिथे त्याची वस्ती संपली कि ऊडून जातो. पक्ष्यांचे थवेच्या थवे जगात येतात जातात. थोडेच दिवस राहतात. कुठून येतात, कुठेतरी जातात, कोणीच पत्ते सांगू शकत नाही. तरीही काहीजण राज्य करतात, तर काही नेहमीच शोषित राहतात. ज्याचे त्याचे ते प्राक्तन असते.

कधी कधी टोकाचे निराशावादी विचार मनात येतात. आता माझे किती दिवस राहिले? मी जगले का? माझ्या नवऱ्याने मित्रांबरोबर खूप सहली केल्या. "मला कोणी येते का?" विचारल्यावर परस्परच त्याने "तिला आवडत नाही" सांगून मला सहलीतून कटवले. मी त्याची सौभाग्यवती होते. भाग्यवती होते कि अभागी होते? मुक्काम संपल्यावर, कितीतरी परलोकि जातात, त्यांच्याप्रमाणे माझ्याही जाण्याची दखल घेतली जाणार नाही. "मी हवीशी होते, माझ्या नंतर इतरांचे कसे होईल हा भ्रमच असतो. नव्या गड्याचे नवे राज्य सुरु होते. सर्व जुने बदललेले असते. ” न ऊमलताही अनेक कळ्या पायदळी जातात. नकोसे सामान तर मोडीत दिले जाते. Olx वर विकले जाते, नवरा बायकोचे कर्तव्य म्हणून जोडीने लग्नांना जाणे व कर्तव्य म्हणून दवाखान्यात नेणे बरीच जण केतात. नवल म्हणजे देवाकडेही न्याय वगैरे काही नसतो. न्याय हा अपवाद आहे, अन्याय हे सत्य आहे, जगात, सोसणारा सोसतच राहतो. असे सटवीचे लिखित असते.

क्षितिजे होती उणी

मी नाही म्हटली गाणी.

जी होती शिल्लक मनी, तीही गेली संपुनि.

हि बावळट बाई धावून धावूनी इतरांचे करायची, तिला गोळाभर भात कोणी करुन वाढत नाही. हे सत्य बोचरे आहे. मी तळतळाट करते, पण त्यात सुद्धा दम नसतो. स्वल्पविराम, अर्धविराम येऊन गेल्यावर, पूर्णविरामच येणार हे, सर्वांना ज्ञातच असते. काही काही तडजोडी किती घातक ठरतात. हे त्या तडजोड करते वेळी कळतच नाही. काळाबरोबर तडजोड करता येत नाही. मैत्रिणी देखील फसवतात, ही दुष्ट माणसे देवालाही फसवतील, मग मी फसले ते काय वेगळे!

कोणी भेटायला आले कि रडू येते.

आसूओं, आखों के दहलीज पार आया न करो

घर के हालात जमाने को दिखाया न करो

लोग मुट्टीमे नामक लिये फिरते है.

तुम जख्म को दिखाया ना करो

गुहलक्ष्मी म्हणून मी कायम उभी होते. हात राबत होते. तोपर्यंतच मी लक्ष्मी होते.

आडवी लक्ष्मी! तिला कोण विचारणार? तिचे विसर्जनच होणार.

झाड माझे वेडे पिसे, उन्ही जळताना हसे

रुसे धो धो पावसात, चांदण्यात मूस मुसे (बोरकर)

माझ्या सग्या सोयऱ्यांना माझ्या अस्तित्वात रस नाही. मला निरोपाचे क्षण जगण्यात नाही. नंतरच्या आवराआवरीला ते उत्सुक आहेत. अशीही जुनी गोष्ट फेकणे, हा त्यांचा छंदच आहे. जुनी साडी, शिळे जेवण, फेकावे तशी सासू माझे नाव, माझा विचारही फेकून देईल. घरात शांती करुन, पुन्हा नव्याने रिनोव्हेशन करील. तिला कायमच रसरशीतपणे जगावेसे वाटते. सून गेल्याची खंत न करता ती छान जगेल. मीच मिटून राहते. भीतीने.

जगावेसे वाटणे कोण ठरवेल,

वृद्धापकाळ कधी टळेल.

सेवा करणारे आप्त लाभता, विश्रांतिकाळ सहज निघेल

आज मागे पडलेले सगे सोयरे,

ते बर्फाने चादर टाकलेले डोंगर तुरे,

सोनेरी कळस विविध मंदिरांचे, त्यांना मी कशी आठवीन?

मुक्काम संपलाय दिवस आले निघायचे.

असाच पहाटवारा सुटला असेल,

सोनेरी सूर्य पूर्वेला उगवत असेल,

मात्र तेव्हा मी जगात नसेल,

मात्र तेव्हा मी इथे नसेल!लक्ष्मीचे पाऊल बाहेर असेल.

## २२. स्त्री जन्मा हि तुझी कहाणी

भारत देशात, आज स्त्रिया शिकून उच्चपदस्थ होतात. तरीही सामाजिक स्थिती बघता स्त्री जन्म -स्त्री बालिका ेचा मुलीचा जन्म आपल्या भारत देशात किती हवासा आहे, हे सर्व ज्ञातच आहे. मुलगी झाल्यावर खट्टू झाले तरीही, पुढे आई वडील लेकीला लाडाकोडाने, वाढवतात. माहेरी मुलीचे शक्य तेवढे लाड पुरवले जातात. जे सासरी पुरवले जात नाही.

आई बापसाची लाडकी लेक, चंद्रज्योत

येतास जातास करे कौतुक गणगोत.

मुलगी कितीही लाडकी असली तरीही, यथोचित वेळी तिचे लग्न करून द्यावेच लागते व माहेरघर सोडून लेक सासरी येते. लग्न व नवरा या बरोबरच फ्री मिळणारा सासुरवास तिच्या नशिबी येतो. नाशिबा प्रमाणे कमी अधिक असतो, पण असतो.

अस्से संसार सुरेख बाई खेळाया मिळते.

अस्से सासर द्वाड बाई कामाला पुरते.

आई बापाने दिली लेक, तिला सासुरवास कसा?

चितंगाचा फासा, गली रुतला सांगू कसा?

लग्ना नंतर मातृत्व आले कि स्त्री त्या सासुरवासाला सरावते आणि त्या बाळासाठी, पुढच्या पिढीसाथी सर्व सहन करीत राहते. असे म्हणताता, की मुलांकडे बघून बरेच संसार टिकवले जातात.

माय सटवाई, हात मी जोडते तुला

आयुष्य मागते, राजस माझ्या बाळाला.

स्त्रीचा जन्म नको घालू श्रीहरी

संसारी येऊनि, परायाची ताबेदारी

वळवाचा पाऊस, कुठे लागतो कुठे नाही.

भ्रताराचे सुख, दैवाने लागत येडीबाई

सासरचे त्रास, कर्जबाजारीपणा, लागट बोलणारे नातेवाईक, गैरसोय, जेवणाच्या वेगळया पद्धती, भुकेची आबाळ, अपुरी झोप, पैसे न पुरणे, नवीन लुगड्याला पैसे नसणे, कामाचा भार, अशी विविध दुःखे स्त्रियांच्याच नशिबी असतात. "काम एके काम" एवढेच तिचे अस्तित्व, सासरी उरले कि स्त्री कोमेजून जाते. ती सासरला उणेपण येऊ देत नाही. ती त्रास शक्यतो, बाहेर सांगत नाही. पण माहेरच्या आठवणीने खंगू लागते. माहेरच्या सांगाव्याची वाट बघू लागते. समजूतदार पत्नीची, जबाबदार मातेची जबाबदारी पार पाडणे बायकांना वेगळे सान्गावे लागत नाही. आपल्या आई कडून "ती" ते शिकूनच येते. हल्ली बायकांना घरकामा बरोबर नोकरी करावी लागते. दोन्ही डगरींवर काम करून, त्या लेकीची

ओढाताण होते. "कमावती सून" काही अपेक्षा, तिचे सासरहून करते. ज्या पूर्ण न झाल्यास, ती माहेरी जाण्यासाठी खंतावू लागते. आईची आठवण, तिला अस्वस्थ करते.

स्त्री जन्मामुळे शारीरिक बदल होत राहतात. स्त्री दमली किंवा घराच्या विचित्र वातावरणामुळे नैराश्य आले, तरीही तरीही, तिला दवाखान्यात कोणी नेत नाही. ती गप्प गप्प होते. डॉक्टर कडे उपचार घेतले, तर "रोगी मुलगी गळयात घातली" असाही आरोप मुलीकडच्यांवर होतो, फसवणूकीचा दावा केला जातो. चेहेरे बघून केलेल्या लग्नां मध्ये, काही काळा नंतर मने जुळतातच असे नाही. सुरुवातीला जुळली तरी ते आकर्षण पुढंपर्यंत टिकतेचं असे नाही. नवरा बघ्याची भूमिका घेतो. बाई पिचत राहते. घुमी होते, विचार व अविचार करू लागते. जीवन संपविण्याचा विचार ती करू लागते. आपण जर काही केले, तर आपल्या माघारी मुलांची भवितव्ये अंधकारमय होतील म्हणून ती काही काळ गप्प बसते.

अशावेळी एखादा क्षण अपमानाचा क्षण, भांडणाचा क्षण, तिला हताश करू शकतो. आपण सर्वांनाच नकोशा आहोत, ह्या भावनेने ती अंतर्मुख होऊ लागते. बाहेर सर्व जग आनंदात असताना, माझ्याच नशिबी हे भोग का यावे? हे सर्व संपवून टाकावे, असे तिला वाटू लागते.

या दरम्यान हुंड्यासाठीहि तिचा छळ होऊ लागतो. तिने माहेरहून पैसे आणावे म्हणून, तिच्यावर दबाव येऊ लागतो. माहेरी पैसे नसतात किंवा माहेरच्यांना मुलीला पैसे द्यायचे नसतात. किंवा एकदा पैसे दिल्यावर सासरच्यांनी

हाव वाढत जाते. हुंड्याच्या मागणीसाठी होणाऱ्या छळापायी, लग्ना नंतर पहिल्या पाच वर्षात आत्महत्या करणाऱ्यांची, संख्या सर्वात जास्त आहे. हल्ली तर स्वतः सोबत अपत्यालाही घेऊन जाण्याची, म्हणजे अपत्यांचेहि जीवन संपवण्याचे केसेस आढळतात.

गुन्हे, दारुडे, असुरक्षितता, कानी पडणाऱ्या बलात्काराच्या घटना, चंगळवाद, उथळ, समाजव्यवस्था, यात एकटे राहणे बाईला सुरक्षित वाटत नाही. त्यामुळे केवळ भीतीपोटी, ती जीवन संपवायचे ठरवते. बिघडलेले नाते संबंध, अबोला, धुसपूस कित्येक घरी असते. पण, मनातील शेवाळे तिच्या मनातच दडून राहते. बाकीचे लोक त्रयस्थासारखे बघत राहतात.

सासुरवाशिणीला माहेरच्यांनी आधार द्यावा असे वाटते. सासरच्यांना संगावे, किंवा निदान सासरच्यांशी बोलावे व प्रश्न सोडवावा एवढी माफक अपेक्षा तिची असते. मात्र तेवढीही मदत तिला मिळत नाही. किंवा त्या गोष्टीने हि तिच्या छळात फरक (फारसा)पडत नाही.

विश्रांतीसाठी, मनःशांतीसाठी, तिला माहेरचा आधार हवासा वाटू लागतो. सासू हि आई होऊ शकत नसते, कारण दोन्ही नात्यातच फरक असतो. तोंडाने न सांगता ओळखणारी आई व सांगूनही न समजून घेऊ शकणारी सासू, या अडकित्याच्या दोन पात्यांमध्ये तिची मनाची सुपारी, कातरली जाऊ लागते. ती माहेरी त्रास सांगत नाही. पण पुन्हा पुन्हा तिची पावले, निमित्त शोधून माहेरी

वळतात. माहेरी ती सासरचे खोटे नाटे कौतुक सांगून वेळ मारून नेते. शक्यतो अनबन असली तरी झाकून ठेवते.

फाटला परकर घ्यावा निऱ्यांत झाकुनिया

सांगते शोनीबाई, आब कंथांचा राखुनीया

सासूसुनेची भांडणे होत असतात. स्त्री असूनही सासू, सुनेला समजून घेत नाही. लग्नाच्या गाठी स्वर्गात ब्रह्मदेवाने बांधलेल्या असतात. पदरी जे पडले, ते स्वीकारून थोडी फार कुरबुर करून "ती " वेळ साजरी करते. खूप मोठे प्रश्न व बेबनाव असल्याखेरीज, संसार मोडण्याचा, टोकाचा निर्णय भारतीय स्त्री सहसा घेत नाही. हातातले गरम दुधाचे भांडे, चटका असह्य झाल्यावरच, हातातून निसटते. तोपर्यंत हात पोळले, तरी ते भांडे सांभाळले जाते. सासरचे नाते व सासरचा मान व सासुरवास बाई बोलून तो बाहेर पडू देत नाही. अपमान गिळून वरकरणी आव आणून, सासरी, ती दिवस कंठत राहते. नवरा यात त्रयस्थाची भूमिका घेतो. नवऱ्याला सोडून एकटीने राहणे सोपे नसते, सासर सोडून माहेरी आल्यावर माहेरचे आधार देतील याची खात्री नसते. सासुरवासातून मुक्त होण्यासाठी, जीवन संपवण्याचे विचार, तिच्या मनात येऊ लागतात. सासू हि तिला शत्रू वाटते. व पुढचे आयुष्य कसे काढायचे घ्याचा प्रश्न पडतो. याला पुष्कळ अपवाद हि हल्लीच्या काळी आढळत असतील. सासू सुनांचे हल्ली पूर्वीच्या काळापेक्षा अधिक ठीक जमते असेल, ऐकिवात आहे. "सून येणार" याचे म्हणे सासूला हि टेन्शन असते. कशाबशा

धुसफुसत म्हणा किंवा राजीखुशीने, सासू सुना एकमेकींशी जुळवून घेतात. तरीही प्रश्न शिल्लक आहेच.

स्त्रीचा जन्म कोण्या घातला येड्यानं

पराया घरी बैल राबतो भाड्यानं

दुर्बळपणाची लाज वाटते मला.

नारी जलमाच्या काय करावे नशिबाला!

आपल्या या भारत देशात दरवर्षी हजारी ३% स्त्रिया सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या करीत असतात. का? त्यावर उपाय काढायला हवा.

जीवन अनमोल आहे!

# २३पती हाच देव जाणावा

"पती हाच देव जाणावा, पती परमेश्वर मानावा" हि शिकवण ओव्यात आहे. पतीला देव मानणाऱ्या स्त्रियांच्याही मनात वंचनेचे दुःख खोलवर असते. पूर्वीच्या जात्यावरच्या ओव्या, ह्या स्त्रियांच्या दमनाची कथा सांगतात. नवऱ्यावरच्या प्रेमाचा, नेहमीच उपयोग होतोच असे नाही.

प्रीतीचा एवढा कांत नको प्रीतीवरी जाऊ

पाण्यातील ती नाव, न्हाई लगन अनुभऊ

साप म्हणू नये धाकला, नवरा म्हणू नये आपला.

तरीही तिला वाटते

गावाला गेला म्हणून माझी खजिन्याची पेटी

लाडके मैनाबाई वाडा भयाण लागे पाठी.

या शब्दात स्त्री नवरा परगावी गेल्याचे वर्णन करते. बाप्या, बायको माहेरी गेल्यावर काय करतो, याचे अनेक विनोद प्रसिद्ध आहेत. आपल्या संसारातील वेदना झाकण्या कडेच, स्त्रीचा कल असतो. खरे असो अथवा नसो, बाई नवऱ्याचे कौतुक जगाला बळेच सांगते.

भ्रतार नव्हे बाई ती ग आंब्याची सावली.

नाही आठवू दिली, परदेशातील माउली.

कित्येक झोपड्यामध्ये व अन्य ठिकाणी नवरा रात्रीची मारझोड करतो, दारू पिऊन मारहाण करतो. तरी संध्याकाळी हा नवरा दारू पिऊन गटारात पडला असेल कि काय या कल्पनेने, मैना बाई चिंतातुर होते जसे,

सावली परतली दारीच्या घेवड्याची

वाट किती पाहू, राज इल्लासी केवड्याची. (राजविलासी)

नवऱ्याला यायला उशीर झाला तर ती देवाला आपल्या पती रक्षणासाठी साकडे घालते जसे-

माझ्या कपळीच कुंकू हिंडते रानामधी

जतन कर देवा, तुळशीच्या पाना मधी

घरात आजारी, बिछान्यावर / अंथरुणावर खिळलेला, पती जिवंत राहावा, म्हणून ती आहे नाही ते विकून, त्याला जगवायचा प्रयत्न करते. आपल्या सौभाग्याच्या जोरावर, ते बळ असल्यावर स्त्री निर्धास्तपणे राहते. कारण पती, हाच तिला संरक्षक आधार देणारा वाटतो.

उदा. चुड्याच्या ग बळे, न भी कवणाला

देईन जाब मी लंकेच्या रावणाला.

आपला पती फारच देखणा राजबिंडा आहे असे गैरसमजाने प्रत्येक पत्नी समजते.

पवईच्या नाक्यावर शिंग वाजत नानापरी

चुडा माझा राजा, मोर डुलतो गगनावरी

अशा शब्दात तिला नवऱ्याचे कौतुक सांगायला आवडते. तिला तो राजकुमारच वाटतो. ती त्याला राजाच मानते. बुद्धिमान ब्राह्मण मानते. जसे

रेशमी सदरा अंगी करतो सळसला

हवशा भ्रतार, त्याची बामनाची कळा. किंवा

जात्या तू ईश्वरा दिला तांदुळाचा घास

मांडवा मध्ये शोभे नवरा, मोतियाचा घोस

पती हा देवच आहे. व त्याने खूप प्रेम दिले असे पत्नी नेहमी सांगते

भ्रताराचे सुख, तळहाताची सावली

नाही आठवू दिली, दूर देशची माऊली

आपला नवरा हा देव व सासुरवाडी हेच मंदिर, असे मनात मानून ती वावरते. नव्याची नवलाई संपली, कि तिला कळते कि सासरच्यांनी, अभावाचे जिणे आपल्यावर लादले आहे. सर्वांच्या सर्व अपेक्षांचे ओझे, तिच्या शिरावर येऊन पडते. हिंदी मालिका " सास भी कभी बहू थी" मालिकेतील सून, तुलसी जशी वागते, तसे आपल्या सुनेने वागावे. अशी अपेक्षा सगळयांची असते. सून नवती, सर्व प्रकारे प्रयत्न करते. आपल्या मना विरुद्ध घडणाऱ्या घटना, शक्यतो कुठेही सांगत नाही. घरात

होणारा सासुरवास घराच्या चार भिंतीच्या आतच दडून राहतो. पाणवठ्यावरील सखीला सुद्धा ती सासुरवासा बद्दल, सांगत नाही. कारण त्यातुन चुगल्या चहाड्या होऊन भांडणे झाली तर मैनेलाच त्रास होतो. ती आपले दुःख ओवीत गुंफते, नवरा मात्र बायकोच्या, वेगवेगळया, कागाळया नेहमीच सांगतो.

बायको न आवडण्याची कारणेतर काहीही असतात, मूर्खपणाचे असू शकते. बायको कपडे नीट धूत नाही. साबण नासवते, पक्वान्न शिजवत नाही. मुलांचा अभ्यास घेत नाही. माहेरहून पैसे आणत नाही. घरकाम करताना नटीसारखी नटत नाही. अर्थात त्या अनेक कारणांमुळे मला ती आवडत नाही.

अस्तुरीची निंदा, काय करिशी नादाना

तुझे विचित्र छळ, तुझी तुला आटपेना

पर नारीच्या पलंगावरी, नका निजू बिनघोर

आहे गळयावर सुरी जाऊ नका त्या घरी.

देव दगडाचा असतो, म्हणून प्रत्येक दगड देव बानू शकत नाही. त्यामुळे नवरा पाण्यातला पाषाण, पाषाण हृदयी, अशा ओव्या आहेत. स्वतः त्रास काढूनहि मैनाबाई नवऱ्याजवळ नांदते. त्याचा जाच सोसते. त्याला आश्वासन देते.

जाचु नको राया, तुझ्या पायाची मी दासी.

स्वतः राहीन उपाशी, घास घालीन तुपाशी.

मात्र पती पत्नी चे दैव कोण जाणते?

मृग सोन्याचा जगी असंभव

तरीही त्याला भुलले राघव

श्रीरामाला चुकवून गेली, शक्ती मायाविनी

लवांकुशचा हळवी पाळणा

वनी वाल्मिकी मुनी

दैव जाणिले कुणी?

त्यामुळे या बेंदऱ्या दिसनाऱ्या, पाटीलरावाला बाहेरचा नाद लागतो, हिंदी चित्रपटातील सौतन, जय मल्हार, प्रेमाचे त्रिकोण अशा उदाहरणात असल्या प्रमाणे सिलसिला सुरु होतो.

घरची अस्तुरी, जस, केळीचं कबाल

परनारी साठी वाढून घेतले जंजाळ

स्त्री मात्र त्याचे घसरलेले पाऊल सुधारेल, म्हणून चंदना प्रमाणे झिजत राहते. मनात कुठेतरी तिच्या निराशा जन्मत असते. त्यामुळे ती ओवी म्हणते.

फोडिले चंदना, त्याच्या केल्या बारा फोडी

स्त्रियांची जात वेडी, पुरुषात माया थोडी

भ्रतार नव्हे बाई, पूर्वजन्मीच्या वैरी

हरणाच्या पाडसाला, फास घातला दुहेरी

नको गोरे बोलू भ्रतार माझा भोळा

गारुडी ग बाई, केसाने कापला ग गळा|

पतीच्या चालचलनात गडबड आहे, हे ओळखून ती खूप हादरते. संसार मोडेल अशी शेवटी ज्याची भीती असते, ते वाईट घडतेच. पती तिला सोडून जातो. ती एकटी राहते. पती जवळ नसल्याने तिचे जगातून लक्ष उडते.

पावसा वाचून रान दिसते भेसूर

कंथाया वाचून (नवऱ्या वाचून) वाया ग शृंगार.

मग ती वेगवेगळया देवळांमध्ये, संतांकडे साकडे घालते, कि तिचा पती परत यावा. किंवा तिला ते दुःख सोसायला शक्ती मिळावी. हताश होऊन म्हणते.

समुद्राच्या काठी, मोती पोवळयाचा वेली

दैवाची उणीव, कडू वेल हाती आली

जीवाला जीव देत, जीव देऊन पाहिला,

नदीतला गोटा दगडच राहीला.

आणी म्हणे, जग बाईला सांगते, पती हाच देव जाणावा,

# २४. देवा पाव रे

शंकराच्या मंदिरात, मंडप आवारात रेंगाळणाऱ्या भक्तांमधील, एक भक्त सांगत होता. हल्ली हा देव पावत नाही. एकवीस सोमवार इथे आलो, पण त्या देवाने मला निराश केले. मी परत या देवळात येणार नाही. जणू काही देवाने, तो अकरा महिन्याचा, करार तोडला होता. नवसाला देव पावतो हे खरे, पण शेवटी प्रत्येक व्यक्तीचे नशीब असते, देव विधिलिखत बदलू शकत नाही. त्याचा राग, सकाम भक्ती करणारा भक्त देवावर काढतो. सामान्यतः कुटुंबवत्सल व्यक्ती, हि संसारात रमते व त्याच ऐहिक प्रश्नांमध्ये गुंतून पडते. देवाला लाच देऊन, आमिष दाखवून, नवस बोलून, सकाम भक्ती, करण्याकडे जनमनाचा कल असतो. कामने साठीच व मनोकामना पूर्ती साठीच, मनाचा प्रयत्न असतो. केवळ मधला वेळ भरवणारा, फिलर म्हणून जे असते, ती देवपूजा व देवदर्शन हा धर्म होय! म्हणजे गाण्यातील, केवळ एखादा शब्द, एखादा स्वर, एवढीच त्या निष्काम भक्तीची किंमत असते. त्यात हे हवे, ते हवे, त्या इच्छा व अकालमृत्यू हरणाची मागणी फक्त असते. थोडक्यात मागणीपत्र असते.

दर मंगळवारी गणपतीला व शनिवारी मारुतीला लाल शेंदूर नियमाप्रमाणे, माळ मारुतीला चढवली तरीही अडचणींचा डोंगर चढतच जातो. कुणी फसवले कि वाटते हा सुद्धा? तुम्ही पण तसेच? सर्व परके मग आपले कोण? मन मोकळे करून शिव्या द्याव्या. छाती मोकळी करून घ्यावी, असा इतका संताप आला कि अंग

थरथरते. विपश्यना, योगा, रंगाचे मनाचे संतुलन कमी पडते. घरी राहतो तो गृहस्थ, एवढीच व्याख्या गृहस्थाची उरते. संसारी गृहस्थांचा गृहस्थाश्रमीचा आचार एकसुरी असतो. जसा देव एकच, तसा मीही एकमेवच. असं पॅटर्न घेऊन प्रत्येकजण, मनाच्या भिंती बांधतो. कर्मकांडामुळे त्याला माणुसकीचा, सदाचाराची जण राहत नाही. प्रत्येकालाच वाटते, "मीच एक बाजीराव"(मलाही वाटते) मग देवभोळेपण वाढते. कारण इतर कुणावर विश्वास ठेवणे जमत नाही.

लगती है भाई सबसे भली

अकल अपनी और बीबी दुसरे कि

इतर कुणाला, आपले विचार पटवून देणे, अवघड जाते. त्यामुळे तेही देवालाच सांगावे लागते. जीवन म्हणजे एक कोडेच असते. पाय लागला म्हणून "क्षमा " म्हणून आपण नमस्कार करावा, असे शिकवतो शिकतो. मात्र मानव त्याच पायानी, लत्ता प्रहार करून मारामारी करतो. "खरा तो एकाची धर्म, जगाला प्रेम अर्पावे" हि साने गुरुजींची प्रार्थना, शाळेपासून आपण शिकतो. उरले सुरले अन्न भिकाऱ्याला देऊन दान करायलाही, आपण शिकतो. पुढे मात्र जगाला प्रेम अर्पावे, तर दूरच राहो. घरी पत्नीला किंवा पतीला, कुटुंबालाही प्रेम अर्पणे विसरतो. भांडणे करणे, टोमणे मारणे, शिकतो. गुण ओळखायला सुद्धा गुणग्राहकता लागते. "सोहम" अहं ब्रम्हास्मि" मीच श्रेष्ठ, असा अहंकार वाढीस लागतो. पुन्हा प्रश्न सोडवण्यासाठी, देवाच्या पाठी, लकडा लावला जातो. वर्षातून एकदा सत्यनारायण केला व एकदा हवन, होम केले, देवदर्शन केलं, कि आपण वर्षभर पापे करतो किंवा पुण्य करणे

विसरतो. यात मला असे सांगायचे आहे की, देवाला कर्मकांड अपेक्षित नसून, माणुसकीची कृती अपेक्षित आहे. भक्तीचे सूर कानी पडले तरी आपण भक्ती मार्गावर जात नाही. म्हणतो,

अरे कृष्णा नको वाजवूस बासरी

त्या मधुर स्वरांनी झाले मी बावरी

मानवाला त्या वेळी हताश वाटते, ऐहिकाची भूल पडते, मला वाटते भक्त देवालाम्हणतो.

"मला त्या भक्तिमार्गाला बोलावू नकोस, मला संसारातच बुडून राहू दे. "

सकाम भक्तीचे भक्त, साधारणतः खूप असतात. निष्काम भक्ती करणारे फार थोडे असतात. बाकी "देवा पाव रे" "देवा पाव रे" असा ओरडा करणारे असतात.

तिन्ही काळ हे, मानवी जीवनाच्या बालपण, तरुणपण व वृद्धावस्था हे काळ दाखवतात. बालपणात भविष्याची स्वप्ने असतात. तारुण्य वर्तमानाचे सुख असते. रुक्मिणीचे दुःख वेगळे. अनयाचे दुःख हि वेगळे असते. तारुण्यात तरुणाईत प्रत्येकच वेळी मध्यस्थ देवाला घातले, तर यश मिळेल, अशी आशा मनात असते व "देवा पाव रे" हि विनंती असते.

वार्धक्यात मात्र भूतकाळातच रमण्यात खूषी उरते. कारण भविष्य संपलेले असते. देवाचा गजर हा काहीतरी हवे म्हणून, केलेला धावाच असतो. पण वृद्धत्वात फक्त शांती हवी असते.

काही काळ वाट बघू या. वेट अँड वॉच हि पॉलीसी, त्याला भक्ती व अध्यात्माची जोड देऊन नवस व व्रते आचरली जातात. देवाची, देवऋषींची, ज्योतिषांची, बुवांची अबोल मध्यस्थी असते. बरीच व्रतवैकल्ये, या व्रतकाळात येणाऱ्या, संकटाना त्रासून अर्धवट सोडली जातात. जी इच्छित गोष्ट असते, ती मिळण्यासाठी प्रयत्न कमी पडतात व आशा संपते. एखाद्या व्रतासाठी, जी इप्सित गोष्ट असते, तिचा संकल्प केला जातो. पण काय वाटेल ते होऊ दे, मी प्रयत्न करेन हि वृत्ती उरत नाही. कंटाळून मग व्रत अर्धवट राहते. कारण पाठपुरावा केला जात नाही.

एक मीराबाईच्या भजन आहे. त्यात ती कृष्णाला म्हणते-

चाहे तो कुसुम्बी रंगनी साडी दे

या भगवा बेस, चला वही देस

असे म्हणणाऱ्या मीरेची भक्ती आपल्या संकल्पात आली कि आपल्या वांछित गोष्टी साठी सर्वाकडून मदत मिळते. पूजा भावते व व्रत यशस्वी होते. तो पर्यंत "देवा पाव रे" असा धावा देवाच्या कानीकपाळी करावा लागतो. त्या व्रताची आठवण, म्हणून आपण एखादा पदार्थ खाणे, पूर्ण वर्ज्य करतो. खाण्यात वेळ जाऊ नये म्हणून उपास व उपासना सुद्धा सांगितली जाते. मात्र आपण मग चविष्ट व तळकट, तुपकट वेफर्स खातो. मिठायांनी पोटाचा पेटारा भरतो. व्रत पूर्ण झाले नाही कि पुन्हा दोष देवावर थोपवतो. सात वारांची वेगवेगळी व्रते असतात व तेहतीस कोटी देवांचे वेगवेगळे मंत्र असतात.

जो पावला तो देव आपला.

नाहीतर व्रताचा क्रम बदला.

काही दिवसांनी व्रताची रुपे आणि जागा, मठ आणि देऊळ बदलते. भक्तीचे रंगरुप बदलते, पण व्रत चालूच राहते. आई म्हणाली "व्रत कर" हि वाक्ये आता कुंपणाबाहेर गेली. ज्योतिषी व्रत सांगू लागले. चांदण्याचे कोष घरात येत नसताना, चंद्रदर्शन, चंद्र पूजा हि व्रते जीवापाड करणे, अवघड झाले आहे. तरीही केली जातात. माणसांना खायला मिळत नाही, पण कुत्र्याला बिस्किटे खायला घातली जातात. घरात खायला अन्न नसते. देवळात साजूक तुपाचे दिवे, लावले जातात.

खरे तर व्रतवैकल्यानी मग देव देवळात कंटाळून जातो. भक्ताची इच्छा पूर्ण होत नाही. भक्त हि वैतागतो.

खरेतर माणुसकी हाच धर्म व

अडचणीत दुसऱ्याला मदत करणे हेच व्रत पाळावे.

स्वेदगंगेच्या तीरी, नांदतो श्रीहरी

देव नाही देवळाच्या गाभारी, देव दुबळयांचा कैवारी

## २५ सुखाची घागर

घर संसार हि एक डोक्यावर ठेवलेली घागर असते. कधी कधी रिकामी, कधी भरलेली. "तिन्ही लोक आनंदाने भरून राहू दे" इतका आनंद, विवाहापासून आणि सहजीवनापासून माणसांना मिळायला हवा. संसार हा सुखाची घागर वाटावा, इतके त्यांचे एकमेकांशी सूत, मैत्र जुळायला हवे. रोजच्या घरकामातून संसार करणे म्हणजे शीण असला, तरी ती संसारकला असते. व ती फक्त स्त्रीलाच जमते. स्वयंपाकात सुद्धा कला असते. कौशल्य लागते. विवाहात सर्व अपेक्षा स्त्री कडून केल्या जातात. देरे वाण्या, घेरे प्राण्या, अशा सारखी वृत्ती गृहिणीची कधीच नसते. किंवा गेलो मी मॉल मध्ये. आणले भरून पिशव्यांमध्ये, असे पाटी टाकणे नको असते. पण रुटीन अवघडही असते. यशासाठी झटावे लागते. बुद्धिबळातील एखाद्या छोट्या प्याद्याने डाव हरला जाऊ शकतो व जिंकला हि जाऊ शकतो. हि माणसे प्यादी घरीदारी गृहिणी जोडते. स्त्रीला तुम्हीच तुमचे मित्र व्हावे लागते. मैत्रीण व्हावे लागते. तरच ती संसारातील मनाविरुद्ध घटना सोसू शकते.

मन चिंती ते वैरी न चिंती.

अशीही घरची परिस्थिती, काही वेळेला येते. पण बाई गृहच्छिद्र झाकून काही दिवस काढते. बाई शक्यतो आपला तोल जपते.

असा कसा जीव बाई दोऱ्याले वीणावा

सुखाची घागर तिला मातीचा गिलावा

सुखात राहू दे हेच थोडेसे मागणे

पाठी पोटाला बांधून बाई दुःखाची वरात.

किती पदराला गाठी आणि अंधार घरात.

स्वतः स्वयंपाक न करणारा पुरुष बाईला "चवी" वरून, स्वयंपाक करण्यावरून भाषण झाडतो. खूप आनंदाच्या क्षणी हि, एखादा डंख मारायला, विषारी शेरा फेकत, आग समोर करणाऱ्याच्या, बरोबर वावरावे लागते. काजूकतली नावाची, एक चौकोनी, चविष्ठ, चंदेरी मिठाई असते. ती मिठाई बनवायला काजू भरडावे लागतात. मग गरम पाकात ती पेस्ट टाकावी लागते. बाईचा जन्म तसाच असतो. तिला खूप प्रकारे अपमानित केले जाते. त्यात दोन बायकांचे, एकमेकींशी पटणे, फारच अवघड असते. आपल्याला एकमेकांना सुख देणे शक्य नसेल, तर दुःख तरी देऊ नये. एवढी जाण, प्रगल्भता, फार थोड्यांत असते. ओरडणे, रागावणे, भांडणे, यातच त्यांना आनंद असतो. घालून पाडून बोलणे, काही जणांना आवडते. त्या नवऱ्याला, ह्यात वृद्ध अशक्त आजारी असूनही आनंदी वाटतो.

पटकन ए टी एम कार्ड टाकून, सुनेला आपल्याला आपले सारखे करायचे असते. कधी असे जीवन म्हणजे विश्वमोहिनीतील विचित्र घटक, म्हणून घागरीत येतात. सासू-सासरे अशा वृद्धांबरोबरचे संबंध, कधी कशी शा टोमण्यांनी, टोचणीने विषारी झालेले असू शकतात. सुखाच्या घागरीत, शिवीगाळी हि असते. वृद्धांच्या मायेचे सुख असते. खरे तर वृद्धांकडे ज्ञान, अनुभव व सल्ले, तरुणांना उपयोगी ठरू

शकतात. मात्र कडवटपणापोटी वृद्धांना, त्या घरातील वातावरणात, लक्ष घालावेसे वाटत नाही किंवा त्यांचे सल्ले, कुटुंबात स्वीकारले जात नाहीत. काही ठिकाणी तर दुसऱ्या व्यक्तींच्या आयुष्यात लक्ष न घालायचे ठरवून, वेट अँड वोच चे धोरण स्वीकारले जाते. काहीतरी कुरबुर कानावर आली, तरीही त्यांचे ते बघतील, अशीही समजुतीची धोरणे काही धोरणी लोके पाळतात. इतरांचे संसार हे त्यांचे ते बघतील असे म्हणणारे काही नातेवाईक, अलिप्त बेटे असतात. त्यांना फक्त लग्न कार्याला, जेवायला, मजेला येण्यातच रस असतो.

पाणवठ्यावर घागर भरायला गेल्यावर, पूर्वीच्या काळी, संसारातील कुरबुरी सांगायला, पाणवठ्यावर, आलेल्या सख्या भेटत असत. घरी सासू, नणंद जाऊ, या पैकी कुणीतरी संसारातील ताण, हलका करायचा प्रयत्न करत असे. त्यामुळे पतिपत्नी एकत्र राहून, कौटूंबिक वातावरणात ताणविरहीत असे जगत असत. एकत्र कुटुंबात ताण होते, पण ते ताण कमी करण्यासाठीचे मार्गही होते. विभक्त कुटुंबात पतिपत्नींना पुढे "अतिपरिचयात अवज्ञा" होऊ शकते. एकत्र कुटुंबात स्वयंपाक व घरकामात मार्गदर्शन मिळत असे. त्यामुळे गृहिणीवर, पंक्तीत, स्वयंपाकावरून भांडणे व्हायची वेळ कमी वेळा येत असे. आता आधुनिक स्वयंपाकघरात जायला, गृहिणींना आधुनिक जीवनशैलीत, नोकरी व मुलाच्या धावपळीत, तेवढे कौशल्य येणे, अवघड होऊन बसले आहे.

नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घरवाला साहेब व बाहेरवाला बॉस असे दोन साहेब विविध आज्ञा करतात. तिची जबाबदारी दुहेरी झाली आहे. व तिच्या सुखाच्या त्या घागरीतील अर्धा भाग घर व अर्धा भाग कार्यालय, असा दोन भागात

विभागला गेला आहे. विवाहसंस्थेच्या इतिहासात हा नवाच अध्याय आला आहे. त्यामुळे महिलांवर ताण सुद्धा येऊ शकतो. पुरुषांना आर्थिक जबाबदारी उरली नाही. नवयुगात महिलांवर घर आणि नोकरी अशी दुहेरी जबाबदारी येऊन पडली आहे.

महिला दिवस रात्र कामात गुंतून पडतात व तुलनेत पुरुषांचे कष्ट फारच कमी झाले आहेत.

कामा मागे काम, किती लावावी ग माळ

प्रपंची येऊनि पडली तीस काळ जाळी

विसरली नामावली, कामांच्या गोतावळी

संसारातील कष्ट संपत नाहीत. संसारातील पुरुष हि थोडा राबतो, मात्र स्त्रियांच्या ओव्यांमध्ये म्हटले जाते.

अरे संसार संसार

जसा तव चुल्ह्यावर

आधी हाताला चटके

तेव्हा मिळते भाकर

आपले दुःख न सांगता, वरकरणी "ऑल इज वेल" दाखवायची बायकांची वृत्ती असते. जसे-

माझे सुख माझे सुख हंड्या झुंबरे टांगले

माझे दुःख माझे दुःख मी भुयारी कोंडले.

बाईच्या मनात नेहमीच माहेर व सासरची तुलना होते. या उलट पुरुष आई व पत्नीच्या गृहकृत्य कौशल्याची तुलना करतो, ज्यात एकजण नाराज होते. बऱ्याच वेळा, बायकोला आई सारखा स्वयंपाक येत नाही अशी तक्रार पुरुष करतात. पुरुष असूनही, त्यांनाही काही दुःख अडचणी असतात. पण जखमी होणे स्त्रीच्या नशिबी येते. सुख दुःख जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. संसार सुखाची घागर म्हणजे एक प्रकारचा मोबाईलचा मेमरीकार्ड आहे. माणसे येतात आणि जातात. ॲड होतात जातात, डिलीट होतात. काहीजण एडिट होतात. फेवरीट मधून, रेसेन्ट मधून, इनऑपरेटिव्ह होतात. हि घागर कम मोबाईल सिम ब्लँक होते व जीवन संपते. नव्या सिम पासून, ब्लँक झालेल्या सिम पर्यंतचा प्रवास म्हणजे घागर भरणे. हि घागर एका लयीने गळत असते. ऊर्जा नाशाने हि घागर रिकामी होत जाते. तत्त्वज्ञानाने संसाराची सुखाची घागर नेहमी, म्हणजे काही वर्ष, बहुतांशी अर्धवट भरलेली असते. ती तुम्ही अर्धी भरलेली आहे, ठीक आहे, असे समजू शकता. अर्धी रिकामी आहे समजू शकता. खरे तर पूर्ण भरलेली घागर कशी असते, कशी असावी, अजून संशोधन चालू आहे. कारण असमाधान हे बऱ्याच संसारात असते.

नव्या वर्षी हि संसारसुखाची घागर भरून वाहू दे.

# २६. रद्दी दिली का?

माझ्या घरात दोन महिन्यांची रद्दी साचली होती. हल्ली वर्तमानपत्रे दहा दहा पानांची असतात. त्यामुळे एखाद्या महिन्यातच रद्दीची पिशवी भरून जाते. घर लहान आणि वॉशिंग मशीनचे पाणी घरात लीक होते. त्यामुळे रद्दी वेळेवर द्यावी लागते. रद्दी ठेवायला खास अशी जागा हि नाही. काकांना ते काम दिले. रात्री काकांना रद्दी दिली का? विचारताच काका रडूच लागले. मला कारण कळेना. तेव्हा काकांनी सांगितले, "रद्दीवाला घरी आला, रद्दी मोजली, बांधली, सायकलला लावली आणि पैसे न देताच सायकलवर टांग मारून, निघून गेला. मी हाक मारत होतो. पण तो थांबला नाही" तेव्हापासून रद्दीवाल्याला घरी बोलवायचे नाही, असे मी ठरवले. पण त्यामुळे रोज रद्दीचा गठ्ठा पाहून मला धडकीच भरते.

रद्दीचा विचार मनात असतानाच, एका मैत्रिणीकडे रद्दी अगदी व्यवस्थित रचलेली दिसली. मी तिला विचारले, "एवढी व्यवस्थित रद्दी कशी रचता?”

ती म्हणाली “ अग वर्तमानपत्रे उघडताच नाही, वेळ नाही म्हणून. तसेच पेपर रद्दीत ठेवले आहेत. " वर्तमानपत्र येताच त्याला स्टेपल करावे, म्हणजे पान सुटे पसरत नाहीत व पसारा होत नाही. रद्दी सुद्धा नीट ठेवली जाते. " अशा काही मौलिक सूचना तिने मला दिल्या. ज्या मला जमण्यासारख्या नव्हत्या. कारण मला शब्दनं शब्द वाचायचा असतो. काही महीन्यानी काका म्हणाले "बाजारात जाऊन तूच रद्दी देऊन ये" मी त्या ढिगाकडे बघत म्हणाले,

"काका रिक्षा करावी लागेल"

काका म्हणाले, "कर "

रिक्षा करून, ती रद्दी देऊन आले. रद्दीचे आलेले पैसे, रिक्षाच्या बिला एवढेच झाले. म्हणजे खर्च, वर वेळ गेला, परदेशातही कागद, वर्तमानपत्रे, प्लास्टिकची रॅपर्स व जमा कचरा, रद्दी जमते. परदेशात रद्दी टाकण्यासाठी गार्बेज बॅग मध्ये, भरून ती दूरवर लांब न्यावी लागते. तिथे हि रद्दीची विल्हेवाट, हा मोठा प्रश्न असतो. तसा कागदाचा लगदा, कागदाचे रिसायकल हा मोठा प्रश्न हल्ली सगळीकडेच झाला आहे. ऑनलाईन, मोबाईल वर, ईबुक, कॉम्पुटर वर अशा ठिकाणी वर्तमानपत्रे, मासिके, कादंबऱ्या देखील वाचता येतात. पण आपल्यालाच कागद हातात घेऊन निवांत वाचायची आवड व सवय झाल्याने ते अवघड जाते.

रद्दीचे उपयोग व रद्दीची विल्हेवाट या विषयावर मी खेड्यात चौकशी करून बघितली. कपडे बदलले, शहरी झालो. राहणीमानात फरक पडला पण मूलभूत प्रश्न तोच उरला. देवळाच्या मागे कागद पसरले होते. प्लॅस्टिकच्या पिशव्या होत्या. कागद निदान बायो डिग्रेडेबल असल्याने नष्ट होईल पण या पिशव्या पर्यावरणाला हानिकारक ठरतील.

जुन्या कागदापासून बनवलेल्या कागदी पिशव्या सुद्धा मिळतात. त्या जर कापडी पिशवीत घालून वापरल्या तरी उपयोगी ठरतील. कागदावर भजी, वडे ठेवले तर तेल निथळायला उपयोगी होईल. कचरा प्लास्टिक पिशवीत टाकण्या ऐवजी, कागदात गुंडाळून कचऱ्याच्या बादलीत टाकता येईल. निवडलेल्या भाज्या, कागदात गुंडाळून फ्रीझ मध्ये ठेवता येतील. कचरा जाळायला, कागदाचे कपटे

वापरता येतील. जुन्या वापरात नसलेल्या वस्तू, कागदात गुंडाळून ठेवता येतील. अंगणात सुकलेली पाने, काटक्या गोळा करून ती कागदाने पेटवता येतील. अशा कल्पने प्रमाणे इतरही काही प्रकारे हि रद्दी वापरता येईल.

रद्दीचे अनेक उपयोग करूनही, ती उरली तर रद्दीवाल्याकडे देणे हा एकाच पर्याय आहे.

मासिके, नियतकालिके, वाचनालयात देता येतील. प्रवासात जाताना सोबत नेऊन, उपयोगी पडतील. टिशू पेपर ऐवजी, हे कागद हात पुसायला वापरता येऊ शकतात. येताना बस मधेच ठेवल्यास, टाकल्यास कोणीतरी ती वाचू शकेल. शिळी वर्तमानपत्रे पुरवण्या हि देखील वाचनीय असतात, व आनंद देऊ शकतात. परगावी गेल्यावर वाटेत, एखादे छोटे वाचनालय किंवा शाळा दिसल्यास हि पत्रे, नकाशे जाहिराती देऊन टाकाव्यात.

नेहमी रद्दी देऊन आल्यावर, मी रद्दी नीट रचून ठेवण्याचा निश्चय करते. पण थोड्याच दिवसात तो ढीग कोसळू लागतो व अस्ताव्यस्त वाढतो. काही स्वयंसेवी संस्था घरी येऊन, रद्दी घेऊन जात व त्या रद्दीच्या विक्रीचा खर्च, त्या संस्थेच्या किरकोळ खर्चासाठी वापरतात. मात्र हि पद्धती अजून रूढ झालेली नाही. रद्दी नीट रचून ठेवायला सुद्धा वेळ नसतो. वर्तमानपत्र सर्वजण वाचतात, मात्र ती आवरून ठेवणे हे फक्त गृहिणीचेच काम असते. आणि मुख्य म्हणजे वर्तमानपत्र नीट उचलून ठेवल्याशिवाय, घर आवरल्या सारखे दिसत नाही. हातात घेऊन वाचताना, इतका आनंद देणारे ते छापील कागदी साहित्य, एकदा पूर्ण वाचून झाले कि रद्दीच ठरते. या गोष्टींचेही वाईट वाटते. जगाची ती, भल्यांची रद्दी बनवने, ही रुढ रीत आहे.

कालबाह्य झाल्यावर माणसाची सुद्धा किंमत रद्दी होऊ नये म्हणजे मिळविली. नाहीतर आल्यावर जेव्हा ते नियतकालिक ताजे असते, त्यावर किती उड्या पडतात. ते आधी कोणी वाचायचे, यावरून भांडणे हि होतात. आणि दोन दिवस उलटले कि ते नियतकालिक कोपऱ्यात जाऊन पडते.

दरमहा करावयाच्या कामांच्या, मोठ्या यादीत रद्दी देणे हे मोट्ठे काम माझ्या नावावरच लागले आहे. मध्यंतरी एकदा वाचनात आले होते. नोकरदार मंडळींचा पगार झाला कि पहिला आठवडा गोल्डन वीक असतो, दुसरा आठवडा सिल्व्हर वीक बनतो. तिसरा आठवडा नॉर्मल वीक असतो. चौथा आठवडा पेपर वीक असतो. पेपर विकून तो आठवडा कसा तरी भागवायचा असतो.

तेव्हा पासून महिना अखेरीस, मी सर्व रद्दी पिशव्यात भरून घेऊन जाते व येणाऱ्या पैशातून कांदे व बटाटे आणते. जमाखर्चाचा ताळमेळ चांगला बसतो. तुम्ही तुमच्या घराची रद्दी दिली का? रद्दी देण्याला कंटाळायचे? पेपरलेस ऑफिस, पेपरलेस घर होणे शक्य नाही. कारण कि कागद हातात घेतल्यावर जो आनंद मिळतो तो नजर, स्पर्श, सुगंध सर्व प्रकारे सुखावून जातो. त्यामुळे रद्दीला कंटाळायचे नाही. प्रत्येक वस्तू नियत काळ पूर्ण झाला कि निरुपयोगी होते. त्या काळानंतर ती घरात ठेवणे शक्य होत नाही, अडचण होऊ लागते. पाने जीर्ण पिवळी होतात. चालायचेच जगरीत, जनरीत आहे ती. रद्दी देणे हे हि आवश्यक असे, त्रैमासिक काम झालेय.

# २७. राजाराणीचे गाणे

राजा राणीचा गोड संसार - हे एक आकर्षक स्वप्न असते. राजाराणीचे गाणे आनंदी असावे ही अपेक्षा असते. पूर्वी बरीच भांडणे एकत्र कुटुंबात राहण्यामुळे होत व बाईला आपला राजाराणीचा स्वतंत्र संसार मांडावा वाटे.

ऊन ऊन खिचडी, साजूक तूप

वेगळे राहायचे भलतेच सुख

अशी एक कविता, त्या काळी म्हणजे ७० च्या दशकात गाजली होती. कारण त्या काळात स्वतंत्र घर करून राहणे, अगदी क्वचित असे. लोक वाढले तरीही, एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. व राजाराणीच्या संसाराचे आकर्षण वाटे. आम्ही दोघे राजाराणी, घरात नाही तिसरे कोणी.

अशी विभक्त कुटुंबाची आकर्षक व्याख्या होती. त्यापूर्वीचा पंचवीस माणसांचा, रामरगाडा, बुढीचे खटले, याकडून चौकोनी कुटुंबाकडे, समाज वाटचाल करीत होता. पुढे या चौकोनी कुटुंबातून म्हणजे नवरा बायको आणि दोन मुले, यातून एक कोन वजा झाला. दोन मुलेही नकोत. एकच मूल पुरे, या दिशेने सुशिक्षित कुटुंबे वाटचाल करू लागली. स्त्रिया छोट्यामोठ्या नोकऱ्या करू लागल्या. "न"विसरता येणारे संघर्ष ताण-तणाव कमी झाले. पण तुटकपणा व एकटेपणा वाढला. घरे तुटत होती. "वीस"माणसांच्या कुटुंबाच्या, घराची "दहा"घरे झाली. जागेच्या किमती वाढल्या व माणसे मात्र कमी किमतीची स्वस्त वाटू लागली.

या विषयावर मला लिहिणे सोप्पे नाही, अवघडआहे, मात्र ह्या सर्व परिस्थितीला, कोण एक व्यक्ती अजिबात जबाबदार नव्हती. काळाची बदलती पावले, आज बहुतांश व्यक्तींना अस्वस्थ करीत आहेत. स्वतःपुरते बघण्याची वृत्ती, अंगी बाळगलेली व्यक्ती, सुखी होतेय. हे बघून अन्य व्यक्तीही मग अलिप्त बेटे बनल्या आहेत. वेगळे राजाराणीच्या घर, हे आता कॉमन झाले आहे. कारण या पिढीने खूप मोठे सामाजिक बदल बघितले, सोसले आहेत. मात्र या छोट्या कुटुंबामुळे एकटेपणा वाढला, निराशा वाढली, वाढत्या आत्महत्यांचे प्रमाण गोंधळून टाकणारे आहे. जगण्यासाठी संघर्ष करताना, माझ्या सोबतीला कोणीही नाही, असे जेव्हा वाटते, तेव्हा ती व्यक्ती आत्महत्या करण्याचा विचार करते. मानवाला जेव्हा हा संघर्ष अंगावर येतो, झेपेना होतो, तेव्हा तो आत्महत्या करतो. नाते संबंधातील बिघाड, हे आत्महत्यां मधील सर्वाधिक केसेस मधील कारण आहे. राजा राणीचेच पटेनासे झालेले असते. गाणे बेसूर झाले आहे. पतिपत्नीतील बेबनावाच्या केसेस घडत आहेत. घरात बाकीच्यांशी पटो न पटो राजा राणीचे तर पटायला हवे ना!

विवाह यशस्वी होण्याची नक्की युक्ती कोणती? या बाबत कौटुंबिक सल्लागाराने अनेक सल्ले दिले तरी प्रत्येक व्यक्ती हि वेगळी असते व एका केस मध्ये लागू पडलेले उपाय, दुसऱ्या केसेस मध्ये लागू पडतीलच असे नाही. बऱ्याचदा अशा केसेस मध्ये, सल्ला अर्धवट सोडला जातो, हे उपचार बरेच महागडे, खर्चिक असल्याने सर्वसामान्यांना परवडत नाहीत. ज्या केसेस अयशस्वी व्हायच्या असतात, त्या सर्व प्रयत्न करूनही अयशस्वी होतातच. शिवाय एक व्यक्ती मनापासून लग्न टिकवण्याचा प्रयत्न करताना, दुसरी व्यक्ती झिडकारू लागली, तर उपयोग होत

नाही. वरकरणी स्त्री पुरोगामी वाटत असली, तरीही ती पूर्णपणे असुरक्षित आहे, हे असत्य नाही. त्यामुळे मुंबईच्या आत्महत्यांचे बऱ्याच केसेस मध्ये, मुलांना आधी खाली फेकून, मग स्वतः उडी मारण्याकडे कल दिसतो. त्यात आपल्या माघारी, अनाथ झालेल्या आपल्या मुलाचे, हाल नको, हा विचार असतो. कारण आईविना मुलाचे होणारे हाल, आपण ऐकत असतो. मुले हि नवरा बायको यांच्यातील दुवा असली तरीही ताण तणावाचे कारणही ठरू शकतात. मुले वाढवणे, त्यांना घडवणे, या स्पर्धेच्या युगात त्यांची करियर घडवणे खूप अवघड असते. याबाबत इतर कुटुंबातील यशाशी तुलना करून माणसे आधी दुखी होतात.

हि भांडणे म्हणजे "पत्नी कलगी पती तुरा, का घरी होई मग वाद कलगी तुरा?" अशी वाढतात व सुखा ऐवजी दुःख देतात. ईर्षा, द्वेष, मत्सर हे माणसाला चुकत नाहीत. ते दुर्गुण शत्रू असले तरीही, ते जीवनाचा अविभाज्य घटक आहेत. मी स्वतः उपदेशपर लिखाण करते पण मी स्पष्ट सांगते कि दुर्गुण मलासुद्धा हैराण करतातच. कधी कधी मी कंटाळून success is a chance " या वाक्यावर येऊन हताश बसते. माणसाचा भौतिक विकास झाला पण आंतरिक जीवन असमाधानी झाले. नातेसंबंध मधील कटुता, टाळू म्हणून टाळता येत नाही. कारण त्यात सर्वस्वी जबाबदार अशी एक व्यक्ती कधीच नसते. तर तो एक लंबक असतो. जो दोन्ही व्यक्तींकडे, झुकत नित्य फिरत राहतो. पूर्वी मित्र मैत्रिणी, शेजारी, सासू, नातेवाईक, पार फेरीवाले सख्या पाणवठ्यावरचे सहकारी, यांच्याशी बोलून, भाव व्यक्त होण्याला वाव असे. आता मनातल्या भावना, विचार, खेद, मनात ठेऊन अव्यक्त रूपाने, शिजत राहतात, छळतात.

राजाराणीच्या गाण्यात चुकीचा सूर लागतो आहे. नवरा बायको मधील विसंवाद सुप्त राहतो. भांडणांनी वाढतो. नात्यातील त्या दबलेल्या विचारांना, कोणी चांगल्या प्रकारे वाट देते, कोणी छंदाकडे वळते. कोणी वाईट प्रकारे, या भावनांचा निचरा करतो. व्यसनाकडे वळतो. छांदिष्ट होतो किंवा अन्य भलतेच मार्ग चोखाळतो. मानसिक आरोग्य अशावेळी जपायला हवे.

परिस्थिती बदलणार नाही मनस्थिती बदलावी

तरीही समाजात, आज मानसिक भान आले आहे. या शतकात, हल्ली हल्ली बदलत्या सामाजिक परिस्थितीचा, मानसिक रोगांचा विचार होवू लागला आहे, आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची चर्चा होऊ लागली आहे. थ्री इडियटस, तेरे नाम अशा चित्रपटाद्वारे मानवी मनाचा संवेदनशीलतेने विचार होऊ लागला आहे. राजाराणी एकमेकांबद्दल विचार करून, आपल्या मुलांच्याही मनाबद्दल विचार करू लागले आहेत. एकत्र कुटुंबांपेक्षाही, विभक्त कुटुंबे बालकेंद्रित असतात. पण मुलाला एकाकीपण देतात. राणी नोकरी करते. राजा राणीचे संसाराला पाळणाघर, सुद्धा आवश्यक ठरले. पाळणाघरांचे बालमनावर होणाऱ्या त्या परिणामांचा सुद्धा अभ्यास व्हायला हवा. घरात आजी आजोबा हवे हि इच्छा स्वाभाविक आहे. पण शक्य नसल्यानेच तर, पाळणाघरे अस्तित्वात आली आहेत. त्याचाही विचार या बदलत्या मनोविकासाच्या अभ्यासात, करायला हवा. राजा राणीच्या गाण्यातील मुलाचा ताल जमायला हवा.

टीव्ही, फेसबुक, मोबाईल, व्हिडीओ गेम्स वारंवार कानावर पडणाऱ्या, गुन्ह्याच्या बातम्या, जागतिक मंदी, यासारखे अनेक प्रश्न, मानसिक आरोग्यावर परिणाम करतात. राग नैराश्य वाढण्याचा संबंध प्रदूषणाशी सुद्धा आहेच.

आहाराशी आहे. जास्ती हळवेपणा त्रासदायक ठरतो. बदललेल्या समाजव्यवस्थेत मीही गोंधळले आहे. या विषयावर आज मी लिहिते कारण मला या विषयाकडे लक्ष वेधायचे आहे. या विषयावर अनेक तज्ञ लोकांनी अधिकाधिक लिहावे अशी माझी इच्छा आहे. या प्रश्नांवर जागृती होऊन उपाय सापडावा हि इच्छा आहे.

भावनिक जागृती हे वर्तमानपत्रातील मासिकांमधील सदर खूप छान आहे, त्या नुसार अंमल करायचा प्रयत्न करून बघावा. तो पर्यंत-

मन करा रे प्रसन्न, सर्व सिध्दीचे कारण

माझिया मन रे एेक जरा

हळवेपणा हा नाही बरा.

बी ब्रेव्ह!

# २८ नापास लेख

त्या दिवशी पोस्टाने माझे अनेक लेख परत आले. असे नाकारलेले लेख परत आले, नापास झाले, कि मला वाईट वाटते. नवोदितांना नाव होईपर्यंत ज्या अनेक वेळा खट्टू व्हावे लागते, त्यातील हा एक प्रसंग असतो. कधी चिडचिड होते. कधी खूप वाईट वाटते. सर्वच वाचकांना आपण लिहिलेले लेख आवडलाच पाहिजेत, कारण ते मायबाप आहेत, मात्र त्या आधी ते मला आवडले पाहिजेत. मी देवाला सर्वोत्तम फुले देते, तसेच वाचकांनाहि सर्वोत्तम दिले पाहिजे. मला खूप आवडेपर्यंत मी त्या लेखाचे पुनर्लेखन करीत राहिले पाहिजे. ते मी करते, पण कधी लेखाची भट्टी जमत नाही. माझे लेख मी जेव्हा झेरॉक्स काढायला देते तेव्हा मी बाकी काही हरवू नये, पण हरवले तरी चालेल, पण लेख मात्र हरवू नये अशा भावनेने ते बाड जीवापाड जपते.

आता माझ्या वयोमानाप्रमाणे या वयात अक्षर काय सुधारणार? पण मी माझ्या परीने प्रयत्न करते. टंकमुद्रण करायला मला वेग येत नाही आणि माझ्या कल्पना पुढे धावतात, हाताचे टायपिंग मागे राहते. मेळ बसत नाही. शब्द, विचार, अनुभव प्रगटीकरण हि माझी शस्त्रे आहेत. त्या शस्त्रांना धार देण्यासाठी मी नेहमी प्रयत्न करते. तो कसा? तर व्याख्यानाला जाणे, खूप वाचन करणे, वेगवेगळे असे विचार ऐकणे, अनुभव घेणे, हे माझे कर्तव्य मानते. मी लिखाणाच्या बाबत कोणताही गुरु केलेला नाही. तर अनुभव हाच गुरु. (गुरुदत्त हा गुरु नाही) सर्व सामान्यांप्रमाणे माझी स्तुती केलेली मला सुखावतेच, पण त्याहून अधिक मला इतरांनी माझ्या लिखाणाची स्तुती केलेली मला अधिक आवडते. ओळखीतून

संपादकांशी चर्चा करून, एखादा लेख, एखाद्या वेळी छापला जाऊ शकतो. अर्थात तोहि फार क्वचित. मात्र पुढे टिकून राहायला गुणवत्ता टिकवावी लागतेच. लिखाण क्षेत्रात भांडवल लागत नसल्याने स्पर्धा खूप आहे. आपले काही लिखाण छापून आले नाही, कि वाईट सुद्धा वाटते. पण सहन करायचे म्हणत, आपले पाय ओढत ओढत, मी तिथून बाहेर पडले. मी काही कोणते उत्पादन विकत नाही. मी काल्पनिक शब्द, नवे विचार पेरते.

मी शब्दांची विक्रेती नाही तर मी शब्द पेरणारी बागकाम करणारी आहे. मुलांना जशी शाळेला सुट्टी असली कि त्यांच्या आनंदाला बहार येतो, तसा मी सहलीला गेले प्रवासाला गेले कि माझ्या कल्पनांना बहार येते. कित्येक कल्पना त्या त्या वेळी लिहिल्या नाहीत, तर त्यांचा पुढे विसर पडतो व त्या जिरून जातात. मी उगीचच एका मनातील गावाच्या वाटेने चालू लागले. मी एक प्रतिसृष्टी निर्माण केली आहे. ती माझ्या मनातच दडून राहते. मनात माझ्या ती श्रीकृष्णाची बासरी म्हणजे प्रतिभा वावरत असते. मग मी लिहीत सुटते.

रस्त्यावर ऐसपैस पसरलेल्या वाफ्यात, विविध रंगांची फुले पसरली होती. मला त्यातले एकाच आवडले ते मी खुडले. एक मैत्रीण भेटली. नातवाला कडेवर घेऊन फिरायला निघाली होती. मला म्हणाली "उगीच रडके लिहितोस तू" - ती

मी माझ्या अनुभवातून इतरांना उमेद द्यायचा प्रयत्न करते. मी असे सांगू इच्छिते कि दुःख सर्वांनाच आहे" मी

"पण काय व किती सांगायचे? कुठे थांबायचे? ते जाणून घे. " ती

"तूच एखादा विषय सुचवा" मी

“बायका त्याच त्या विषयावर लिहितात. फक्त भावनेने लिहितात.

त्यात बुद्धिवाद यायला हवा" ती

"म्हणून मी आज बाहेर फिरायला आले. बंद दरवाजा बाहेरचे विषय शोधते आहे" मी

"तेच ते पिढ्यानपिढ्या वापरलेले शब्द, उपमा, उष्ट्या वाटतात. नवीन शब्द, विचार मांड, "ती उपदेशपर सांगू लागली.

"प्रयत्न करिन" मी उत्तरले

“बी लाईक वूमन

थिंक लाईक मॅन

वर्क लाईक डॉग

असे एक वाक्य आहे. " ती

"सगळे मनातले मी लिहू शकत नाही. मनातला लाव्हारस मी बाहेर ओतू शकत नाही. " मी

“कुटुंबा बद्दल लिही, किंवा चुलाण्यावर भाकरी भाजणाऱ्यांच्या विषयावर लिही. मध्यमवर्गीय विषय आता शिळे झाले आहेत. शिवाय मालिका कौटुंबिकच असतात. त्यामुळे वेगळे लिही. ”

ती निघून गेली. निराशा पुन्हा मनाच्या दारावर धडके देऊ लागली. मी खूप विचार केला, पण मला माझ्याच गुणवत्ते बद्दल संशय वाटू लागला, मी माझे लेखांचे बाड एकदा हाताळले, वर वर वाचले.

जलाशयात लेख बुडवायचे ठरवले. कुठल्याश्या समोर आलेल्या बसचे तिकीट काढून मी बसच्या खिडकीशी बसले. काय लिहावे? वाचावे, मग काहीतरी खास सुचते. पण ते शब्दच मला सांगतात लिहून ठेव. “नंतर विसरशील खास मला दृष्टी आड होता. " म्हणून मग कागदावर मुद्दे लिहून ठेवते. तरीही काही काळाने काय मुद्दा होता, ते पूर्णपणे आठवत नाही. कधी पार गझनी होतो. कलाकारांची मी अकलाकार होते.

थोरामोठ्यांचे लेखन वाचले कि वाटते, यांच्या पुढे आपण किती क्षुद्र आहोत. लिखाण बंद करावे. मग काही दिवसांनी अगदीच वाटते.

बेचैन हो गयी हूं क्या करू?

कागज पे कलम से स्याही भरू?

मग लिहीत सुटते. शब्दच शब्द! एखाद्या हताश क्षणी लेखणी खाली ठेवते. कथानकाला गाभा हवा हे कळते, पण सामान्यांच्या, साध्या माणसांच्या आयुष्यात, चटक रंजक कथा कोठून येणार? वेगळे विषय हवेत, पण इतर राष्ट्रातून, परग्रहावरून विषय आणत येत नाहीत. त्याच त्या विषयावर पुन्हा पुन्हा किती लिहायचे? मग मी पुन्हा माझे ते कागद- टिपण उचलून ठेवते व गुरुदत्तच्या प्यासा चित्रपटातील लेखका प्रमाणे नाराज होऊन बसते. काही वेळाने दुसराच विषय सुचतो. त्यावर मग लिहिते, मनात गोंधळ असतो, तरी शब्द कागदावर उतरतात

म्हणून ते मनातून जात नसतात. ते अस्वस्थ करतच राहतात. फुलापानांचे, खाण्यापिण्याचे, निसर्गाचे, पर्यटनाचे विषय घेऊन लिहिणे, शाळकरी निबंधा सारखे वाटते. किंवा बहुरुप्याने राजाचा, जरा बरा अभिनय करावा तसे बेगडी वाटते. ते लेख नक्की नापास होतीलच, असे वाटतात. एखादी मुलाखत द्यायला जाते, वर्ख लावलेल्या बाहुल्याप्रमाणे, खूप सजलेले ते व्यक्तिमत्व मला भुरळ घालत नाही. मुलाखत पूर्ण होते, पण मला ती कागदावर लिहावीशी वाटत नाही. ती न लिहिताच मी तो लेख नापास करते.

रोज घरासमोरच रस्ता वाहत असतो. तिथल्या हॉटेलात, रोज शंभर तरी लोक येतात. वाहने जात असतात. पण त्यातल्या त्यात माणसांच्या अस्तित्वाने मला माणसात वावरल्या सारखे वाटत नाही. त्या खूप खचाखच भरलेल्या गाडीत किंवा गावी जाणाऱ्या त्या एसटी मध्येव एखादी बाई काहीतरी सांगत असते, कथा वेगळी होती. मी त्यावर लिहायचे ठरवले. पण ती उतरून गेली, मग एक नव्वद वर्षाची आजी शेजारी येऊन बसली. तिच्या जवळचे अनुभवांचे गाठोडे उलगडून सांगत होती. तिला मी अधिक बोलती केल्यावर ती वेगवेगळ्या विषयावर बोलत राहिली.

माझ्याही मनावरचा नापासांचा ठसा विरळ, पुसट झाला. मुलांच्या सुट्टीमुळे तो ताण कमी झाला. नापास लेखांचे दुःख कमी झाले. आजी आनंदी होती, जीवन प्रेमाने रसरसलेली होती. निसर्ग बघत होती. तिच्या डोळ्यात मला आपला जीवनाचा सारांश दिसला. मला बरे वाटले.

"पणतीच्या लग्न पर्यंत जगायचे आहे"

ती सांगत होती. गावातल्या थांब्यावर एसटी थांबली. मी उतरून बस स्टॉपवर बसले. समोर पिंपळाचा पार आहे. गेली पंचवीस वर्ष, तिथे एक बाई रोज प्रदक्षिणा घालायची, ती अजूनही घालत होती. आकाशात एक घार भक्ष शोधात फिरत होती. पायवाट बुजू लागली होती. गाव आता ओकेबोके झाले होते. गावकरी, सर्वजण शहराकडे धावले होते. शेती सुकून गेली होती. गावात दुष्काळ होता. तळ खोल गेलेल्या विहिरीत, बादल्यांची खडखड ऐकू येत होती. पाण्याचा टँकर आला. जे थोडे गावकरी गावात होते. त्यांनी पाण्यासाठी धाव घेतली.

मी ज्या बसने आले, तिच आता परत निघाली होती. मी परत बसमध्ये बसले. दुष्काळा बद्दल लिहायचे ठरवले. शब्दांचा, विषयाचा दुष्काळ पडून चालणार नाही. साभार परत आलेल्या त्या नापास लेखांचा, तळ हुडकून, त्यातूनच काहीतरी भागवायला हवे. बादली, मनाच्या तळाशी टाकून खरवडून विषय काढून लिहायला हवे. आजीला नव्वदाव्या वर्षी पणतीचे लग्न बघायची इच्छा होती. कधीतरी माझेही "नापास लेख" प्रसिद्ध झालेले, मला बघायला मिळतील. एवढ्यात नाउमेद होऊन कसे चालेल. जीवन एक ग्रॅम असो, शंभर ग्रॅम असो. नाहीतर भारंभार असो. ते जीवन असते. नापास झालो, तर पुन्हा परीक्षा द्यायची सोय असतेच.

गुच्छातील खूप सुंदर फुलामधूनच आपण एखादे फुल आपण निवडतो. तसाच लेख निवडण्याचा अधिकार छापणाऱ्याला असतो! मी घरी पोहोचताच नापास लेख हुडकून पुन्हा त्यांच्यातून पुनर्निर्माण करण्यासाठीच पुनर्लेखन करणार आहे.

डोंगरातून जाणाऱ्या नागमोडी घाटातून, गाडी डॉलदार वळण घेऊन पुढे जात होती. डोळे मिटून, मी माझ्या नापास लेखांची नावे आठवत, त्यांची पुनर्बांधणी कशी करायची याचा विचार करू लागले. पूर्वी दिवाळी अंकात ने, हमी अशा नापास कविता, साभार परत आलेले लेख, याबद्दल लेखक व कवी यांची टिंगल केलेली असे. अशा टिंगलीकडे दुर्लक्ष करूनही हे लेखक लिहीत राहिले म्हणून पास झाले. नापास शब्दातच पास शब्द सामील आहे. अनावश्यक गोष्टींतून "ना" काढून टाकले कि माझे लेखही पास होतील. हातातले बाड मी कवटाळले. माझा उतरायचा बस स्टॉप आला, मी लगबगीने खाली उतरले.

मला खूप काम करायचे होते. पास नापास लेखांचे लिखाण करायचे होते.

## २९ श्री गुरुदेव दत्त

श्री गुरु सारखा असता पाठीराखा

इतरांचा लेखा कोण करी

राजयाची कांता काय भीक मागे

मनाचिये जोगे, सिद्धी पावे||

कल्पतरू तळवटी, जो कोणी बैसला

काय वाणी, त्याला सांगे जोगी ||

ज्ञान देव म्हणे, तरलो तरलो

आता उद्धरलो गुरु कृपे. ||

श्रीदत्तगुरूं बद्दल, मनात एक खूप वेगळाच गूढ आदर भाव असतो.

पाव दत्ता पाव दत्ता मला आता

याच स्थळी येऊन शांत करी चिंता.

दत्तांची गाय, त्यांच्या आजूबाजूला वावरणारे ६ कुत्रे, त्यांच्या हातातील कमंडलू व मायाळू आशीर्वाद देणारी नजर, सामान्य भाविक भक्ताला भावते. स्वतःचे प्रतिबिंब आपण आरशात बघतो. जगाचा आकार आपण स्वतःवरून ठरवतो. दर्पणाला रूप नसते. आपण बघू ते रूप त्यात दिसते. तसे दत्तगुरु आपले वाटतात

तसे "थेम्ब अमृताचे"भक्ती भावाचे असतात. चिवित्र विचित्र व लहरी माणसांना देवाचे निराळेच रूप भावते. श्रद्धा व अंधश्रद्धा यात फरक एखाद्या सुताचाच असतो. पण फरक आहे व श्रद्धाही आहेच.

लागोनिया पाया विनवतो तुम्हाला

करे टाळी बोला मुखे नाम

दत्त दत्त म्हणावे वेळोवेळा

त्रिगुणात्मक त्रिमूर्ती दत्त हा जाणा.

तसे गुरुदेव दत्त गुरुदेव दत्त म्हणून मन शांत होते. दत्ताला पिवळे फुल वाहून गुरुवारी दूध पेढ्यांचा नैवेद्य दाखवून पूजा केली जाते. गुरुवारची दत्तपूजा व दत्तउपासना पारमार्थिक आनंद देते. एक प्रकारचा विरक्त भाव, दत्तगुरूंच्या पूजेने येतो. त्रिमूर्तीदत्त मूर्तीत एक मूर्ती शांत, एक दुःखी, व तिसरी मूर्ती आनंदी भाव दर्शविते. एकाच व्यक्तीत जशा तीन अवस्था असतात तसे, हा भाव दत्तगुरु सांगतात जणू!

दत्त दिगंबर दैवत माझे

हृदयी माझ्या नित्य विराजे,

दत्तगुरुंना नित्य स्मरावे.

# ३० खरी लग्नाची गोष्ट

सिनेमात, मालिकांत खूप गोष्टी ऐकल्यात व पाहिल्यात व पाहाल, पण लग्न म्हणजे कायम एक शुभकार्य असते. शारदा पासून एका लग्नाची गोष्ट. लग्नाची दुसरी गोष्ट, अशा नावाच्या अनेक चटक मालिका व बीबी नंबर वन, जोरु का गुलाम, "शादी करके फस गये यार" अशा अनेक चित्रपटांमधून विवाहाबद्दल आपापले तत्कालीन विचार प्रतिबिंबित होतात. "हम आपके है कौन ", 'विवाह', ' दिल चाहता है', 'कभी कभी' या व अशा काही हिंदी चित्रपटानंतर, ते बघून, नाटके बघून नंतर लग्न म्हणजे, काही तरी ग्लॅमरस इव्हेंट आहे, असेच माणसांना वाटते. लग्न म्हणजे सहजीवन, संसार, ताणतणाव, घरकाम, स्वयंपाक, एकमेकांचे सोबतीने वृद्ध होणे, मुले होणे, आजारपण, कुटुंबाची जोपासना, या अ-वलयांकित कंटाळवाण्या घटनांसाठी मनाची तयारी केली जात नाही. शादी व लग्न म्हणजे काय? याबद्दल नीटसे सांगितले जात नाही.

विवाह योग्य तरुणाला कन्या हवी असते ती कशी? 'स्वयंपाकीण, देखणी, सर्वगुणसंपन्न, नोकरी करणारी, घरकाम कुशल'! तर 'पांढऱ्या घोड्यावरून राजपुत्र येईल' अशी सिंड्रेला छाप स्वप्न उपवर तरुणी बघते. प्रत्यक्ष आयुष्य जगायची वेळ आली कि, होणारा अपेक्षाभंग त्रासदायक ठरू शकतो. शेवटी लग्न म्हणजे जुगारच असतो. लग्नात व युद्धात दान कसे पडेल सांगता येत नाही. त्यामुळे लग्न हे पुढे पुढे एक रुटीन उरते. नापास झाले म्हणून कोणी शिक्षण सोडत नाही. कि एका कुणाच्या नापास होण्याने शाळा बंद होत नाही. तसे एखादे लग्नातील एखाद्या प्रसंगी नापास

होण्याने, लग्नसंस्था अयशस्वी ठरत नाही. एखादे लग्न अयशस्वी झाले तर लग्नसंस्था हलते. मात्र नाकामयाब ठरत नाही. रस्त्यावर चालताना, होणाऱ्या अपघातांचे प्रमाण, हे सर्व अपघातांत जास्त आहे. तरीही लोक रस्त्यावर चालतच राहतात. तसे अनेक लग्नांमध्ये अनबन होत असते पण लग्ने होत राहतात व पुढेही होत राहणार आहेत.

समाजात आज घटस्फोट हि समस्या आहे. पण स्त्री हि हातातले गरम दुधाचे पातेले तेव्हाच हातातून सोडते, जेव्हा हात पोळू लागतात व वेदना सहन होईना होते. त्यामुळे घटस्फोट होण्याची कारणे जाणायला हवी. "मानव जन्म हा एकदाच मिळतो. त्यामुळे मनासारखे वागून घ्यावे. "अशी एक वृत्ती असते, ज्यामुळे टोकाचा अविचारी, घटस्फोटाचा निर्णय घेतला जातो. एकमेकांचे संमतीने घटस्फोट घेतला जातो. तेव्हा तो जास्ती वेळकाढू व त्रासदायक नसतो. त्यात हळव्या व गुंतलेल्या व्यक्तीला मानसिक त्रास मात्र होतो. बहुदा दोघांना सामान्यतः सुटका हवी असते:

लग्नाचा प्रवास हा वेगवेगळ्या पायर्यांवरून होतो.

आधी सुख असते मग, पत्नीची मुजोरी

तिची नित्य सेवा

मरण बरे देवा

असे नवरा म्हणतो. (चाल देहाची तिजोरी)

भांडणे वाढली कि -

मी जाते माहेरी

गुंडाळून गाशा

नको ती भांडणे

नको तो तमाशा, असे बायको म्हणते

नंतर दोघेही म्हणतात

संसार करता दगदगलो मनी

सुखाची गुरुकिल्ली द्या हो कोणी

मानसशास्त्रांत अशी गुरुकिल्ली शोधली जाते. पण प्रत्येकालाच वाटते, कि फक्त माझेच बरोबर आहे. त्यामुळे मनमुटावं अवघड जातो.

वधू वरांची झाली सप्तपदी

दोघांची होती पसंती

उरले प्रेम मात्र कधी मधी.

चालू प्रश्न सुटल्यानंतर भांडणे थांबतील, साडेसाती संपल्यावर संबंध सुधारतील असे म्हणून लग्न टिकवून ठेवण्याचे प्रयत्न चालू राहतात.

जुने जाऊ द्या मरणालागूनी

नवे घेऊ या स्वागत करुनि

असे म्हणत वेगवेगळया प्रकारे, लग्न सुधाराचे प्रयत्न केले जातात. मांडवाखालून गेल्याने कळसातले, (कळशीतले) पाणी पडल्यामुळे, काही प्रमाणात प्रगल्भता येते. पण कधी कधी प्रश्नच अवघड असतो. या बाबत अनुभव हाच गुरु असतो. लग्नाच्या बाबतीत सर्व उपाय हे आंधळी कोशिंबीर असतात. नात्यांचेही तसेच होते. कित्येकदा वाटते, हे सर्व प्रयत्न सोडून जावे. जगणे मरणे या एक

श्वासाचे अंतर असते, पण प्रयन्त करतांना चुकू नये. लग्न संबध सुधारण्यासाठी त्यावर काही उपाय सुचवले जातात ते असे-

१. देवदर्शनाला जोडीने जावे

२. सहलीला फिरायला जावे.

३. दोघांनी मौन पाळावे.

४. जीवनातील आनंदी (सोबत घालवलेला) सुखाचे क्षण लिहिणे.

उपाय यशस्वी झाले तर ठीक, नाहीतर घडमोडीचा विचार केला जातो.

या खटल्या साठी जज नसतानाही, कोर्ट नसतानाही मग सुरु होतात आरोपपत्रे, कैफियती! स्त्री कठपुतळी बनते. अभिव्यक्तीच्या मर्यादेमुळे, काही गोष्टी व्यक्त होत नाहीत व मूळ आरोप शब्दांच्या ओळीच्या आत दडून राहतात. आपल्या दु:खाने इतरांचे मनोरंजन होऊ नये गॉसिप होऊ नये म्हणून काही कारणे दडून ठेवळि जातात, राहतात. एखाद्या मध्यस्थाला मध्ये घालून चर्चा व सुलह करण्याचा प्रयत्न होतो.

घरात मत बाहेर पत, घरात म्हातारा असावा'

पण अंगी तर्कट नसावा त्याला मध्यस्थ करावा.

अशा म्हणी प्रमाणे तो सुयोग्य असेल, तर भांडण मिटते. दोघेजण पतिपत्नी मनात झुरतात. मनाचा एकांत सरत नाही.

देहाची मरगळ हटत नाही,

दिवसभर शोधूनही,

जगण्याचा हेतू कळत नाही.

असेहि गोंधळमय वातावरण होऊ शकते. यात सुशिक्षित सुद्धा असतात.

लावा दुर्बीण आकाशी

घरी पत्नी उपाशी

पारंपरिक संस्कार व आधुनिकता या मुळे समाजातील सर्व व्यक्तींवर या जागतिकीकरणाचा परिणाम झाला आहे. अनेक प्रकारे मनाविरुद्ध घटना घडून, सहनशक्ती वर आघात होत आहे.

सगळेच कसे होणार मनासारखे,

आपलेच कधी आपल्याला होते पारखे'

आपण दार बंद केले तर कुणाचेच अडत नाही

एका व्यक्तीच्या नसण्याने काही फरक पडत नाही

काडीमोड झाली की मग आपण सामाजिक कार्यक्रमाला जाणे टाळू लागतो. एकटे असतोच व एकाकी बनतो. एखाद्या कार्यक्रमाला जोडीने जातो, पण अवघडलेपणा स्पष्ट दिसत असतो. खरी लग्नाचि गोष्ट कशी असते?

# ३१ लग्ने पूर्वीही होत होती

लग्ने पूर्वीही होत होती, भांडणे घटस्फोट पूर्वीदेखील होत होते. नैराश्य पूर्वीही येई.

वरकरणी कुठल्या शारीरिक आजाराचे कारण सांगून, वेळ मारून देतो. मनातल्या गर्भगृहात कोप (संताप) शिजत राहतो. काही शारीरिक रोगसुद्धा राजा-राणीला वधू लागतात. ऑल इज वेल" असे वाटते व ते तसे करायचा प्रयत्न नवरा बायको दोघेही करतात.

जगातला सर्वात मोठा त्रास, गुंतागुंतीचे मनोव्यापार देखील नात्यांमुळे निर्माण होतात, आधीच विभक्त व छोट्या कुटुंबात, नवरा बायको विभक्त झाल्यावर प्रश्न निर्माण होतो. माझ्या गोतावळा" या लेखानंतर कुटुंब व्यवस्था का कोसळते आहे? एकत्र कुटुंब पद्धती व विभक्त कुटुंब पद्धती या दोन्हीचा काही सुवर्णमध्य निघेल का? अशी चौकशी करणारे अनेक फोन आले. खरेतर मी या विषयाची तज्ञ नाही. लेखनासाठी अभ्यास केला आहे, कुटुंब न्यायालयात, काम करणारी एक सहचारी (लोकल मधली) हिच्याशी या विषयावर चर्चा केली. आज कुटुंब छोटी झाली आहेत. कारण व्यक्ती स्वातंत्र्याची जाणीव आली आहे. प्रगत घरांमध्ये, परदेशांमध्ये, कौटुंबिक वातावरण असे खास नसते. घटस्फोटाचे प्रमाण जास्त असते. याचे कारण सांगताना "व्यक्तिस्वातंत्र्य" हे ज्या देशात महत्वाचे असते, तेथे ब्रेकअप्स व घटस्फोट जास्त होतात. असे एक विधान मध्यंतरी वाचण्यात आले. भारत देश संस्कृतीचा ढोल बडवतो, पण भारतातील बऱ्याच विवाहामधील अनेक संबंधांमध्ये, नात्यांमध्ये समानता नसते. व एक व्यक्ती वर्चस्व गाजवते. अनबन झाकून मन मारून वेळ मारून नेली जाते.

मुलांसाठी, समाजासाठी, बेबनाव असूनही ते लपवून, सहजीवन असह्यजीवन हेच जीवन म्हणून जगले जाते. फारतर एकोप्याने, एकमेकाला धरून राहणे, आसपास वावरणे, हॉस्टेल सारखे राहणे चालू राहते! खरेतर ज्या प्रमाणे संपूर्णतः काळी वस्तू, परफेक्ट ब्लॅक बॉडी अस्तित्वात नसते, तसे पूर्ण आदर्श, असे विवाहजीवन अस्तित्वात नसावे. जर तसे खूप गोडी दर्शवत, सहजीवन चालू असेल तर ते नवे असते. तसे सुख किती वर्ष आहे, किती दिवस टिकते, सुरुवातीच्या घर्षणाच्या, रूळ बदलण्याच्या काळातही अनबन झाली नाही का? याचा अभ्यास करायला हवा. मानवी नातेसंबध खूप गुंतागुंतीचे असतात. व सूर जमणे, सोपे नसते. संसारात भांड्याला भांडे लागणारच व आवाज होणार अशी एक म्हण आहे. लग्नानंतरच्या वर्षा बद्दलचे एक वाक्य आहे.

१. पहिल्या वर्षी नवरा बोलतो बायको ऐकते.

२ दुसऱ्या वर्षी बायको बोलते नवरा ऐकतो.

३. तिसऱ्या वर्षी दोघेही बोलतात. (भांडतात) शेजारी ऐकतात.

अशी एक म्हण आहे. नवऱ्याने मारले पावसाने झोडपले तर गप्प बसावे. (बायकोनी सहन करावे) एका सहलीला एक ४७-४८ वर्षाचे जोडपे आमच्या बरोबर आले होते. ते एकमेकांशी ईतके प्रेमानी वागत होते कि मी माझ्या नवऱ्याला म्हटले, "हे एकमेकांचे नवरा बायको नसावेत" “नवरा वेगळा व बायको वेगळी असावी. ”

नवरा खेकसला. "तुझे काहीतरीच तर्क असतात"

सहलीच्या शेवटच्या दिवशी माझा नवरा (माझे लग्नाला ३० वर्ष झाली) मला म्हणाला,

"तुझे निरीक्षण बरोबर आहे ते दोघे एकमेकांचे नवरा बायको नाहीत. " धक्का मलाच बसला. या प्रसंगातील विनोदाचा भाग सोडला तरी नवरा बायकोचे सांसारिक वागणे, हे सदा प्रेमळ स्नेहार्द्र नसते. एका प्रेमगीताच्या कार्यक्रमात कवी म्हणाला

"प्रेमकविता प्रेयसीवर केल्या जातात, बाजूला घोरत झोपणाऱ्या केस विस्कटलेल्या बायको वर नाही" म्हंजे पत्नी हि प्रेयसी हुन वेगळी असते. हे सत्य त्याने विनोदात सांगितले आहे. अगदी खूप गाजलेल्या प्रेमविवाह केलेल्यांच्या, विवाहाचे तारू सुद्धा, कधी कधी भरकटते, कारण कि "अतिपरिचयात अवज्ञा "होत असते

“खरे तर विवाहात सुखी होणे अवघड नाही. मी बऱ्याच विवाहामध्ये झालो आहे"

असा एक विनोद आहे. तर बऱ्याचदा लग्न करूनही, अपयशी झालेला प्रेमवीर म्हणतो

"मी सुखी लग्नाची गुरुकिल्ली शोधतो आहे"

एलिझाबेथ नावाच्या नटीने अनेक लग्न केली होती. बायकोची आई, सासू येणे, बायको माहेरी जाणे या विषयावरचे विनोद रंजक व उदबोधक असतात. नवरा म्हणजे टॉम व बायको जेरी असावी अशा प्रकारे हि पळापळी, विनोदी मालिका कायम लोकप्रिय होणाऱ्या अशा त्या थीम्स - विषयात बसते. बायका

पुरुषांचा संशय घेतात, पुरुष सुंदर स्त्री कडे आकर्षित होतात, अशा त्याच त्याच त्रिकोणी कथा, संशय कल्लोळ नाटकापासून आजपर्यंतच्या अनेक कथांत नाटकात सापडतात.

"सात खून माफ" नावाचे चित्रपटात सात लग्न केलेली व नवऱ्याशी पटेना झाल्यावर त्याचा काटा काढणारी सुंदरी दाखवली आहे. तर "तो मी नव्हेच" मध्ये तेरा लग्न करणारा लखोबा (नट) दाखवला आहे. मालिका व चित्रपटातील लग्नांचे यश, प्रेयसी, काम याशिवाय सासू याच आसा भो वती फिरताना दिसते. "दुनिया ना माने" या साधारण विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या चित्रपटात प्रथमच नायिका, बायको नवऱ्याला सोडून येते, असे दाखवले होते. त्यापूर्वी बायको सोडण्याचा व लग्न मोडण्याचा हक्क, फक्त पुरुषांना होता. १९६० साली आलेला गाईड चित्रपटाने प्रथमच विवाहित स्त्रीचे विवाहबाह्य संबंध, तिचा घटस्फोट, तिचे प्रकरण दाखवले.

बाजीराव मस्तानी चित्रपटातील वाक्य आठवा,

ऐय्याशी तो जिस्म करता है

बाजीरावने मुहब्बत की है

असे अनेक बाजीराव जन्माला येतात.

पुनर्विवाह ह्या मालिकेत हल्ली पुनर्विवाहाच्या कथा दाखवल्या जातात, तर काही चित्रपटात (२०१२) लिव्ह इन रिलेशन" दाखवले जाते. एका दिवाळी अंकात, अशा लिव्ह ईन मधील जोडप्यांच्या सत्यकथाही प्रसिद्ध झाल्या आहेत. मोहाचे क्षण कोणाच्याही आयुष्यात कधीही येऊ शकतात. एकत्र राहणे व संसार टिकणे हे आधुनिक काळात किती अवघड झाले आहे बघा. विवाह संस्था हि सर्वात जुनी व काळाच्या कसोटीवर टिकलेली संस्था आहे. पण ग्लोबलाझेशन मुळे

बदलत्या संस्कृतीत तिचे काय होईल, हि समाजधुरिणांच्या काळजीची व चिंतेची गोष्ट बनली आहे. (संदर्भ - कुटुंब न्यायालयाचे वार्षिक २०१०) लग्ने टिकावी म्हणून प्रयत्न करूनही लग्न तुटण्याचे प्रमाण सुद्धा आहेच. लग्नात 'नातिचरामी' म्हणजे मी विवाहबंधनाच्या बाहेर जाणार नाही, हे बंधन तोडणार नाही, अशी शपथ घेतली जाते. अजूनही बरीच कुटुंबे आपल्या त्यागाच्या भक्कम पायावर विवाहसंस्था टिकवून धरतात. "लग्नाला पन्नास वर्ष झाली म्हणून सुखी संसाराच्या टिप्स मागायला तरुण तरुणी आले होते" असे नुकतेच एक स्नेही सांगत होते. कालनिर्णय मध्ये "लग्न कसे टिकवावे" असा लेख आहे. लग्न टिकणे म्हणजे? वरकरणी एक घर, एक उंबरठा, एक दोन मुले, त्यांच्या नोकऱ्या, विकेंडला सिनेमाला जाणारे जोडपे, असा फक्त अर्थ न घेता लग्नात, नात्यात विसंवाद नसावा व ते नाते समृद्ध राहावे" हा अर्थ अपेक्षित आहे. साधारणपणे नाते हे काही काळाने त्याची चमक हरवून बसते. रुटीन कामे ताण आणतात. स्नेहबंधाने जवळ आलेले नवरा- बायको किंचित दूर जातात. अशावेळी तिसरी व्यक्ती या विवाहाची तोडमोड सहज करू शकते. त्यामुळे असे तुटु घातलेले लग्न टिकवण्यासाठी, एकमेकांच्या आवडी जपणे, एकमेकांसाठी अधिक वेळ देणे, एकमेकांचा आदर करणे आवश्यक आहे.

लग्ने पूर्वीही होत होती  
लग्ने आजही होतात  
लग्ने पुढेहि होत राहणार  
पण खरेच ती टिकणार  
ती टिकोत म्हणून प्रयत्न करणार?  
केलेले प्रयत्न यशस्वी होणार?

## ३१ निरोप घेतो आम्हा आज्ञा असावी

एकूणच जगरहाटी अशी बेभरवशाची असते. कुणाला कुठल्या क्षणाला, तो निरोप घ्यावा लागेल सांगता येत नाही. कधी कधी खूप आनंदाच्या क्षणीहि मन निरोपघरात जाते. विरक्त होते. निरोपाच्या शब्दांची जुळवाजुळव करते. कधी १०८ बिल्वदल वाहताना, अचानकच काही कारणाने पुढचे आवरते घ्यावे लागते. पुढची पूजा मानसपूजाच ठेवावी लागते. जगाचा व पूजा परंपरेचा निरोप घ्यावा लागतो.

निरोप नेहमीच रडून घेतला जातो असे नाही. कधी कधी तो स्वखुशीने हि घेतला जातो. जसे,

" वो अफसाना जिसे अंजामतक लाना न हो मुमकिन,

उसे एक खुबसूरब नाम देकर भूलना बेहत्तर"

कधी कधी तो निरोप लादला जातो. कधी आता एकत्र असणाऱ्यांना, माहित सुद्धा नसते कि हा आजचा दिवस निरोपाचा आहे. सेवानिवृत्तीचे वेळी, शाळा कॉलेजचा शेवटच्या दिवशी, गावी जाताना, दिले गेतले जाणारे हे निरोप, काहीसे ज्ञात असतात. काही बाबतीत नोकरीत, विरहात, फसवणुकीत, अपघातात, असाध्य दुखण्यात, घातपातात जेव्हा हे निरोपाचे क्षण समोर येतात, तेव्हा ते खरेसुद्धा वाटत नाही. त्या क्षणी मनी वाटते, अरे आयुष्य एवढेच होते, जरा जगून घेतले असते.

नाते एवढेच होते, तर रुसवे फुगवे कमी केले असते. अहंकाराच्या भिंती बांधल्या नसत्या. पण ते सर्व नंतरचे विचार असतात. तेव्हा संधी निघून गेलेली असते व निरोपाचा क्षण समोर आलेला असतो.

ग्रह बदलतात, काळाची पावले बघून जीव दडपतात. चुकाही होतात. लहरी राजाची मर्जी फिरली कि राजा लहरी निर्णय देतो. विवेकालाच निरोप देतो व इतरांवर अन्याय करतो. सध्या सामान्य माणसावर जसा होतोय तसा तो अन्याय असतो! नोटा बदलायच्च्या रांगेत म्रुत्यु येवू शकतो, वाटते, माणसे किती छोट्या विश्वात वावरतात, दुसऱ्याचा विचार "न" करता त्याला दुखावतात व स्वतः खुर्ची गरम करीत मजेत जगतात. परदेशी फिरतात "मीच अव्यवहारी आहे" हे मला पटते, कारण मला क्षुद्र फायद्यासाठी, ईतर माणसे वापरणे, जमले नाही. पुराणकथांत राजा नेहमी रागाने कथितरित्या, “ इतरांना उकळत्या तेलात फेका" अशी आज्ञा करून, अविचाराचा निर्णय लादतो. नोकरीतून निवृत्त झाल्यावर, कामावर जायचे नव्हते म्हणून भावनांचा कल्लोळ नव्हता. पगारही नव्हता, मात्र एक बोचणी होती कि काही स्वार्थी लोकांनी माझे पोट मारले. बदलीचे वेळी माझी फसवणूक केली. माझ्यावर निरोप लादला. हा निरोप छळत राहतो.

निरोपानंतर वाटते "कदाचित माझे दाणापाणी तेवढेच होते किंवा मी त्या लोकांमध्ये ऑड मॅन आऊट होते. पण निरोपाच्या क्षणी होती ती व्यथा, मनात दडी मारून बसलेली असते. वारंवारच्या अज्ञात लादलेल्या निरोपामुळे मन हळवे झालेले असते.

जमले तितुके केले तरीही करणे उरले काही

नकोस येऊ मरणा अजुनी जगणे सरले नाही

मुली लग्न करून सासरी जाताना, मुले, नोकरीच्या जागी जाताना, किंवा परदेशी जाताना. त्या घरातील सुरक्षिततेचा निरोप घेऊन, घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडतात. उंबरठ्यातून बाहेर पडतानाचा निरोप धैर्याचा असतो. या निरोपात भीती, उत्सुकता, नाईलाज, स्वप्ने, अगतिकता, चीड सर्व भावना येतात. पक्षांना पिल्लांनी घरट्याबाहेर पडून आकाशात उडावेसे वाटते. पण त्या पक्षी जमातीत सुद्धा तो निरोप दुःखदायकच असतो.

फांदीतून (झाडाच्या ) देठापासून वेगळे झालेले, ते फुलसुद्धा निरोप घेताना दुःखी होते. कारण ते देठापासून दूर फुलू शकत नाही. रोजरोज जरी शाळेत किंवा ऑफिस मध्ये जायचे असले तरी निघताना "येतो" सांगून जाणे, निरोप घेणे सवयीचे होते. हा निरोप एक प्रकारे रुटीनचाच भाग असतो. तो हळवा, आक्रोश नसतो.

हिंदी सिनेमाने तर निरोप घेणे, जुदा होणे, अलविदा करणे, असे क्षण, असे प्रसंग, खूपच साग्रसंगीत रंगवले आहेत.

"बस थोडी हि देर मे अब हम जुदा हो जायेंगे

तुम मुझे धुंडोगे कैसे, रास्ते खो जायेंगे

नामतक तो भी नहीं अपना बताया आपने”

खरेतर हे सर्वांच्याच बाबतीत, सर्वकाळ घडू शकते. फक्त आपण ते नजरेआड करतो.

त्सुनामीच्या वेळी, भूकंपाचा वेळी, अनाहूत संकटाचे वेळी, आपल्यावर नियती, निरोपाचे क्षण लादते. हा क्षण निरोपाचा आहे, हेच त्यावेळी कळत नाही.

खूप रडून भेकून किंचाळून "मुझे छोडके मत जाओ, मै तुम्हारे वगैर, ये जिंदगी नहीं जी सकती" असे म्हणून घेतलेला निरोप, भडक असला तरीही आठवतो.

"न बोलताच मनानेच भविष्यातील असुविधा ओळखून आपण नात्यातून बाहेर पडतो तो पुसट निरोप सुद्धा वर्षानुवर्षे अस्वस्थ करू शकतो. कन्याकुमारी खडकावर उभी राहून, अज्ञाताची वाट बघते. म्हणजे काय करते तर निरोपासाठी मनाची तयारी करते. " असा निरोप हळू हळू घेतला जातो. मग कधीतरी पक्के कळते, हे वाट बघणे चूक होते. त्या व्यक्तिने निरोप पूर्वीच घेतला आहे, तो गेला आहे. परमेश्वर भेटीने तळमळणारा भक्त सुद्धा इहलोकीच्या सुखाचा निरोप घेत म्हणतो.

हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले

मजलागी जाहले तैसे देवा

नको देवराया अंत असा पाहू

प्राण हा सर्वथा जाऊ पाहे.

सदेह स्वर्गात जाणारे" तुकाराम महाराज" सुद्धा सकळ अनुयायांचा निरोप घेताना जड अंतःकरणानेच घेतात. थोर संतांची समाधीस्थळे सुद्धा निरोपघरे असतात व विरहाची आर्त विराणी, धून कानी पडावी अशी आर्त भावनाच ती व्यक्त करतात.

"हसत खेळत हो पुन्हा भेटू या, फोन करूया स्काईप करू या" म्हंटले तरी नजरेआड गेल्यावर निरोपानंतर, आता आपण जवळ राहू शकणार नाही, हा खेद उरतोच. निरोपात, तडजोड, आव्हाने, धैर्य असू शकते. कर्तव्य भावना असू शकते.

युद्धभूमीवर जाण्यासाठी, सैन्यात काम करणारी व्यक्ती जेव्हा जाते, तेव्हा त्या निरोपात देशप्रेम, कर्त्यव्य, अभिमान, त्याग अनिश्चितता असते.

माहेरवाशिणीच्या मनात, वृद्ध मातापित्यांना भेटून परत जाताना "पुन्हा भेटू ना भेटू" अशी चिंता असते. त्यामुळे तो निरोप आर्त असतो. राहू न शकणे, जावेच लागणे अशी अगतिकता त्या निरोपात असते. नोकरीच्या गावी जाताना, परगावी जाताना, पाय जड होतात. आणि तो निरोप जड अंतःकरणाने घेतला जातो.

ते गुंतणे नको व ते निरोपाने विव्हळ होणे नको. आईचा मृत्यू कळल्यावर एक दिवस स्वामी, स्वतःला पर्णकुटीत कोंडून घेतात, म्हणजे आपल्या त्या आवडत्या आईचा निरोप, त्या विरक्त संन्याशालाही उद्धवस्त करतो. जर जगात गुरुमाऊलीनाही निरोप घेणे अवघड जाते. मग आपण तर सामान्य लोक आहोत.

भेटीगाठी आणि निरोप तर जगरहाटिच आहे. या निरोपाची अनिशचितता हा जगरहातटीचा क्रूर भाग आहे. निरोप हे कटू सत्य आहे. आज अनेक वर्ष, तुमच्याशी शब्दांनी बोलले आहे. काही दिवसाच्या विश्रांती नंतर, कदाचित भेटूही, पण आता निरोप घ्यावा लागणार आहे.

निरोपाचे क्षण जवळ आला आहे.

निरोप घेतो आम्हा आज्ञा असावी

आशीर्वादाची छाया तुम्ही राखावी.

# ३२चैत्र रे चैत्र

‘उगवला नारायण काय मागू त्याच्या पाशी

बाई ग मागते, हळदकुंकवाच्या राशी

उगवला ग दिनकर, काय मागू त्याच्या पाशी

बाई ग मागते, उदंड आयुष्य लेकरांशी

बालपणी, गुढी पाडव्याला, सूर्योदयापूर्वी अशी, आईच्या मंजुळ आवाजातील आरती कानावर पडे· डोळे किलकिले करून बघितले कि, घर सजवलेले दिसे. आईने गुढीपाडव्यासाठी बांधायच्या, वेळू/बांबूच्या गुढीची तयारी केलेली दिसत असे. लाकडी काठीला, वरती निऱ्या करून बांधलेली साडी लावून, वर तांब्याचा गडू पालथा घातलेला असे. गुढीला हार व साखरी गाठ्यांची रंगीबेरंगी माळ घालून सजवलेली असे, गुढी जणू नवरात्रीत सजवलेलि देवीच वाटत असे.

सण

चैत्री पाडवा हा, हिंदू नवीन वर्ष सुरु होते, हे सांगणारा पारंपरिक सण आहे. प्रभू श्रीरामचंद्र रावणासोबतचे युद्ध जिंकून, वनवासातून परत आले, तो दिवस चैत्र प्रतिपदा, पाडवा होता. तो विजयोत्सव श्रीराम आल्यावर, जनतेने गुढ्या उभारुन, आनंदाने त्यांचे स्वागत करून, साजरा केला. अशी कथनी आहे. गुढी पाडवा म्हणजे

चैत्र प्रतिपदा होय. या दिवसापासून बरोबर ९ दिवसांनी रामनवमी येते. त्यामुळे या दिवसापासून, श्रीराम नवरात्र आरंभ करतात.

कर्नाटकात आंध्रात हा दिवस ऊगाडी म्हणून साजरा केला जातो. एकूण काय या उत्सवाला येणाऱ्या शुभ घटनांची, पुढे येणाऱ्या सुबत्तेचे स्वागत करण्याची, सुंदर सोनेरी अशी झालर आहे.

या दिवशी ब्रम्हदेवाने जग निर्माण केले असे पुराणात सांगितलेले आहे.

धार्मिक कृत्ये

या दिवशी सकाळी उठून, अभ्यंग स्नान करून, गुढी उभारावी.

‘ब्रह्मध्वजाय नम:’ म्हणून गुढीचे पूजन करून पावन व्हावे.

‘ब्रह्मध्वज नमस्ते अस्तु, सर्वाभीष्ट फलप्रद,

प्राप्ते अस्मीन्वत्सरे, नित्य मद्‌गृहे मंगलं कुरू. ’

अशी " सबका मंगल हो" या अर्थाची प्रार्थना करून, पंचागावरील गणपतीचे पूजन करावे. या दिवशी संध्याकाळी, सूर्यास्ताचे वेळी, आकाशातील नूतन चंद्रकोरीची पूजा करावी. ‘बालचंद्रमसे नमः ‘असे म्हणावे. नववर्षातील हे पहिले चंद्रदर्शन असते. वसंत ऋतूची चैत्र पालवी बहरून, निसर्गदेवी सजलेली असते. म्हणून वासंतिक देवी नवरात्र देखील, या दिवसापासून सुरु करतात.

निसर्गदेवी

गुढी पाडवा हे, निसर्गरूपी आदिमायेचे स्वागत असते. फाल्गुनाच्या त्या भकभकित उष्म्यानंतर, निसर्ग कूस पालटवतो. उत्तरायण सुरु होते. अगदी रुक्ष सुकलेल्या झाडाखोडांना देखील, चैत्र पालवीचे वेध लागतात.

अरसिक मनांना सुद्धा चैत्र पालवी, कोवळी पाने, मोहोर, फुलोरा खुलवतो. ओढ लावतात. कोकीळपक्षी कुहू कुहू चा राग आळवतो. आंब्याची सुवर्ण फळे, रंग-केशरी रूपाने, नजरेला जिव्हेला मोहवतात. सांगतात "वसंत ऋतू बहरला" दिवस तापत असला तरी, संध्याकाळचा गार वारा इच्छानंद दायी, आनंदाची पोचपावती देतो.

देहाच्या, सुस्त आळशी कंटाळलेल्या, तिकीट लावून पडलेल्या रेंगाळलेल्या लिफाफ्याला सुद्धा पाडवा ओला स्पर्श करतो. सहन होईना, अशी काहिली, आग संपणार आहे. उष्णता गर्मी संपून, सांगता येणार नाही असा आनंदमय ऋतू पुढे आहे, असा आशाआनंद सुरु होतो. पृथ्वी हिरवा स्क्रीनसेव्हर शोधू लागते. वाळयाचे खसचे पडदे, लाल, काळे माठ, आंबे, कलिंगडाच्या गाड्या, कुल्फीवाले जागोजागी दिसू लागतात.

गुढीपाडव्याचा प्रसाद, म्हणजे कोवळया निंबफूलाचे चूर्ण, चिंच, मिरे, ओवा, साखर, मीठ (नावापुरते) हे कुटून, कालवून बनणारा प्रसाद होय. ते औषधी म्हणून खाल्ले जाते. त्या मुळे रोग शांती होते. आजार बाधत नाहीत, अनंतगुणमयी आहाराची सुरवात, असा हा प्रसाद असतो.

यथाशक्ती दान

आपल्या हिंदू धर्मात प्रत्येक सणालाच सत्पात्री दानाचे पुण्यकर्म सांगितले आहे. गुढीपाडव्याला जुने वर्ष संपून, नवे वर्ष सुरु होते. त्यावेळी प्रत्येकाने जुन्या, नकोशा अतिरिक्त वस्तू, अन्न, कपडे, सत्पात्री दान करायला काय हरकत आहे? माणुसकीची भिंत हि पद्धती, नुकतीच सुरु झाली आहे, तिथे दान करावे. धनिक, पाण्याचे दुर्भिक्ष असेल तिथे या दिवशी पाणपोया घालतात. पाण्याचे माठ दान करतात. अन्नदान करतात.

चैत्र चाहूल

नियोजनाचे पहिले पाऊल, नव वर्षाचा पहिला दिवस, पाडव्याला टाकले. नवीन वर्ष सुरु होताच पंचांगाचे पूजन केले जाते. खोलवर विचारमंथन करून पाहिले तर कळते कि, या सणाला सांस्कृतिक मोल तर आहेच, शिवाय नियोजनाचे अंग देखील आहे. वर्षभरातील सणांचे, दिवाळी दसऱ्याच्या खरेदीचे, बेत ढोबळ आराखड्यात, पाडव्यालाच मांडले जातात.

ठकीचे लग्न वैशाखात, गंगीचे डोहाळेजेवण कार्तिकात

तीर्थयात्रा माघात, माहेरी जायचे पौषात,

असे बेत या दिवशी ठरतात. सण उत्सव मंगलकार्ये, यांची चैत्र चाहूल गुढीसोबतच उभारली जाते. वर्षभरात करायच्या, कुलधर्म कुलाचाराचे नियोजन, संकल्प या दिवशीच घातले जातात. गुढीपाडव्याचा दिवस हा, येणाऱ्या नूतन वर्षाचे, मनाच्या आरश्यात पडलेले, लहान प्रतिबिंबच होय.

मन शुद्ध तुझं,

मनाच्या मशागतीची सुरुवात, गुढी पाडव्याने होते. दुष्टांवर सुष्टांचा विजय, आपण गुढी उभारून जेव्हा साजरा करतो, तेव्हा मनाला समजावतो कि "सुदिन सुवेळी” सर्व दुष्ट शक्ती नष्ट होऊन, अच्छे दिन नक्की येतील. सुखाबरोबर दु:खाचे कडू घोट गिळावे लागतील, जीवनात त्या घटना टाळता येणार नाहीत असा मानसोपचार हा सण देतो. या दिवशी आई आपल्या अपत्याला ओवाळते. पत्नी पतीला ओवाळते आणि सांगते. "औक्षवंत हो"

या विधीमध्ये असा आश्वासक भाव असतो कि तुम्ही माझे खूप लाडके आहेत. मला तुम्ही खूप खूप हवेसे आहेत. नवीन वर्षी, आपले कुटुंब असेच गोडीगुलाबीत आनंदात राहील. स्त्रिया, मुले अलंकारांनी सुवस्त्रांनी विभूषित होऊन उत्साह करतात. फिलगुड सोबत, खोलवर जपलेल्या नात्यांच्या ओलाव्याची मुळे, चैत्री उत्सवाने दृढ होतात. दारी मंगल तोरण बांधले जाते. रांगोळी काधली जाते. दुचाकी चारचाकी, गोधनाची पूजा होते. ज्यामुळे देखिल घरात लक्ष्मी स्थिर होते.

मिष्टान्न भोजन -

गुढीला नैवेद्य दाखवून नववर्ष सोहळा साजरा केला जातो. राम कथा प्रवचन केले जाते.

आंबेडाळ पन्हे हा चैत्री पाडव्याचा खास मेनु असतो. श्रीखंडपुरी, खीर पोळी, जिलबी, पुरणपोळी असे कोणते तरी पारंपरिक पक्वान्न, मिष्ठान्न करून, कुटुंबीय एकत्र जेवून, जेवणा-जीवनाचा आस्वाद घेतात. ‘चैत्रे पुण्यमये वसंतसमये’ असा थाट असतो.

चैत्रांगण- पाडव्या पासून अंगणात चैत्रांगण मांडले जाते. खास चैत्रांगणाची सुंदर रांगोळी काढून, बाजूला विविध रोपे लावलेल्या कुंड्या ठेऊन, दीप लावून, अंगण सुशोभित करतात. पाहुण्यांना पन्हे आंबेडाळ दिली जाते.

आपला देश कृषी क्षेत्राशी संबंधित असल्यामुळे सण देखील कृषी अमृतानुभवावर आधारित आहेत. पाडवा हा शब्द प्रदुर्भू म्हणजे पीक या शब्दावरून आला आहे. रब्बी पीकाचा हंगाम संपल्यावर हा सण येतो. सण ही सुभाषितेच आहेत. शेतीची मशागत चांगली करून हिरवी लक्ष्मी शेतात यावी म्हणून पेरते व्हा सांगणाऱ्या पक्षाची वाट पाडव्यापासून बघितली जाते. बळी राज्याला, धनधान्य पिकणे हेच लक्ष्मीचे येणे असते.

शोभायात्रा

आधुनिक काळात, नववर्षाचे, विविध कार्यक्रम होतात, शोभायात्रा निघते. या शोभायात्रेत वेगवेगळे संदेश देणारे देखावे असतात. पारंपरिक वेषात मिरवणूक निघते, स्नेहभेटी होतात. रात्री रंगोत्सव होतो. हा बदल देखील चांगलाच आहे.

साडेतीन मुहूर्त

या दिवशी चांगल्या कार्याचा, नवीन शास्त्र शिकण्याचा आभ्यास करायची सुरुवात करतात. वर्षाची धूम खरेदी या दिवशी होते. साडेतीन मुहूर्तातील एक सुमुहूर्त म्हणून, या दिवशी नवीन वस्तू गाड्या, दागिने, घड्याळे मोबाईल इत्यादीची खरेदी केली जाते.

‘काळी चंद्रकला तिच्या पदराला मोती

माझ्या ग बापाजीने केली खरेदी अमरावती’

अशी खरेदी, गावभर, गाडीभर खरेदी होते

फुलापानांना हलवणारा वारा महत्वाचा

मायेचा पान्हा महत्वाचा

दान करणारा हात महत्वाचा

जीवनाची गोडी चाखणारा हिम्मतदार महत्वाचा

भरपूर दुःख आले तरी, संसार महत्वाचा

काहीही असो जगण्याचा उत्सव महत्वाचा

जैत ते जैत आला, चैत्र रे चैत्र महत्वाचा

गुडी पाडवा आनंद वाढवा

# ३ ३ मनाची मशागत

मन हि अज्ञात संकल्पना अमूर्त असते. संशोधक असे म्हणतात की, मन मेंदूत असते. देहाचे चोचले आपण पुरवतो, मात्र या मनाची मशागत करायला हवी.

मित्रहो काय म्हणता?

तुम्ही मनाची मशागत करता?

सांगा कशी?पुस्तकांचे मदतीने?

**<u>मदत करणारे</u>**

स्व-मदत पुस्तिका, सेल्फ हेल्प बुक्स मे हेल्प बट मे इन्क्रिज टेन्शन.

कॉउंसेलिंग मे हेल्प.

बट द ओन्ली पर्सन तू हेल्प यु इस युरसेल्फ यु !

आपण मनाला स्वयंसूचना द्या,

आय शाल ओव्हर कम धिस

ऑल इज वेल. बी हॅप्पि

मनाच्या मशागतीत, बालपणापासूनचे संस्कार, महत्वाचे असतात.

प्रतिकूल परिस्थितीत पुढे कसे जायचे?

**<u>काही गोष्टी लक्षात ठेवा</u>**

१. जगणे महत्वाचे आहे.

२. एव्हरी रिलेशन कम्स विथ एक्सपायरी डेट.

जीवनात नाती बदलतच राहतात. नवी बनतात, जुनी तुटत राहतात.

कधी आधी, कधी नंतर तुटतात.

३. समुपदेशनाचे तत्व हेच आहे कि

इतराना आपण बदलू शकत नाही

कॅक्टस इस कॅक्टस, ईफ यु गो नियर, इफ यु आर निअर ईट,

यु आर बॉउंड टु हर्ट.

कॅक्टस निवडुंग आपण घरातून बाहेर फेकू शकतो,

पण तो बाहेरच्या वावरत कधी टोचू शकतो.

४. औषध न लगे मजला.

औषधोपचार हे मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त असतात.

मात्र काही काळ औषध घेतल्यावर ते बंद करावे लागू शकते.

शरीरावर जास्ती केमिकलचा मारा नको.

५. मनाचे रुदन लिहून काढा, काय दुखते काय खुपते.

ऊदा:

मलाच अपयश येते. उगीचच आपण एवढे चांगले आहोत.

लोक आपण गैरफायदा घेतात. ऊदास वाटते

ऊपाय

६. सहलीला जा विंडो शॉपिंग करा. घर आवरा

शारीरिक कष्टाची कामे करा.

७. देवदर्शन करा. देवळात बरे वाटू शकते. शांत निवांत ठिकाणी असलेले, देऊळ शोधा.

८. व्हाट्सअप वाचा,

काळ हेच जखमेवरचे औषध असते, पण किती काळ हे निश्चित सांगता येत नाही=अंदाजे ४० दिवस

९. योगासने करा. श्वासाचे व्यायाम, प्राणायाम करा. मसाज करा.

पॅम्पर युअर सेल्फ

१०. घरातील एक कोपरा १x१ चा तुमच्या साठी राखीव ठेवा.

३*६ चा पलंग तरी राखिव ठेवा,

नाहीच जमले तर एक बॅग ठेवा, त्यात तुमचे खास सामान ठेवा.

११. भविष्या साठीची सहल ठरवा. मैत्रीण भेट ठरवा.

५ दिवस एखादा मंत्र म्हणा, शब्द गुंफा.

१२. माझे कुणीतरी असावे, वाटते, ठीक आहे, पण नाही मिळाले, काय करणार,

जखमा विसरा.

१३. गावपळण- पर्यटन करून काहीकाळ दु:ख लांब राहते

उंच डोंगरावर, समुद्र किनारी नदीकिनारी निसर्ग सान्निध्यात जा. माणसाचे प्रश्न खूप उतुंग व खोल अशा निसर्ग निर्मित परिसरात, आपोआप थोडे सुसह्य होतात. निसर्गाजवळ, खेड्यात दूर अशा ठिकाणी जा.

१४. सूर्य प्रकाश अंगावर घ्या.

१५. स्वतःला दोष देऊ नका.

दुर्गुण असतील तर सुधारायचा प्रयत्न करा.

पण तेव्हा माझे हे चुकले, असा पश्चाताप करू नका.

**भूतकाळ**

Humpty dumpty sat on a wall

humpty dumpty Had a great fall

All the kings hourses, all the kings men

Could not put together humpty dumpty again

भुतकाळ परत येत नाही, फुटलेले अंडे, पुन्हा जुऴुन येत नाही,

जुळले तरी त्यातून पिल्लू जन्माला यावु शकत नाही

टुथपेस्ट मधील पेस्ट परत भरता येते का?

Past is past backdated cheque

Future is postdated cheque

Present tense is cash, enjoy it

**<u>नातेसंबंध</u>**

१६. लग्न महत्वाचे असते.

मनाचे आरोग्य, लग्न, विवाह, नातेसंबंध, मुलं होणे, याच्याशी संबंधित असतेच.

जत सुखी असाल ीक आहे, नसाल तरी पण

मनाची मशागत करून मनाला इतरही कंगोरे घडवा.

ईतर वरवरची का होईना, पण नाती जपा, टाईमपास मित्र, टाईमपास मैत्रिणी ठेवा.

ऊदा:कट्टा ग्रुप, भिशी मैत्रिणी, अन्य छंद, शिक्षण, कला, वाचन

१७. आहार, फुले, झणझणीत चटणी, ठेचा भाकरी, लोणचं, मिरच्या, चॉकोलेट, कोको, मिठाई, चहा कॉफी, वडापाव क्वचित खायला हरकत नाही.

१८. posession is not required, tasting, enjoying is important.

झोप व्यायाम निसर्गोपचार, चंद्र नमस्कार, सूर्य नमस्कार शरीरावर आणि मनावर परिणाम करतात. मनाची मशागत आपोआप होते.

१९. जीवाचे मैत्र अवघड असते, मात्र, मैत्रिणी, समजून घेणारे लोक, लहान मुले यांच्या रमणे मनाची मशागत करते

काळ बदलला आहे, निती बदलली आहे. समाजात आदर्श नाहीत, त्यामुळे अनेक वळणांवर, अवघड प्रसंगी, माणूस व्यक्ती म्हणून नकारात्मक होतो. सकारात्मक राहणे सोपे नसते, त्यासाठी प्रयत्न करावे

२०. स्वच्छता पाळावी. सुगंध विनोद, आवडता चित्रपट, हलकी फुलकी गाणी, आशादायी गाणी एेकावी.

सारांश हे जग लोनली प्लॅनेट आहे, पण आपणच आपले मित्र बनावे.

कसे होणार हि काळजी वाटते.

मला तुम्हाला सांगणे, सल्ला देणे सोपे आहे. पण अवघड आहे.

आपल्यापाठी घरच्यांना दुःख नको, हा विचार करू नये. स्वत:साठी देखील जगायचे आहे.

आत्महत्या

घेतला फास लावूनी

नाही रडायला कोणी, असे अलिप्त जग आज आहे, तुम्ही स्वत:चा जगण्याचा हक्क् गमावू नका.

नैराश्य

आज सामान्यांना, सज्जनांना, विचारी लोकांना, खूप निराश वाटते. हो, अशी सामाजिक परिस्थिती आज आहे. सहन होत नाही.

अंधार आहे. प्रश्न आहेत,

स्थलांतर, मृत्यू, घटस्फोट, नातेसंबंध नोकरी जाणे, फसवणुक, या कारणांनी, नैराश्य येणे नॉर्मल आहे

जगात अनेक प्रश्न असतात.

तरीही जगाला माणुसकीची गरज आहे,

स्वतःला जपणे, मनाची मशागत करणे, खूप गरजेची आहे.

तुमचे जीवन आहे. जगणे हा तुमचा हक्क आहे. आत्महत्येचा अविचार करू नका.

काय करु शकता?

समाज सेवा करू शकता.

शिवणकाम करू शकता.

एन जी ओ शी संलग्न राहू शकता.

वृद्धाश्रमात सेवा देऊ शकता.

स्वयंपाक करण्याचे काम करू शकता.

दुःखांची कारणे

दुःखांची कारणे अनेक असतात.

आधीच नव्हते काही

त्यात वारली आई.

फसवणूक, गरिबी कर्जबारीपणा, अशी अनेक कारणे आहेत.

तू सुखात आहेस ऐकतो,

कसे जमवतेस सांग ना.

डोळ्यातील पाणी मी,

कुठे लपवू सांग ना

दुःखांची कारणे लपवून आपण रसिक बनतो.

दुःखाचा आस्वाद घेतो. कवी बोलणारे रसिक असतात.

रसिक न बोलणारे कवी असतात.

उपाय

सिक्रेट हँडलिंग ऑफ माईंड बॉडी रिलेशनशिप

स्वस्थाना स्वास्थ रक्षणाय

व्याधीग्रस्थनाम व्याधीनिवार्णाय.

देहासोबत मनाची मशागत हवी.

घरातील धूराची चिमणी हि घरातील धूर बाहेर टाकते, पण कधी कधी त्या धुरातील काही कडक कण चिमणीला चोक करतात. तसेच दुःख असते.

ते ओळखणार कसे?

दुःखाचे प्रकार

१. बोलणे

२. बोलू शकत नाही

३. बोलावेसे वाटते

४. बोलायला हवे

दुःखाचे व्यक्त होणे

१. बोलतो ते व्यक्त करतो

२. बोलत नाही ते लपून राहते

३. बोलू शकत नाही ते

४. बोलायला हवे ते

नो बडी इज liked बाय ऑल

हि वेदना, अपमानाची दुःखे आपण दडवते.

आत लपवतो.

Unconscious - godown -bad

Subconscious current stock-  not good

Conscious-     visible display galary-      very good-all is well

वाईट का वाटते.

१. आपण इतके वाईट आहोत कि आपल्याशी नाते तोडावे?

२. लपलेले नैराश्य हादरवत सुद्धा असते. कृत्रिमतेच्या जगात भीती वाटते.

३. मग निराश माणसे खोटी कारणे सांगतात. डोके दुखतंय, पाय दुखतात, कंबर दुखतेय. जेवण टाळतात. शूरवीरांच्या सबबा देतात, बाहेर जाणे करतात.

४. जेवण व झोप यात बदल होतो. आऊट ऑफ कण्ट्रोल होते. सर्वच गोष्टी पराधीन वाटू लागतात. देवभोळेपण येते.

५. एकटेपणाची भीती काळजी वाटते.

उपाय

तुरटी आणि फुले जवळ ठेवा. मनाचे गढूळ पाण्यात तुरटी फिरवा, गाळ तळाशी बसेल.

काही प्रसंगी वर उफाळून येईल, पण तात्पुरता तरी बसेल.

हि तुरटी म्हणजे चांगले विचार मित्र मैत्रिणी छंद, वाचन, पुस्तके बाळगा.

खंबीर व्हा. दुबळया व्यक्तीला जगात टिकणे अवघड ठरते. स्वतःच्या मनाची मशागत करा.

मनाची मशागत

मन सकारात्मक करा

काटेरी झुडपे काढून टाका

ढेकळं फोडा

पाणी घाला.

आनंदाचे, करुणेचे बीज पेरा

मनाची बाग हिरवी ठेवा.

## शुभांगी पासेबंद यांचे अन्य प्रकाशित साहित्य

1 मयूरमासा कादंबरी - 2012 - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबईतर्फे (नवोदित अनुदान योजने अंतर्गत, हार्ड कोपी)

2. नाते शब्दांचे -ललित - 2014 पुणे-हार्ड कॉपी

3. मुलीही जन्माला येऊ द्या- ललित-2015- द कृ सांडू पुरस्कार बक्षिसपात्र -पुणे-हार्ड कॉपी

4. रंगकेशरी - कादंबरी- इ-बुक - 2015 -ू बुकगंगा डॉट कॉम

5. बिलिव्ह इट ऑर नॉट- कथासंग्रह - इ-बुक - 2016बुकगंगा डॉट कॉम, विनामूल्य

6. कस्तुरी पक्षी- इ बुक- कादंबरी- इ साहित्य -2016 विनामूल्य

7. एक दिवा लावूया - स्तंभ संग्रह - 2016 बुकगंगा डोट कॉम

8. जाईन मी विचारीत रानफुला- स्तंभ संग्रह - 2016 बुकगंगा डोट कॉम

9. राहू दे घरटे- इ कादंबरी-2016 विनामूल्यwww.esahity.com

10. मी तुझेच गीत गात आहे- इ साहित्य - कादंबरी-2016 विनामूल्य

११ कृष्णकुसुमांजली-२०१६-स्तंभ संग्रह इ साहित्य- विनामूल्य

१२ आम्रकुसुमांजली -२०१६- स्तंभ संग्रह- इ साहित्य- विनामूल्य

१३ why did i fall in love? novel, Amazon. com, Createspace, ई बुक. २०१२

१४. मधुर दंश कथासंग्रह - नवल प्रकाशन २०१६ पुणे, हार्ड कॉपी

१५ बेलाची पाने-स्तंभ संग्रह- ई बुक-बुकगंगा डॉट कॉम-२०१७एप्रिल

१६ रानफुलांचे थवे स्तंभ संग्रह -ई-साहित्य-२०१७ एप्रिल

१७ केशरबाग-विचक्षण प्रकाशन २०१७ नोव्हेंबर २०१७ विचक्षण प्रकाशन

१८ कुठे शोधिशी रामेश्वर अन् कुठे शोधिशी काशी २०१७ अनघा प्रकाशन ठाणे

१९ दीपज्योति नमोस्तुते-स्तंभसंग्रह-ईबुक-२०१८ हे पुस्तक

२० आगामी कशाला ऊद्याचि बात -पुणे

२१ आगामी नक्षत्रबन-पुणे

सर्व पुस्तके ई बुक स्वरूपात उपलब्ध आहेत

ईसाहित्य प्रतिष्ठान ची सर्व पुस्तके विनामूल्य असतात

www. esahity. com

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी. आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला अर्धाकोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाटत. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटगत सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा. हे सर्व मोफ़त आहे.